ऑनलाइन आवृत्ती

१ ऑगस्ट २०२० : १०० वा स्मृतिदिन

लोकमान्य टिळक स्मृति अंक

संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक

साधना

Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
१ ऑगस्ट २०२०
मूल्य रु.२०
(एकूण पृष्ठे : ४८)

VISIT…

१ ऑगस्टला येणार

'साधना साप्ताहिका'चा

अण्णा भाऊ साठे

विशेषांक



कथा, कादंबरी, लावणी, पोवाडे, तमाशे इत्यादी लेखनप्रकार हाताळणारे, शाहिरी व कलापथकांच्या माध्यमांतून प्रबोधन करणारे, संयुक्त महाराष्ट्र लढ्यात व कम्युनिस्ट चळवळीत सहभागी झालेले अण्णा भाऊ साठे यांचे जन्मशताब्दी वर्ष १ ऑगस्ट २०२० रोजी संपत आहे, त्या निमित्ताने काढलेला विशेषांक

संपर्क

साधना साप्ताहिक

४३१, शनिवार पेठ, पुणे 411030

Ph 02024451724

weeklysadhana@gmail.com

अनुक्रम

अण्णा भाऊंचे स्मरण का करायचे?
संपादकीय

माझा रशियाचा प्रवास : मुंबई ते मॉस्को
अण्णा भाऊ साठे

अर्जुन डांगळे यांची मुलाखत
संवादक : महेंद्र भवरे

अण्णा भाऊंच्या प्रेरणा मार्क्सवादीच आहेत
उत्तम कांबळे

काळाच्या पुढचे पाहणारा लेखक
राजन गवस

शंकर भाऊ यांनी दाखवलेले अण्णा भाऊ
मनोहर जाधव

पोवाडे आणि लावण्यांमधून दिसणारे अण्णा भाऊ
लक्ष्मीकांत देशमुख

वारणेचा वाघ : कादंबरी आणि तिच्यावरील सिनेमा
राजा शिरगुप्पे

'अण्णा भाऊंचा पुतळा रशियात उभारला जातोय' त्याची गोष्ट
संजय देशपांडे

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
१ ऑगस्ट २०२०
वर्ष ७२ / अंक – ५०
संपादक :
विनोद शिरसाठ
सहयोगी संपादक मंडळ :
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल
मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, आनंद लाटकर कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा.लि., वडगाव बु।, पुणे ४११०४१ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
Ph.: 020-24451724 /
Mob.: 7028257757
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)
Ph. : 020-24459635
वार्षिक वर्गणी :
एक वर्षांसाठी : ८०० रुपये
दोन वर्षांसाठी : १६०० रुपये
तीन वर्षांसाठी : २४०० रुपये

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, बचत खाते क्र.**60025586634,**
IFSC MAHB 0000001, **बँक ऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

लोकमान्य
स्मृतिशताब्दी

अनुक्रम

४ **टिळकांना समजून घ्यायचे ते यामुळे...!**
संपादकीय

७ **कै. न्या. महादेव गोविंद रानडे**
बाळ गंगाधर टिळक

१३ **महापुरुषांचे जीवाश्म होऊ नये म्हणून...**
सदानंद मोरे
संवादक : सचिन परब)

२२ **जुन्या – नव्या पर्वांचा दुवा**
कुमार केतकर

२७ **काळकोठडी मंडाले**
अरविंद व्यं. गोखले

३६ **टिळकांचे गणितप्रेम**
शैलेश माळोदे

४२ **टिळक हरवल्याचा शोध**
सदानंद मोरे

स्थापण्या समता शांती ठेवुनी शुद्ध साधना । करिती साधना त्यांना ठेवी उत्स्फूर्त साधना ।।

संपादकीय

टिळकांना समजून घ्यायचे ते यामुळे...!

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक (२३ जुलै १८५६ – १ ऑगस्ट १९२०) यांना ६४ वर्षांचे आयुष्य लाभले. वयाच्या २४ व्या वर्षी त्यांनी सार्वजनिक कार्यास आरंभ केला. लोकशिक्षण हे प्रमुख उद्दिष्ट ठेवले, त्यासाठी काही समविचारी मित्रांसह दोन आघाड्यांवर काम सुरू केले. न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज यांची स्थापना केली आणि त्याच वेळी 'केसरी' व 'मराठा' ही अनुक्रमे मराठी व इंग्रजी साप्ताहिक वृत्तपत्रे सुरू केली. शाळा–महाविद्यालये सुरू करताना, देशकार्यासाठी नवी पिढी तयार करता येईल, असा अंत:स्थ हेतू होता. वृत्तपत्रे सुरू करण्यामागे कालच्या व आजच्या पिढ्यांचे प्रबोधन करणे, हा उघड हेतू होता. इथपासून सुरू झालेला सार्वजनिक कार्याचा त्यांचा प्रवास अनेक वाटा–वळणे व चढ–उतार पार करीत पुढील ४० वर्षे (१८८० ते १९२०) अखंड चालू राहिला. यातील साडेसात वर्षे तुरुंगवासाची होती.

या चार दशकांचे ठळक असे दोन भाग दिसतात. पूर्वार्धात ते प्रामुख्याने महाराष्ट्रात कार्यरत होते, उत्तरार्धात मात्र ते राष्ट्रीय स्तरावरील प्रमुख नेते झाले. इतके की, देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास सांगताना 'टिळक पर्व' असा उल्लेख केला जातो आणि त्यांच्या मृत्यूनंतर 'गांधी पर्व' सुरू झाले, असे मानले जाते. टिळक व गांधी या दोघांच्या धारणा व कार्यशैली यांमध्ये फरक दिसत असला तरी, त्यांच्यात आंतरिक संगती कशी होती, याबाबत देश–विदेशांतील अनेक अभ्यासकांनी नोंदवून ठेवले आहे. मराठीतही आचार्य जावडेकर ते सदानंद मोरे इथपर्यंतच्या अभ्यासकांनी ते अधिक चांगले अधोरेखित केले आहे. स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार ही टिळकांनी सांगितलेली चतु:सूत्री गांधींच्या राजकारणाशी नाते सांगणारीच आहे. त्यामुळे एवढे तरी निश्चित की, गांधीजींनी स्वातंत्र्याची चळवळ देशभर सर्वत्र पोहोचवली, त्याची पायाभरणी करण्याच्या कामात टिळकांचे मोठेच योगदान होते आणि म्हणूनच त्यांना 'भारतीय असंतोषाचे जनक' असे संबोधले गेले.

अशा या टिळकांचे जन्मशताब्दी वर्ष १९५५–५६ मध्ये आले, तेव्हा देशभर विविध कार्यक्रम व उपक्रमांनी जल्लोषात साजरे झाले. स्वातंत्र्य मिळून दशकभराचाही कालखंड उलटला नसल्याने ते साहजिक होते. त्यानंतर मात्र टिळकांचे स्मरण क्रमाक्रमाने कमी होऊ लागले. हे खरे आहे की, कोणत्याही महनीय व्यक्तीच्या जन्मशताब्दीनंतर तिचे स्मरण कमी होऊ लागते. याचे मुख्य कारण, समाजजीवनात बदल खूप झालेले असतात आणि त्या व्यक्तीचे विचारकार्य समाजाने आत्मसात केलेले असते. दुसरे कारण, समाजाने आपल्या गरजांनुसार पूर्णत: नव्यांना किंवा जुन्यांपैकी काहींना नव्याने समजून घेतलेले असते. तिसरे कारण असे की, त्यांच्या काही भूमिका प्रतिगामी ठरलेल्या असतात, त्यामुळे त्यांच्याशी नाते सांगणे अडचणीचे किंवा अवघड वाटू लागते. लोकमान्य टिळकांच्या बाबतीत तिसरे कारण जास्त परिणाम करून गेले.

म्हणजे त्यांच्या जन्मशताब्दीनंतरच्या काळात ब्राह्मणेतर व बहुजन चळवळी आकार घेऊ लागल्या आणि प्रत्येक समाजघटकांच्या अस्मिता जाग्या होऊ लागल्या, नवे आदर्श पुढे येऊ लागले. त्या चळवळी व अस्मिता योग्यच होत्या.

त्यांचे आदर्श पुढे येणेही आवश्यकच होते. मात्र त्या जल्लोषात, अलौकिक कर्तृत्व गाजवलेल्या (काही महनीय व्यक्तींप्रमाणेच) टिळकांचे काही विचार व वर्तन टीकेचा विषय होऊ लागले. ती टीका काही प्रमाणात रास्त होतीच, मात्र टीकाकारांना वाटणारा आकस व त्यांनी केलेला विपर्यास यांचाही वाटा मोठा होता. शिवाय, काळाच्या परिप्रेक्ष्यात महापुरुषांचे आकलन करून घेण्याची सवय भल्याभल्यांना नसणे, याचाही काही परिणाम झाला. त्यामुळे कार्यकर्ते, अभ्यासक व जनसामान्य यांच्यात तो कैफ इतका चढत गेला की, त्यातील काहींनी टिळकांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. मग टिळकांच्या उर्वरित कार्याच्या समर्थनार्थ वा बचावासाठी पुढे येऊ पाहणाऱ्यांना निकालात काढले जाऊ लागले. आणि 'तेवढ्या कारणावरून त्यांचे कर्तृत्व मातीमोल कसे ठरवता येईल' असे विचारणाऱ्यांना प्रतिगाम्यांचे समर्थक समजले जाण्याइतपत मजल मारली जाऊ लागली. या प्रक्रियेमुळे दखल न घेतली जाणे किंवा अनुल्लेखाने मारणे किंवा दुर्लक्ष करणे हे प्रकार मागील पाव शतकात सर्वाधिक घडले ते लोकमान्य टिळकांबाबत!

म्हणून लोकमान्य टिळक यांचे स्मृतिशताब्दी वर्ष (२०१९-२०२०) आले आणि गेले. काँग्रेस पक्षाचा झालेला अभूतपूर्व ऱ्हास पाहता राष्ट्रीय पातळीवर त्यांच्याकडून काही घडवले जाण्याची अपेक्षा नव्हतीच. पण ज्या महाराष्ट्राने अनेक कार्यक्रम व उपक्रम याद्वारे गांधी १५० मागील दोन वर्षे साजरी केली, त्या महाराष्ट्राने टिळक स्मृतिशताब्दीची उपेक्षाच केली. हे खरे आहे की, या स्मृतीवर्षातील अखेरचे चार महिने कोरोना संकटामुळे फार काही करायला वाव नव्हता, मात्र हे संकट नसते तरी फार काही घडले नसते...!

अशा पार्श्वभूमीवर साधनाचा हा टिळकस्मृती अंक येत आहे. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक आयाम होते. त्या सर्वांवर एकेक रोचक लेख होऊ शकेल. उदाहरणार्थ, टिळक आणि आगरकर, टिळक आणि केसरी व मराठा, टिळक आणि गीतारहस्य, टिळक आणि संस्कृत, टिळक आणि काँग्रेस, टिळक आणि बॅरिस्टर जीना व अन्य कायदेतज्ज्ञ इत्यादी. ते सर्व अधोरेखित करायचे म्हणजे स्वतंत्र पुस्तकच करावे लागेल (आणि तशी बरीच पुस्तके आधीपासून उपलब्ध आहेत.) आणि म्हणून टिळकांच्या विचार-कार्याचा गाभा व आवाका याबाबत कुतूहल निर्माण करावे, असा माफक हेतू समोर ठेवला. त्याप्रमाणे या अंकात प्रातिनिधिक म्हणावेत असे सहाच लेख घेतले आहेत.

टिळकांच्या भाषेची, शैलीची व विचारप्रतिपादनाची झलक दाखवणारा त्यांचा स्वतःचा एकच लेख या अंकात सादर करायचा असे ठरवले होते. त्यासाठी अनेक उत्तमोत्तम पर्याय उपलब्ध होते, मात्र त्यातील न्या.रानडे यांच्यावरील मृत्युलेख आम्हाला अनेक कारणांमुळे महत्त्वाचा वाटला. टिळकांसाठी सुरुवातीच्या पाच-सात वर्षांच्या काळात रानडे हे मेन्टॉरसारखेच होते. नंतर मात्र त्यांच्यातील वैचारिक दरी इतकी रुंदावत गेली की, ते दोघे परस्परविरुद्ध पक्षांचे वाटावेत असे झाले, विशेष म्हणजे त्यात आक्रमकाच्या भूमिकेत टिळक होते. परिणामी, नंतरची दहा-बारा वर्षे रानडे व त्यांचे समर्थक यांच्यावर टिळकांनी अनेक वेळा जहरी व बोचरी टीका केली. रानड्यांचा मृत्यू १९०१ मध्ये झाला, तेव्हा केसरीमध्ये टिळकांनी लिहिलेला हा लेख आहे. यातून रानड्यांचे मोठेपण व योगदान अधोरेखित करताना टिळकांनी हातचे राखून ठेवलेले नाही आणि एकही विशेषण औचित्याचा भाग म्हणून वापरल्याचे जाणवत नाही. टिळक किती परिपक्व व दूरदृष्टीचे होते हेही यातून प्रकर्षाने पुढे येते. (त्या वेळी टिळक अवघे ४५ वर्षांचे होते.)

'लोकमान्य ते महात्मा' हे मन्वंतर कसे घडून आले, याचा विस्तृत व स्तिमित करणारा पट ज्यांना पकडता आला त्या सदानंद मोरे यांची दीर्घ मुलाखत जाणीवपूर्वक अशा पद्धतीने घेतली आहे की, लोकमान्य टिळक व त्यांचा काळ यांचे चांगले भान वाचकांना येईल. त्यांची मुलाखत जेथे थांबली आहे, तोच धागा पुढे घेऊन जाईल असा लेख कुमार केतकर यांच्याकडून आला आहे. त्यांनी एकोणिसाव्या व विसाव्या शतकांना जोडणारा भारतीय राजकारणातील दुवा हे टिळकांचे स्थान अधोरेखित केले आहे. जुन्या व नव्यांना जोडणारा दुवा, हा मुद्दा लक्षात घेतला तर टिळकांच्या भूमिकेतील काही भाग नव्या संदर्भात कालबाह्य व मागे खेचणारा वाटणे साहजिक आहे, असेही त्यातून समजून घेता येईल.

टिळक आणि मंडाले या विषयाची जुजबी तोंडओळख सर्वांनाच असते, पण त्याविषयी नेमके आकलन फार कमी लोकांना असते. म्हणून अरविंद गोखले यांना अशी विनंती केली होती की, मंडालेतील टिळकांची सहा वर्षे आणि त्याचा

मागचा-पुढचा पट सविस्तरपणे वाचकांसमोर यायला हवा. त्यांनी तो असा मांडला आहे की, कल्पनारम्य नाटकापेक्षा अधिक रोचक झाला आहे. त्यातून टिळकांच्या अनेक गुणांची नव्याने खात्री पटते. असाच काहीसा प्रकार 'टिळक व गणित' हा विषय निवडण्यामागे होता. टिळकांच्या बुद्धिमत्तेचे व पांडित्याचे उल्लेख सर्वत्र येत असतात, त्यामुळे गणिताला स्पर्श करून त्याबाबत काही दिशादर्शन करता येते का, असा तो विचार होता. त्या संदर्भात तपशील कमी मिळतात आणि जे मिळतात ते त्रोटक, त्यामुळे टिळक व गणित हे प्रकरण समजून घ्यायला मर्यादा पडतात. मात्र त्याबाबत अधिक संशोधन व्हायला हवे, असे तीव्रतेने वाटायला लावणारा हा लेख आहे.

या अंकात अखेरचा लेख वस्तुतः पुनर्मुद्रण आहे. सात वर्षांपूर्वी तो साधना साप्ताहिकातच प्रसिद्ध झालेला आहे. हा लेख पुनर्मुद्रित करताना आनंद झालेला नसून, मोठी खंत वाटलेली आहे. दिल्ली येथील महाराष्ट्र सदनाचे उद्घाटन ४ जून २०१३ रोजी झाले. तेव्हा तेथील प्रांगणात महाराष्ट्राचे प्रातिनिधिक महापुरुष म्हणून शिवाजीमहाराज, महात्मा फुले, शाहूमहाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि यशवंतराव चव्हाण या पांच जणांचे पुतळे उभारले आहेत. यामध्ये टिळकांचा पुतळा का नाही, असा मार्मिक सवाल उपस्थित करणारा (नाट्यरूपातील) लेख सदानंद मोरे यांनी लिहिला होता.

टिळकांचे ब्राह्मण असणे किंवा बहुजन नसणे हेच त्यांचा पुतळा न उभारण्याचे मुख्य कारण आहे, हे त्यातून ध्वनित होते आहे आणि ती चूक आहे, हे त्यात निःसंदिग्धपणे बजावले आहे. काँग्रेस व राष्ट्रवादी यांच्या सरकारने ती चूक पुढील दीड वर्ष आणि भाजप सेना-युती सरकारने त्यापुढील साडेचार वर्षे तशीच दुर्लक्षित ठेवली. गेल्या वर्षी (१८ जून २०१९ रोजी) महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'महाराष्ट्र सदनात लोकमान्यांचा पुतळा उभारला जाईल', असा सरकारचा निर्णय जाहीर केला. मात्र त्यापुढील सहा महिन्यांच्या कार्यकाळात त्यांनी आणि नंतरच्या सहा महिन्यांच्या कार्यकाळात शिवसेना-राष्ट्रवादी-काँग्रेस या महाआघाडी सरकारनेही त्या निर्णयाची अंमलबजावणी केलेली नाही. इतर वेळी अशी दिरंगाई क्षम्य मानता आली असती, पण लोकमान्यांचे स्मृतिशताब्दी वर्ष आले आणि गेले तरी वैचारिक क्षुद्रपणा काँग्रेस व राष्ट्रवादीला सोडता आलेला नाही, आणि 'आम्ही उशिरा का होईना घेतलेल्या त्या निर्णयाची अंमलबजावणी करा' अशी मागणी करण्याचे शौर्य व धैर्य भाजपला (व शिवसेनेला) दाखवता आलेले नाही. महाराष्ट्राचे राज्यकर्ते किती संकुचित व मतलबी आहेत, याचा हा आणखी एक पुरावा.

असो. टिळकांच्या संदर्भात असे अनेक विषय उपस्थित करता येतील. त्यांच्या कार्यकर्तृत्वावर आणखी वेगळ्या बाजूने प्रकाश टाकणारा विनय हर्डीकर यांचा एक दीर्घ लेख साधनाच्या येत्या दिवाळी अंकात प्रसिद्ध करणार आहोत. टिळकांचे जीवन व कार्य अनोख्या पद्धतीने सांगणारे एक महत्त्वाचे पुस्तक आणखी वर्षभराने म्हणजे टिळकांच्या १०१ व्या स्मृतिदिनी आणणार आहोत. त्याविषयी इथे थोडक्यात नोंद करणे आवश्यक वाटते.

लोकमान्य टिळक यांचे जन्मशताब्दी वर्ष १९५५-५६ मध्ये साजरे होणार होते, तेव्हा त्यांच्यावर कोणत्याही भाषेत पुस्तक लिहिण्याची स्पर्धा राष्ट्रीय स्तरावर घोषित झाली होती. अखिल भारतीय काँग्रेस महासमितीने ती स्पर्धा आयोजित केली होती, त्यासाठी दहा हजार रुपयांचे पारितोषिक घोषित झाले होते. त्या स्पर्धेत अव्वल म्हणून निवडले गेलेले पुस्तक होते अ.के. भागवत व ग.प्र. प्रधान यांनी लिहिलेले 'लोकमान्य टिळक : अ बायोग्राफी'. ते दोघेही त्या वेळी वयाच्या पस्तिशीतील इंग्रजीचे प्राध्यापक होते. त्यांनी साडेसहाशे पानांचे ते पुस्तक इंग्रजी भाषेत लिहिले आहे. ते लिहीत असताना मार्गदर्शनासाठी त्या दोघांनी महिनाभर आचार्य जावडेकर यांच्या घरी (इस्लामपूर, जिल्हा सांगली) मुक्काम ठोकला होता. त्या पुस्तकात टिळकांच्या विचार-कार्याचा गाभा व आवाका नेमकेपणाने पकडलेला आहे. त्याला तत्कालीन राष्ट्रपती राधाकृष्णन यांनी प्रास्ताविक लिहिले आहे. ते पुस्तक नंतरच्या काळात बाजूला पडले, त्यानंतर बरीच वर्षे ते आऊट ऑफ प्रिंट होते. बारा वर्षांपूर्वी त्याची नवी आवृत्ती जयको पब्लिकेशन्सकडून आली आहे, मात्र त्याचा मराठी अनुवाद अद्यापही आलेला नाही. साधनाचे संपादक राहिलेले ग.प्र. प्रधान यांचे जन्मशताब्दी वर्ष आणखी वर्षभराने सुरू होत आहे, ते औचित्य लक्षात घेऊन त्याचा मराठी अनुवाद साधना प्रकाशनाकडून आणणार आहोत.

लोकमान्य
स्मृतिशताब्दी

कै.न्या.महादेव गोविंद रानडे

बाळ गंगाधर टिळक

माधवरावजींच्या अंगचा पहिला गुण हा होय की, सर्व बाजूंनी राष्ट्राची उन्नती झाली पाहिजे, असे त्यांस वाटत होते. या सर्व दिशांचे व बाजूंचे सांगोपांग परीक्षण करून त्यांच्या योग्यायोग्यतेबद्दल निर्णय करण्याइतकी परमेश्वराने त्यांस प्रगल्भ व व्यापक बुद्धी दिली होती. धर्मव्यवस्था, समाजसुधारणा, उद्योगधंदे, शिक्षण, राजकीय व्यवस्था वगैरे सर्व बाबतींत आम्ही मागे आहोत आणि या सर्व गोष्टींत सुधारणा झाल्याखेरीज इतर सुधारलेल्या राष्ट्राशी आपणास बरोबरी करता यावयाची नाही, असा त्यांचा पक्का ग्रह झालेला होता. यांपैकी काही बाबतींत त्यांची मते पुढे ज्या नवीन चळवळी निघाल्या, त्यामुळे सर्व लोकांस पसंत पडेनाशी झाली होती. पण तेवढ्याने त्याची योग्यता कमी होते असे नाही. घाटातून एकदा एका कुशल इंजिनिअरने आगगाडीची लाइन मारल्यानंतर त्यात सुधारणा करणारे जरी पुष्कळ लोक निघाले, तरी ज्याप्रमाणे मूळ इंजिनिअरच्या कल्पकपणास कमीपणा येत नाही, तद्वत्च रावसाहेब रानडे यांची स्थिती होय.

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या मृत्यूची वार्ता ऐकून हिंदुस्थानातील, महाराष्ट्रातील व विशेषतः पुण्यातील लोकास आपल्या घरचाच एक कार्यकर्ता पुरुष गेल्याइतके दुःसह दुःख होईल व निदान काही कालपर्यंत तरी या दुःखदायक बातमीने त्यांचे भान नाहीसे होईल, यात शंका नाही. मनुष्याचे जीवित नश्वर आहे वगैरे तत्त्वज्ञानाचे विचार कितीही डोक्यात घोळत असले तरी वैभवाने, बुद्धीने, कर्तृत्वाने किंवा विद्वत्तेने ज्या थोर गृहस्थांनी राष्ट्राचा कार्यभार उचलून पुढाकार घेतलेला असतो, त्यांच्या मृत्यूने काही कालपर्यंत तरी जग शून्यवत् भासणे अगदी स्वाभाविक आहे. माधवरावजींचे चरित्र दुसरीकडे सविस्तर दिले आहे त्यावरून कॉलेजात असताना त्यांच्या विद्वत्तेचा लौकिक कसा वाढला होता, पुढे नोकरीत त्यांचा प्रवेश कसा झाला, तेथे त्यास कोणकोणते मान मिळाले व अखेरीस हायकोर्ट जज्जाच्या जागेपर्यंत त्यांची मजल कशी पोहोचली वगैरे गोष्टी वाचकास कळून येतील. अलौकिक बुद्धिमत्ता, दीर्घ व सतत व्यासंग, देशाबद्दलची खरी कळकळ, विद्यार्जनाचे स्वाभाविक जडलेले व्यसन, अचूक कल्पकपणा वगैरे अनेक गुणांनी माधवरावजींचे चरित्र बोधप्रद असून महत्त्वाचे झाले आहे. याखेरीज राजदरबारी व लोकांत त्यांस जो वेळोवेळी मान मिळत गेला आणि

लोकांची व सरकारची जी कामगिरी त्यांनी बजाविली, तीही काही साधारण नाही. दुसऱ्या कोणा पुरुषाच्या हातून एवढीच कामगिरी जरी झाली असती, तरीदेखील त्यांची थोर पुरुषांत गणना करावी लागली असती. पण रावसाहेबांकरता (न्यायमूर्ती हे कृत्रिम नाव सोडून देऊन आम्हा पुणेकर लोकांच्या तोंडी बसलेल्या त्यांच्या नेहमीच्या नावानेच येथे उल्लेख करणे आम्हांस अधिक प्रशस्त वाटते.) आज महाराष्ट्रातील प्रत्येक समजूतदार मनुष्य जो हळहळत आहे तो ते काही हायकोर्टचे जज्ज होते, प्रार्थना समाजाचे अध्यक्ष होते किंवा सामाजिक सुधारणेचे अध्वर्यू होते म्हणून नव्हे. या गोष्टी थोरपणा प्राप्त होण्यास साधनीभूत नाहीत असे नाही. पण तेवढ्याने माधवरावजींच्या थोरपणाची उपपत्ती लागत नाही, अशी आमची समजूत आहे. कै.कृष्णशास्त्री चिपळूणकरांसारखे बुद्धीने बृहस्पतितुल्य विद्वान आमच्यात झाले नाहीत असे नाही. प्रार्थना समाज किंवा समाजसुधारणा यांचे नि:सीम भक्तही माधवरावजींच्या बरोबरीचे किंवा कांकणभर जास्त असू शकतात. हायकोर्टात एक नेटिव्ह जज्ज असावयाचा असा सरकारचा जोपर्यंत विचार आहे, तोपर्यंत नेटिव्ह हायकोर्ट जज्जाचीही परंपरा कायम राहील. माधवरावजींकरता महाराष्ट्रदेश जो आज हळहळत आहे व आपले अपरिमित नुकसान झाले असे आज जे प्रत्येकास वाटत आहे, ते काही असल्या बाह्य गुणांकरिता नव्हे. न्यायमूर्ती हे मार्मिक लेखक, चांगले वक्ते, उत्तम विद्वान अलौकिक बुद्धिमान, जबर विद्याव्यासंगी, असाधारण कल्पक आणि सरळ मनाचे व शांत स्वभावाचे होते, हे सर्वांस महशूर आहे. पण कमलाची खरी योग्यता ज्याप्रमाणे पाकळ्यांच्या आकारात, रंगात किंवा मार्दवात नसता त्याच्या सुगंधीपणात असते, तद्वत् माधवरावजींच्या खऱ्या लोकप्रियतेचे व मोठेपणाचे बीज ज्यास पाहणे आहे, त्याने वरील गुणांखेरीज दुसऱ्या काही गोष्टींचा विचार केला पाहिजे.

हा विचार कोणता, हे सांगण्यापूर्वी माधवरावजी पुण्यास पहिल्याने जेव्हा आले तेव्हा पुणे किंवा महाराष्ट्र याची काय स्थिती होती, याचे थोडक्यात निदर्शन केले पाहिजे. एक राज्य जाऊन दुसरे राज्य कायम होईपर्यंत मध्यंतरी जो काल जातो, तो राष्ट्राच्या अभिवृद्धीस पुष्कळ प्रकारे प्रतिबंधक असतो, हे ऐतिहासिक तत्त्व सुप्रसिद्ध आहे. सन १८२० पासून १८७० पर्यंत महाराष्ट्रदेशाची स्थिती अशाच प्रकारची होती. ज्या पुणे शहरात नाना फडणीसासारख्या मुत्सद्यानी काही वर्षे वास्तव्य करून मराठी राज्याचा गाडा हाकला आणि जेथे पेशवाईची अखेर होईपर्यंत मुत्सद्दी व शूर पुरुषांची परंपरा कायम होती, तेथे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सर्व बाबतींत बहुतेक प्रेतकळा आली होती, असे म्हटले असता त्यात अतिशयोक्ती होणार नाही. ज्या सरदार घराण्यातील पुरुषांनी पेशवाईत मोठमोठी कामे केली होती, त्याच्या वंशजास इंग्रज सरकारने पेन्शन घेऊन स्वस्थ बसण्यास सांगितले असल्यामुळे नवीन राज्यव्यवस्थेच्या बरे-वाईटपणाबद्दल विचार करण्याचे त्याचे कुलव्रत त्यांनी सोडून दिले होते. देशाचे पुढारीच असे कर्तव्यपराङ्मुख झाल्यावर गरीब रयतेची स्थिती कशी झाली असेल, हे सांगावयास नकोच. टोपीवाल्याची राज्य करण्याची शिस्तवार रीत, चोहीकडे त्याने घालून दिलेली कायद्याची बंधने, जमीनपाहणी, आगगाड्या, तारायंत्रे, शाळा, पोस्ट ऑफिस वगैरे राज्यव्यवस्थेच्या अपूर्व थाटाने लोक दिपून गेल्यासारखे झाले होते. त्यातून बंडवाल्यांचा पराभव झाल्यानंतर तर इंग्रजी राज्याची अधिकच छाप बसली गेली. जुन्या सरदार घराण्यांतील पुरुषांस राजकारणात पडण्याची जरूर नसल्यामुळे त्याच्या अंगचे गुण लुप्तप्राय झाले व पुणे पाठशाळेतून तयार झालेले नवीन विद्वान सरकारी नोकरीत आणि त्यामुळे प्राप्त झालेल्या मानातच दंग होऊन राहिले. जी पुण्याची, तीच सगळ्या महाराष्ट्राची स्थिती होती. माधवरावजी पुण्यास येण्यापूर्वी येथील विश्रामबाग कॉलेज किंवा पूना कॉलेजमधून बुद्धिवान व विद्वान मंडळी तयार होऊन बाहेर पडली नव्हती असे नाही, पण वर निर्दिष्ट केलेल्या अनेक कारणांमुळे राष्ट्रामधील चळवळ अगदी बंद पडून गेली होती व कोणास आपण पुठे काय करावे, हे सुचत नसून आपली हल्लीची स्थिती बरी किंवा वाईट हेही कळत नव्हते. ज्या प्रांतातील लोकांनी एकदा मराठी राज्याचा गाडा हाकला होता, त्यातील पुढाऱ्यांच्या वंशजांची दोन पिढ्यांत अशी स्थिती होऊन जावी, ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय. पण माधवरावजींनी पुण्यात जेव्हा पाऊल ठेवले, तेव्हा या महाराष्ट्राच्या जुन्या राजधानीची स्थिती वरच्याप्रमाणे झाली होती, यांत बिलकुल संदेह नाही. कोणत्याही प्रकारची चळवळ करण्याविषयी पराङ्मुखता आणि केवळ स्वहितपरायणतेमुळे अथवा पूर्वीच्या अमदानीत ज्या गुणाची चाह होत होती तेच गुण नेटिवांच्या अंगी तरी असण्याची आवश्यकता न राहिल्यामुळे एक

प्रकारचे लोकांच्या पुढाऱ्यांच्या अंगी आलेले शैथिल्य हेच काय ते सर्व देशभर नजरेस येत होते. लोकांच्या अंगचे तेज अगदीच नाहीसे झालेले होते असे नाही, पण वर लिहिलेल्या कारणांमुळे महाराष्ट्रदेश म्हणजे त्या वेळी एक थंड गोळा होऊन पडला होता. या थंड्या गोळ्यास कोणत्या तऱ्हेने ऊब दिली असता तो पुन्हा सजीव होईल व हात-पाय हलवू लागेल- याचा रात्रंदिवस एकसारखा विचार करून अनेक दिशांनी, अनेक उपायांनी, अनेक रीतींनी त्यास पुन्हा सजीव करण्याचे दुर्धर काम अंगावर घेऊन त्याकरता जिवापाड जर कोणी मेहनत केली असेल, तर ती प्रथमतः माधवरावजींनीच केली, असे म्हटले पाहिजे. व आमच्या मते, हेच त्यांच्या थोरवीचे किंवा असामान्य मोठेपणाचे मुख्य चिन्ह होय. मुंबईच्या कॉलेजात विद्याभ्यास करीत असताना इंग्रजी विद्येने माधवरावजींच्या मनावर जे परिणाम झाले असतील अथवा त्यांच्या अंत:करणात जो प्रकाश पडला असेल, त्याखेरीज त्यांच्या मनाची सार्वजनिक चळवळीकडे प्रवृत्ती होण्यास डॉ.भाऊ दाजी, दादाभाई नौरोजी वगैरे थोर गृहस्थांची प्रत्यक्ष उदाहरणे बरीच कारणीभूत झाली असावीत. एवढी गोष्ट निर्विवाद आहे की, माधवराव मुंबई सोडून कायमचे पुण्याच्या प्रिन्सिपॉल सदर अमिनच्या जागेवर आले, तेव्हा दादाभाई नौरोजींसारख्या पुढारी गृहस्थाच्या उदाहरणाने व कृतीने त्यांच्या मनावर बराच परिणाम झालेला होता. माधवरावजी मुंबईसच राहाते, तर आपल्या असाधारण बुद्धिसामर्थ्याने त्यांनी तेथेही उत्तम लौकिक संपादन केला असता, यात बिलकुल शंका नाही. तथापि, महाराष्ट्राची राजधानी जे पुणे शहर- तेथे येऊन त्यांस जी कामगिरी करावयास सापडली, त्यामुळे माधवरावजींच्या अंगचे अलौकिक गुण लोकांच्या पूर्णपणे नजरेस आले, असे म्हणण्यास काही हरकत नाही. सरकारी नोकरीचे काम चांगल्या रीतीने सांभाळून देशाच्या उत्कर्षाकरिता कोणकोणत्या दिशेने काय काय प्रयत्न केले पाहिजेत हे ठरविणे व ते अमलात आणण्याकरिता सतत परिश्रम करून जागरूकता ठेवणे, हे काही सामान्य बुद्धिमान पुरुषाचे काम नव्हे. कित्येकांस नित्य व्यवसायापुढे सार्वजनिक कामे सुचत नाहीत, सुचली तर करण्याची उमेद नसते; आणि यदाकदाचित करण्यास प्रवृत्त झाले तर त्यास मनुष्यबळ किंवा इतर जी सामग्री लागते, ती ज्या उपायांनी प्राप्त करून घ्यावयाची ते उपाय योजण्यास ते असमर्थ असतात. कित्येक विद्वानांची तर या व्यापक प्रश्नाने बुद्धीच गुंग होऊन जाते व कित्येक एकदेशीय असून कोणास अमुक एक दिशेने राष्ट्राची उन्नती होईल असे वाटत असल्यास दुसरीच दिशा पसंत पडते. माधवरावजींच्या अंगचा पहिला गुण हा होय की, सर्व बाजूंनी राष्ट्राची उन्नती झाली पाहिजे असे त्यांस वाटत होते. या सर्व दिशांचे व बाजूंचे सांगोपांग परीक्षण करून त्यांच्या योग्यायोग्यतेबद्दल निर्णय करण्याइतकी परमेश्वराने त्यांस प्रगल्भ व व्यापक बुद्धी दिली होती. धर्मव्यवस्था, समाजसुधारणा, उद्योगधंदे, शिक्षण,

राजकीय व्यवस्था वगैरे सर्व बाबतींत आम्ही मागे आहोत आणि या सर्व गोष्टींत सुधारणा झाल्याखेरीज इतर सुधारलेल्या राष्ट्राची आपणास बरोबरी करता यावयाची नाही, असा त्यांचा पक्का ग्रह झालेला होता. यांपैकी काही बाबतींत त्यांची मते पुढे ज्या नवीन चळवळी निघाल्या, त्यामुळे सर्व लोकांस पसंत पडेनाशी झाली होती. पण तेवढ्याने त्याची योग्यता कमी होते असे नाही. घाटातून एकदा एका कुशल इंजिनिअरने आगगाडीची लाइन मारल्यानंतर त्यात सुधारणा करणारे जरी पुष्कळ लोक निघाले, तरी ज्याप्रमाणे मूळ इंजिनिअरच्या कल्पकपणास कमीपणा येत नाही, तद्वत्‌च रावसाहेब रानडे यांची स्थिती होय. वर सांगितल्याप्रमाणे सर्व प्रकारे थंड झालेल्या देशाच्या प्रत्येक गात्रास कसे सजीव करता येईल, याचा रात्रंदिवस विचार करणारा तीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रात एकच पुरुष झाला. सन १८०० मध्ये निवर्तलेल्या नाना फडणीसास मोडकळीस आलेली पेशवाई कशी सुरक्षित ठेवावी याची ज्याप्रमाणे रात्रंदिवस काळजी वाटत असे, तद्वत्‌च एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी पंचवीस-तीस वर्षे माधवरावजींनी राज्यक्रांतीने काही वेळ स्तब्ध झालेल्या महाराष्ट्रास कसे सजीव करता येईल, या काळजीत घालविली. केवळ महाराष्ट्राकरताच नव्हेत, तर सर्व हिंदुस्थानबद्दल अशाच तऱ्हेचे विचार त्यांच्या मनामध्ये सदैव घोळत असत. पाश्चिमात्य शिक्षणाबरोबरच एक प्रकारची सार्वजनिक जबाबदारी आपणावर येऊन पडते, ही गोष्ट माधवरावांनी पुरी ओळखली होती व आपल्या पंचवीस-तीस वर्षांच्या वर्तनक्रमाने लोकांस ती जबाबदारी कशी बजवावी, याचे उत्कृष्ट उदाहरण घालून देऊन त्यांनी महाराष्ट्राचाच नव्हे तर हिंदुस्थान देशाचा लौकिक राखला, असे म्हणणे भाग आहे.

हिंदुस्थानची किंवा महाराष्ट्रदेशाची जागृती अमुक उपायाने होईल आणि अमुक उपायाने होणार नाही, हे ठरविण्यास असामान्य व व्यापक बुद्धी लागते, हे वर सांगितलेच आहे. पण अशा प्रकारची अलौकिक बुद्धी असूनही जर दुसरे गुण पुढाऱ्यांच्या अंगी नसतील, तर त्यांच्या हातून मोठीशी कामगिरी कधीही व्हावयाची नाही. राष्ट्राची उन्नती होण्यास ज्या हजारो गोष्टी कराव्या लागतात, त्या एकट्याच्या हातून होत नाहीत. त्यास योग्य माणसांची निवड करून त्यांचे साह्य घ्यावे लागते; किंबहुना, अशा प्रकारची माणसे तयार करावी लागतात, असे म्हटले तरी चालेल. माणसे तयार करण्याचे हे काम किती कठीण आहे, हे अनुभवांवाचून समजणे अशक्य आहे. मनुष्याची पारख, त्यांच्या हातून चुका घडल्या असताना त्यांस शांतपणे सांभाळून घेऊन पुन्हा उत्तेजन देण्यास अवश्य लागणारे उत्साह, शांती वगैरे गुण पुढाऱ्यांचे अंगी जरूर असावे लागतात. माधवरावजींच्या अंगी हे गुण पूर्णपणे वसत होते व म्हणूनच त्यांच्या हातून इतकी कामे येथे सिद्धीस गेली. सार्वजनिक सभा, वक्तृत्व सभा, लवाद कोर्ट, प्रार्थना समाज, फिमेल हायस्कूल, औद्योगिक चळवळ वगैरे ज्या अनेक संस्था पुणे शहरात झाल्या किंवा आहेत, त्या सर्वांशी माधवरावजींचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने संबंध होता असे आढळून येईल. या सर्व चळवळी सुरू ठेवण्याबद्दल लोकमत जागृत करून कायम ठेवणे, निरनिराळ्या संस्थांकरता निरनिराळी मनुष्ये पाहून त्यांच्या हातून ती ती कामे करून घेणे, स्वदेशातल्या किंवा परदेशातल्या सर्व प्रकारच्या हालचालींवर नजर ठेवून त्याचा देशाच्या उत्कर्षाशी कसा संबंध पोहोचतो, याचे अहोरात्र मनन करणे- हे माधवरावजींचे व्यसनच होऊन राहिले होते. त्यांच्या घरी केव्हाही जा, तेथे काही ना काही तरी सार्वजनिक विषयाची चर्चा चालू असावयाचीच. बारा आणि बारा चोवीस तास अशा रीतीने सार्वजनिक कामांत एकसारखे मन घालून ती सुयंत्रित रीतीने चालविण्याइतके बुद्धिसामर्थ्यच आधी फार थोड्या लोकांत असते आणि ज्या थोड्या लोकांच्या अंगी अशा प्रकारचे सामर्थ्य असते त्यांस आलस्याने, स्वहितपरतेने किंवा उत्साहभंगाने पछाडले असल्यामुळे युनिव्हर्सिटीतून दरसाल शेकडो ग्रॅज्युएट बाहेर पडताहेत, तरी रात्रंदिवस देशहितार्थ तन-मन-धन अर्पणारा 'यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः' या न्यायाने एखादाच माधवरावजींसारखा पुरुष निर्माण होतो. असा पुरुष आपल्यामधून गेला असता, एकाएकी सूर्यास्त झाल्याप्रमाणे सर्व लोक दिङ्‌मूढ झाले, यात काही आश्चर्य नाही.

माधवरावजींनी जी ही सर्व कामे केली, ती त्यांस सुखाने करता आली, अशी जर कोणाची समजूत असेल, तर ती चुकीची आहे. मुंबईपेक्षा पुणे किंवा महाराष्ट्रदेश यांतील अधिक एकरूप असल्यामुळे सार्वजनिक चळवळीचे माधवरावजींनी मुंबईहून आणलेले बी येथे लवकरच उदयास आले, हे गेल्या पंचवीस-तीस वर्षांच्या महाराष्ट्राच्या इतिहासावरून कोणासही सहज समजण्यासारखे आहे. हे बी

रुजत घालून त्यास पाणी घालणे व पुढे तज्जन्य वृक्षाचे पालनपोषण करणे, हे सर्व काम माधवरावजीच करीत होते. त्यांच्या हाताखाली कै. सार्वजनिक काका, कै. सीतारामपंत चिपळोणकर, रा.रा.शिवराम हरि साठे वगैरे बरीच मंडळी असून पुढे पुढे कै.रा.ब. नूलकर, कै.कुंटेंसारख्यांचेही साह्य त्यास मिळाले होते. पण या सर्व गृहस्थांची व त्यांनी चालविलेल्या कामाची मदार काय ती माधवरावजींवरच असे. ही गोष्ट लवकरच सरकारच्या नजरेस आली. मल्हारराव गायकवाड यांस पदच्युत केल्यानंतर त्यांची कमिशनमार्फत जी चौकशी झाली, तेव्हा पुणे शहरात झालेली चळवळ आणि सन १८७९ मध्ये बुधवारवाडा जळाला असता, गावात झालेली धामधूम ज्यास आठवत असेल, ते रावसाहेबांनी अंगीकारलेला क्रम बिनधोक्याचा होता, असे कधीही म्हणणार नाहीत. महाराष्ट्रातील लोकांस

सन १८०० मध्ये निवर्तलेल्या नाना फडणीसास मोडकळीस आलेली पेशवाई कशी सुरक्षित ठेवावी याची ज्याप्रमाणे रात्रंदिवस काळजी वाटत असे, तद्वत्च एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी पंचवीस-तीस वर्षे माधवरावजींनी राज्यक्रांतीने काही वेळ स्तब्ध झालेल्या महाराष्ट्रास कसे सजीव करता येईल, या काळजीत घालविली. केवळ महाराष्ट्राकरताच नव्हेत, तर सर्व हिंदुस्थानबद्दल अशाच तऱ्हेचे विचार त्यांच्या मनामध्ये सदैव घोळत असत. पाश्चिमात्य शिक्षणाबरोबरच एक प्रकारची सार्वजनिक जबाबदारी आपणावर येऊन पडते, ही गोष्ट माधवरावांनी पुरी ओळखली होती व आपल्या पंचवीस-तीस वर्षांच्या वर्तनक्रमाने लोकांस ती जबाबदारी कशी बजवावी, याचे उत्कृष्ट उदाहरण घालून देऊन त्यांनी महाराष्ट्राचाच नव्हे तर हिंदुस्थान देशाचा लौकिक राखला, असे म्हणणे भाग आहे.

सार्वजनिक बाबतींत चळवळ करण्याचे जर कोणी शिक्षण देत असेल तर ते माधवरावजीच होत. ही गोष्ट सरकारास कळून चुकली होती आणि माधवरावजींची पुण्याहून नाशिक व नाशिकाहून धुळ्यास जी उचलबांगडी झाली, ती काही केवळ एक जागी एक मनुष्य पुष्कळ वेळ ठेवणे योग्य नाही एवढ्याचकरता नव्हे, हे सर्वांस माहीत आहेच. फार लांब कशाला, माधवरावजींनी स्थापन केलेली सार्वजनिक सभा ही राजद्रोही आहे, असा सर रिचर्ड टेपलच्या कारकिर्दीत बूट निघाला होता; पण या सर्व अडचणींतून आणि संकटांतून धिमेपणाने माधवराव यांनी हातात धरलेली सर्व कार्ये तडीस नेली. यांच्यापेक्षा कमी उत्साहाचा पुरुष प्रसंगी डगमगून गेला असता. पण रावसाहेबांच्या बुद्धीचे व्यापकत्व जितके अलौकिक होते तितकाच शांती हा गुण त्यांचे अंगांत असामान्य असल्यामुळे त्यांच्या दीर्घोद्योगास अखेरीस यश येऊन मुंबई इलाख्याच्या मध्यभागात एक प्रकारची विशेष जागृती प्राप्त झाली. माधवरावजींसारखे पुरुष जेथे निपजले नाहीत, तेथल्या आणि महाराष्ट्राच्या स्थितीची तुलना केली असता आमच्या म्हणण्याची सत्यता कळून येईल. सारांश- महाराष्ट्रात जर काही आजमितीस जोम आढळून येत असला, त्यातील वक्ते व लेखक जर निर्भयपणे सार्वजनिक गोष्टीची चर्चा करीत असले; तर ते माधवरावजींच्या २५ वर्षांच्या दीर्घोद्योगाचे फल होय, असे म्हणण्यास कोणतीही हरकत नाही.

अशा तऱ्हेचा पुरुष देशात निर्माण होणे हे देशाचे एक भाग्यच आहे. विद्वत्ता, मुत्सद्दीपणा, काम करण्याची हौस, सार्वजनिक हित कोणत्या उपायांनी करता येईल याबद्दल एकसारखा निदिध्यास आणि लोकांनी नेहमी आपल्या उन्नतीच्या चळवळीत व्यग्र असावं अशी अनिवार इच्छा- इतके गुण अंगी वसत असलेले थोर पुरुष राष्ट्रांत वारंवार निपजत नसतात. महाराष्ट्रदेशात अठराव्या शतकात नाना फडणीस अशा प्रकारचे मुत्सद्दी होऊन गेले खरे, पण विद्वत्तेचे मान लक्षात आणता, त्यांची आणि माधवरावजींची तुलना करण्यापेक्षा महाराष्ट्राच्या किंवा दक्षिणेच्या प्राचीन इतिहासात प्रसिद्धीस आलेले हेमाद्री किंवा माधवाचार्य यांची उपमा आमच्या मते माधवरावजींस अधिक साजण्यासारखी आहे. माधवाचार्यांची बुद्धी चोहोकडे अकुंठित असल्यामुळे त्यांस 'सर्वज्ञः स हि माधवः' असे म्हणत असत. माधवरावजींचे बुद्धिवैभवही अशाच प्रकारचे विस्तृत व व्यापक होते आणि या इंग्रजी

राज्यांत जर हायकोर्टच्या जज्जाच्या कामापलीकडे त्यांच्या विशाल बुद्धीचा उपयोग झाला नाही तर, तो दोष माधवरावजींचा नव्हे– हल्लीच्या राज्यपद्धतीचा आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. माधवरावजी जर आणखी काही दिवस जगते, तर त्यांनी सुरू केलेल्या चळवळी उघड रीतीने हाती घेऊन दादाभाई किंवा ह्यूम यांच्याप्रमाणे त्या शेवटास नेण्याचा उद्योग निकराने होण्याचा संभव होता. पण त्यांच्या हातून आम्हा लोकांचे अशा प्रकारे कल्याण व्हावे असा ईश्वरी संकेत नव्हता, असेच म्हटले पाहिजे. एरव्ही त्यांस ६० वे वर्ष लागले म्हणून त्यांची ज्युबिली करण्याऐवजी त्यांचा मृत्युलेख लिहिण्याचा दुःखकारक प्रसंग आमच्यावर आला आहे तो आला नसता.

माधवरावजींचा महाराष्ट्राकडे आणि महाराष्ट्राचा माधवरावजींकडे विशेष ओढा का होता, याचा यावरून विशेष खुलासा होईल. कायदेपंडित, लेखक वगैरे बाबतींत माधवरावजींची योग्यता इतर कोणत्याही राष्ट्रीय पुढाऱ्यापेक्षा कमी नव्हती. किंबहुना, सर्व विषय अवगत करून घेण्याची हौस आणि कोणताही विषय हाती घेतला असता त्यासंबंधी काही तरी नवी शक्कल काढून त्यास मनोहर रूप देण्याची त्यांची अपूर्व हातोटी दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रीय पुढाऱ्यांत सापडेल, असे आम्हास वाटत नाही. पण याहीपेक्षा त्यांच्या अंगचा लोकोत्तर गुण म्हटला म्हणजे– आपल्या राष्ट्राचा, अभ्युदय केव्हा ना केव्हा तरी खास झाला पाहिजे, किंबहुना ही गोष्ट परमेश्वरानेच संकल्पित आहे, अशी जी त्यांच्या ठायी उमेद होती, ती होय. भावी सुपरिणामाबद्दल अशा तऱ्हेची निःसंशय मनोवृत्ती फारच थोड्या पुढाऱ्यांचे ठायी आढळून येते. सरकारचा ताबेदारपणा, योग्य माणसांची कमतरता, समाजामध्ये रूढ असलेल्या समजुती इ. अनेक कारणांनी माधवरावजींस आपल्या मनाप्रमाणे सर्व गोष्टी करता आल्या नाहीत, तथापि दूरवर नजर देऊन धीमेपणाने अंगीकृत कार्ये त्यानी अव्याहत रीतीने चालू ठेवली होती.

प्राचीन व अर्वाचीन सुधारणेच्या झगड्यात मनुष्यास पदोपदी कसे बुचकळल्यासारखे होते, याचे एके प्रसंगी त्यांनी मोठ्या मार्मिक रीतीने वर्णन केले आहे. या सर्व अडचणी सोसून देशोन्नतीच्या कार्याकरता उत्साहाने भगवा झेंडा हाती घेऊन बिनतक्रार सदैव पुढे राहणे, हे काही लहानसहान मुत्सद्दीपणाचे काम नव्हे. पण माधवरावजींची लोकसेवा एवढ्यावरच थांबली नाही. त्यांनी आपल्या हयातीत आपल्या जन्मभूमीतील लोकांस शहाणे करून सोडण्याचा क्रम अबाधित चालू ठेवला होता. राष्ट्रामध्ये लिहिणारे व बोलणारे पुढारी जरी पुष्कळ असले, तरी अशा रीतीने समाजामध्ये जागृती उत्पन्न करण्याचे गुरुत्व ज्यांच्याकडे देता येईल, असे लोक फारच विरळा आहेत. माधवरावजी हे अशा विभूतींपैकीच एक होते व म्हणूनच त्याचकरिता आज सर्व लोक आम्हा सर्वांचा एक अप्रतिम हितकर्ता गेला म्हणून हळहळत आहेत. अशा तऱ्हेचा पुरुष इंग्रजी राज्य झाल्यापासून तरी महाराष्ट्रात निघाला नाही व पुढेही माधवरावजींची जागा लवकर भरून येईल असे वाटत नाही.

अशा तऱ्हेचा पुरुष काळाने आमच्यामधून ओढून न्यावा, हे आमचे मोठे दुर्दैव होय. माधवरावजींच्या कुटुंबाची त्यांच्या मृत्यूने जी हानी झाली आहे, ती तर खरोखरीच दुष्परिहार्य होय. त्यांच्यावर हा दुःखाचा डोंगर कोसळला आहे खरा व आम्ही कितीही शांतवन केले तरी ते दुःख कमी होणे कठीण आहे. तथापि, महाराष्ट्रातील प्रत्येक जण त्यांच्या दुःखाचा वाटेकरी आहे, या गोष्टीकडे लक्ष देऊन त्या आपले मन विवेकाने आवरतील आणि महाराष्ट्रातील लोक ज्या महापुरुषाच्या मृत्यूकरता आज आपण सर्व जण दुःख करीत आहोत, त्यांचेच उदाहरण आपणांपुढे ठेवून यथाशक्ती पण खऱ्या कळकळीने त्यांनी घालून दिलेला कित्ता गिरवून त्यांच्या ऋणांतून अंशतः तरी मुक्त होतील, अशी आम्हास आशा आहे. माधवरावजी तर गेलेच पण त्यांनी घालून दिलेले उदाहरण डोळ्यांपुढे ठेवून सर्व जण जर देशकार्याकरता यथाशक्ती झटण्याचा प्रयत्न करतील, तर आपल्या सर्वांस जी गोष्ट हवी आहे, ती प्राप्त झाल्याखेरीज कधीही राहणार नाही. माधवरावजींच्या गुणाबद्दल जितके जास्त लिहावे तितके थोडेच आहे; याकरता आजचा लेख आम्हास जरी अपुरा वाटत आहे, तरी माधवरावजींस त्यांच्या सत्क्रमाप्रमाणे गती मिळो, एवढी अखेरीस प्रार्थना करून दुखवट्याचा लेख येथेच संपवितो.

(लोकमान्य टिळक यांनी १८८७ ते १९२० या काळात 'केसरी'चे संपादक असताना विपुल लेखन केले, ते सर्व अनेक खंडांमध्ये संग्रहित करण्यात आले आहे. त्यातील 'लोकमान्य टिळक लेखसंग्रह'मधील संकीर्ण खंडातून हा लेख घेतला आहे.)

लोकमान्य
स्मृतिशताब्दी

महापुरुषांचे जीवाश्म होऊ नये म्हणून...

सदानंद मोरे

डॉ. सदानंद मोरे स्वतःला 'महाराष्ट्राच्या लोकव्यवहाराचे अभ्यासक' इतकंच म्हणवून घेत असले, तरी ते महाराष्ट्राच्या इतिहासाचे देशातील एक महत्त्वाचे भाष्यकार आहेत. 'लोकमान्य ते महात्मा' या द्विखंडात्मक महाग्रंथात त्यांनी लोकमान्य टिळक ते महात्मा गांधी हे महाराष्ट्राचं स्थित्यंतर मोठ्या ताकदीने आणि तपशिलाने मांडलं. त्यामुळे लोकमान्यांच्या अभ्यासाचा नवा आयाम प्रस्थापित झाला. शिवाय त्यांनी सविस्तर टिळकचरित्रही लिहिलं. या सगळ्याच्याही आधी लिहिलेल्या 'तुकाराम दर्शन'पासून काही महिन्यांपूर्वी आलेल्या 'विद्रोहाचे व्याकरण' या महात्मा फुलेंच्या वैचारिक चरित्रापर्यंत जवळपास प्रत्येक ग्रंथात कमी किंवा जास्त टिळक सापडतात. त्यामुळे टिळकांवरचं नवं वैचारिक लेखन इतरत्र थांबलेलं असताना मोरेसरांना गवसलेले लोकमान्य महत्त्वाचे ठरतात. लोकमान्यांच्या स्मृतिशताब्दीच्या निमित्ताने त्यावरची ही प्रश्नोत्तरं.

प्रश्न – सर, महाराष्ट्राचा अभ्यास करताना लोकमान्य टिळकांनी तुम्हाला पहिल्यांदा कधी खुणावलं आणि पुढे तुम्ही त्यांच्या प्रभावाचा माग कसा काढलात?

– लोकमान्य टिळकांचा परिचय महाराष्ट्रातल्या विद्यार्थ्यांना असतोच. 'शेंगा खाल्ल्या नाहीत, टरफलं उचलणार नाही...' टिळक-आगरकर वाद... कॉलेजमध्ये असताना तब्येतीसाठी ड्रॉप घेतला होता, वगैरे. मग तिथून एकदम जातो 'स्वराज्य माझा जन्मसिद्ध अधिकार आहे'. हे मलाही माहीत होतंच. पण माझ्या वडिलांकडे खूप पुस्तकं होती. त्यात 'टिळक भारत' नावाचं शि.ल. करंदीकर यांनी लिहिलेलं टिळकचरित्रही होतं. शिवाय गीतारहस्यही होतं. शाळेत असतानाच ते माझं वाचून झालं होतं. गीतेचा, ज्ञानेश्वरीचा अभ्यास करताना वडिलांबरोबर गीतारहस्यावरून चर्चाही व्हायच्या. त्यामुळे एखाद्या अभ्यासकाला टिळकांविषयी किमान माहिती हवी असते, त्याचा पाया अगदी शालेय वयातच घातला गेला होता.

पण मी टिळकांकडे स्पेसिफिक कसा वळलो, ते इंटरेस्टिंगच आहे. विश्राम बेडेकरांचं 'टिळक आणि आगरकर' हे नाटक आलं होतं. तेव्हा मी अहमदनगरला प्राध्यापक होतो. ते नाटक मी पाहिलं. बेडेकरांनी अशी भूमिका घेतली होती, मी आगरकरांना न्याय देऊ इच्छितो.

तेदेखील टिळकांसारखे स्वराज्यप्रेमीच होते, वगैरे वगैरे. ते सांगत होते की, मी आगरकरांचा समर्थक आहे. पण प्रत्यक्ष नाटकामध्ये टिळकांचं चित्रच जास्त उठावदार झालं.

त्याच्या आधी मी अहिताग्नी शंकर रामचंद्र राजवाडे यांचं आत्मवृत्त वाचलं होतं. हा फार मोठा माणूस होता. त्यांची बरीचशी धोरणं प्रतिगामी असल्यामुळे ती लोकांना आज आवडणार नाहीत. पण त्या काळची सामाजिक परिस्थिती काय होती, ते समजून घ्यायला त्यांचं आत्मवृत्त फार महत्त्वाचं आहे. त्यामुळे मला नाटकात बेडेकर कुठे फसलेत, याचा अंदाज आला. म्हणून मी टिळक आणि आगरकर नाटकाचं परीक्षण करणारा एक लेख लिहिला. आमचा एक ज्येष्ठ स्नेही कॉ.भास्करराव जाधव 'श्रमिक विचार' नावाचं पत्र चालवायचे. त्यात मी दर रविवारी लिहायचो. त्यात मी लिहिलं की, बेडेकरांनी आगरकरांना कात्रजचा घाट दाखवला. कारण ते म्हणतात– मी आगरकरांचा पाठीराखा आहे, पण त्यांनी जास्त झुकतं माप टिळकांना दिलं. मी ते पुराव्यानिशीही मांडलं. त्यात आगरकर आणि टिळक ही काय भानगड आहे, याकडे माझं लक्ष गेलं.

त्याच वेळी य.दि. फडकेंनी या नाटकासंबंधी लिहिलं होतं. भाषणं केली होती. त्यात त्यांनी लिहिलं होतं की, यात आगरकरांचं चित्र हिणकस झालेलं आहे. आमचं मत एकच होतं. फडके त्या काळातले आधुनिक महाराष्ट्राचे फार मोठे अभ्यासक. मी त्या विषयात फारसा प्रसिद्ध नसलेला. संतसाहित्याचा अभ्यासक म्हणून थोडंफार नाव होतं, नाही असं नाही. पण फडकेंनी माझा लेख वाचला. तो त्यांना खूप आवडला. फडकेंकडे महाराष्ट्राच्या इतिहासाची अद्ययावत साधनं होती. माझ्याकडे तसं काहीच नव्हतं. पण मी मधल्या जागा कल्पनेने भरून काढल्या होत्या.

य.दि. फडकेंनी मला बोलावलं. फडके त्या वेळेला पुणे विद्यापीठात पोलिटिकल सायन्सला होते. आमच्या गप्पा झाल्या. चांगली मैत्रीही झाली. त्या वेळी ते आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासाचा एक प्रोजेक्ट करत होते. त्यात राजेंद्र व्होरा, यशवंत सुमंत, सुहास पळशीकर अशी सगळी राज्यशास्त्राची मंडळी होती. मी तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक. तरीही मला बोलावलं. ते मला बरं वाटलं. त्यात फडकेंची कॉम्प्लिमेंट– तुमचं वाचन सखोल आणि चौफेर आहे. अरे म्हटलं, असं आहे का? मी त्यांना होकार दिला. सगळ्यांनी मिळून करायचा प्रोजेक्ट काही झाला नाही. अर्थात फडकेंनी तो पुढे आपल्या पद्धतीने एकहाती पूर्ण केला. पण माझ्या आधुनिक महाराष्ट्राचा अभ्यास सुरू होता. आधुनिक महाराष्ट्रावरचा संतसाहित्याचा प्रभाव हा माझा कुतूहलाचा विषय होता. त्यामुळे मी 'तुकाराम दर्शन' लिहिलं. तुकाराम दर्शनची पार्श्वभूमी आधुनिक महाराष्ट्रच आहे. एका अर्थाने आधुनिक महाराष्ट्राचा एका विशिष्ट दृष्टिकोनातून लिहिलेला तो इतिहासच आहे.

प्रश्न – 'तुकाराम दर्शन' ही तुमची साप्ताहिक सकाळमध्ये दीर्घ काळ चाललेली लेखमालिका. त्यानंतर 'लोकमान्य ते महात्मा' ही मालिकाही दीर्घ काळ चालली. पहिल्या लेखमालेचा दुसऱ्या लेखमालेशी काही संबंध होता, की दुसरी स्वतंत्रपणे जन्माला आली?

– तेच सांगत होतो मी. 'तुकाराम दर्शन' संपता–संपता मला एक गोष्ट जाणवली. टिळक १९२० मध्ये वारले. गांधीजींचं आगमन झालं. टिळकांच्या ज्या अनुयायांना गांधीजी पटत नव्हते, त्यांनी गांधींना विरोध केला; तो कोणत्या ग्राऊंडवर केला? त्या विरोधाची पायाभरणी इतिहासाचार्य वि.का. राजवाडेंनी तुकाराम विरुद्ध रामदास या वादाने केली होती. तुकोबा आणि त्यांचा वारकरी संप्रदाय हा नेभळट, निवृत्तिवादी आहे वगैरे. त्यांच्यामुळे स्वराज्य गेलं. आणि रामदास म्हणजे प्रवृत्तीवादी, लढाऊ वगैरे. त्याच प्रभावातले पत्रकार, 'भाला'कार भोपटकर यांचं एक विधान वाचनात आलं– टिळक म्हणजे रामदास आहेत आणि तुकाराम टाळपिट्या गांधी आहे. ते वाचलं आणि मी उडालोच. म्हटलं, अशी भानगड आहे का? तुकाराम दर्शन इथे संपत नाही, ते इथपर्यंत जातं. इतिहासाचार्य राजवाडे वगैरे मंडळींनी रामदास विरुद्ध तुकाराम असं द्वंद्व मांडलं होतं. ते द्वंद्व वेगळ्या अर्थाने गांधी–टिळक यामधेही सुरू राहिलं, हे मला तिथे स्ट्राईक झालं. तिथेच मी ठरवलं की आपण याच्यावरती स्वतंत्र काम करायला पाहिजे. एका अर्थाने लोकमान्य ते महात्मा हे तुकाराम दर्शनचं एक्स्टेन्शन आहे.

त्यात मी नेतृत्वाच्या संक्रमणाचा मुद्दा मांडला. टिळकांकडून गांधींकडे १९२० मध्ये महाराष्ट्राच्या नेतृत्वाचं संक्रमण झालं. त्याचा महाराष्ट्राच्या सगळ्याच क्षेत्रांवर परिणाम झाला. कपडेलत्ते, संगीत, साहित्य, नाटक, तमाशा, फिजिकल, आयडियॉलॉजिकल, सायकॉलॉजिकल– अशा सगळ्या गोष्टी आल्या. तुकोबांना केंद्रस्थानी ठेवून महाराष्ट्राचा इतिहास लिहिता येतो, हे मी 'तुकाराम दर्शन'मध्ये मांडलं होतं. तसा आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास लिहिताना आपल्याला दोन केंद्रं

पकडावी लागतात. एक– टिळक आणि दुसरे– गांधीजी. तशा प्रकारे मी आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासाची द्विकेंद्री लंबवर्तुळाकार मांडणी केली.

प्रश्न – सर, एक म्हणजे, गीता व श्रीकृष्णाचं तत्त्वज्ञान असा तुमच्या पीएचडीचा आणि त्यानंतरच्या अभ्यासाचा विषय. दुसरं म्हणजे, 'जागृती'कार पाळेकर या ब्राह्मणेतर संपादकांच्या निवडक लेखांचं तुमचं पुस्तकही प्रकाशित झालं होतं. या दोन्ही बिंदूंपासून तुमचा टिळकांपर्यंतचा प्रवास कसा झाला?

– ज्ञानेश्वरांनी गीतेचा मराठीत अर्थ सांगितला, तसाच टिळकांनी गीतारहस्य लिहून सांगितला. त्यामुळे त्यांच्यात साम्य काय, फरक काय– हा माझ्या कुतूहलाचा विषय होता. त्याचाही माझा अभ्यास झाला. त्यादरम्यान 'केसरी'चे लोक दर वर्षी गीतारहस्य जयंती साजरी करतात. त्या दिवशी कुणाचं तरी प्रवचनवजा व्याख्यान असतं. त्यात मीही एका वर्षी 'गीतारहस्याची निर्मितिमीमांसा' असं व्याख्यान दिलं होतं. कृष्णामुळे या विषयात खोल गेलो होतो. या व्याख्यानामुळे मला अधिक खोलात जाता आलं. कृष्ण, टिळक आणि ज्ञानेश्वरमाऊली– असा तो अभ्यासाचा ट्रँगल होता. मी या तिघांचीही चरित्रे लिहिली.

तुकाराम दर्शनच्या आधीच 'जागृती'कार भगवंतराव पाळेकरांवरच्या प्रोजेक्टची सुरुवात झाली. ते ब्राह्मणेतर चळवळीतले फार मोठे संपादक होते. त्यांच्या जागृती पत्राइतकी वर्षं दुसरं कुठलंच तोलामोलाचं ब्राह्मणेतर चळवळीतलं पत्रं चाललं नाही. 'जागृती'कारांचा दृष्टिकोन फारच उच्च म्हणावा असा होता. संघर्षाच्या जागी संघर्ष करायला हवा. पण संघर्ष रोज नाही करायचा; योग्य त्या ठिकाणी आपल्याला समन्वयही करावा लागतो, अशी त्यांची भूमिका होती. ते अत्यंत सुसंस्कृतपणे लिहिणारे निष्पक्ष पत्रकार होते.

जागृती हे पत्र १९१७–१८ मध्ये सुरू झालं. ते स्वातंत्र्यानंतरही चाललं. हा ब्राह्मणेतर चळवळीचा महत्त्वाचा कालखंड होता. बाबा आढाव यांनी मला पाळेकरांच्या निवडक लेखांचं संपादन करायला सांगितलं होतं. त्यासाठी आम्ही बडोद्याहून 'जागृती'च्या फायली आणल्या. त्यातले लेख निवडले. त्याचं 'निवडक पाळेकर' म्हणून संपादन केलं. त्याला विस्तृत प्रस्तावनाही लिहिली. ते करताना त्यात या काळातल्या बऱ्याचशा गोष्टी लक्षात आल्या होत्या. टिळकांचे अनुयायी कोण आणि गांधींचे अनुयायी कोण, ब्राह्मणेतर चळवळीतल्या पुढाऱ्यांचा गांधींकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा बदलत गेला... ब्राह्मणेतर अगोदर गांधींच्या बाजूने होते. त्यांना गांधीजींविषयी आदर–सहानुभूती होती, कारण त्यांना ते आपल्यापैकी वाटत. पण टिळकांकडून गांधींकडे महाराष्ट्राचं नेतृत्व गेलं, तेव्हा हे लोक प्रत्यक्ष चळवळीत नव्हते. टिळक ते गांधी या संक्रमणकाळातला संघर्ष हा ब्राह्मणांमधलाच संघर्ष होता. प्रामुख्याने टिळकांच्याच अनुयायांमधला आपापसातला संघर्ष होता. अर्थात विनोबा भावे, शंकरराव देव यांच्यासारखे काही नवे तरुणही गांधींकडे आले होते. तेव्हा ब्राह्मणेतर चळवळ या संघर्षापासून अलिप्त होती, कारण त्यांचं लक्ष ब्राह्मणी वर्चस्वामुळे निर्माण झालेला ब्राह्मणेतरांचा बॅकलॉग भरून काढण्याकडे होतं. त्यासाठी त्यांची ब्रिटिश सरकारची मदत घ्यायलाही हरकत नव्हती.

हळूहळू त्यांच्याही हे लक्षात आलं की, ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद हा अंतर्गत वाद आहे. आपला खरा शत्रू इंग्रजी साम्राज्य आहे. तो आपल्याला झुलवत ठेवतो आणि आपला उपयोग करून घेतो. हे कळण्याची प्रक्रिया काही सोपी नव्हती. त्यासाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदेंनी प्रयत्न केले. त्यामुळे ब्राह्मणेतर चळवळीतले बिनीचे लोक म्हणजे जेधे–जवळकर हे हळूहळू गांधींकडे म्हणजे काँग्रेसकडे जाऊ लागले. त्यातून ब्राह्मणेतर चळवळीचा ऱ्हास सुरू झाला.

शेतकरी–कामकऱ्यांची सत्ता येईल, या व्यापक दृष्टीने ब्राह्मणेतर पुढारी काँग्रेसमध्ये आले. आपण शेतकऱ्यांच्या–कामकऱ्यांच्या हितासाठी काँग्रेसला राबवू, असं त्यांना वाटत होतं. त्यासाठी एक अपेक्षा तर थेट सत्ता आपल्या हातात यावी, अशी होती. काँग्रेस १९३७ मध्येही जिंकली. त्यात ब्राह्मणेतरांचं योगदान होतं. पण प्रत्यक्षात मुख्यमंत्री– तेव्हा मुख्य प्रधान म्हणायचे– ते बाळासाहेब खेर झाले. खेर मंत्रिमंडळ १९४६ मध्ये परत आलं. अर्थात तेव्हा मुंबई प्रांत होता. महाराष्ट्र नव्हता. त्यामुळे गुजराती भांडवलदारांचं वर्चस्व होतं. गुजराती बनिया आणि मराठी ब्राह्मण– हे वर्गाच्या भाषेत बोलायचं तर भांडवलदारांचं वर्चस्व होतं. त्यातून शेतकऱ्यांना–कामकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी काही जणांनी शेतकरी कामगार पक्ष काढला. त्यात त्यांनी मार्क्स आणि फुले यांचा समन्वय करण्याचा प्रयत्न केला. पुढे ते शेतकरी कामगार पक्ष सोडून पुन्हा काँग्रेसमध्ये गेले. या सगळ्या झिगझॅग प्रवासाचं चित्र मला जागृतिमध्ये दिसलं. हा प्रवास एका अर्थाने लोकमान्य ते महात्मा या

बदलाचा अवशेष आहे. टिळक आणि गांधी या द्विकेंद्री मॉडेलचंच एक्स्टेन्शन आहे.

प्रश्न – लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांच्यात काही अंत:स्थ सूत्र होतं का? त्यांच्यात काही साम्य आणि फरक होते का?

– आता तुम्ही विचारलेला प्रश्न ही आपली ॲकॅडेमिक लेव्हलवरची केवळ चर्चा आहे. पण हाच प्रश्न तेव्हा रोजच्या जगण्याचा भाग म्हणून लोकांना प्रत्यक्षात पडला होता आणि तो सर्वच दृष्टीने कळीचा प्रश्न होता. वरकरणी टिळकांपेक्षा गांधीजींचा पवित्रा एकदम वेगळा वाटेल. पण प्रत्यक्षात त्यांचं एक आंतरिक ऐक्य आणि सुसंगती आहे. कंटिन्युटी आहे. त्या वेळेला निर्माण झालेला वाद हाच होता की– गांधीजी टिळकांचं राजकारण पुढे नेत आहेत की, टिळकांचं राजकारण भरकटवत आहेत? ते टिळकांचे उत्तराधिकारी आहेत का?

काही लोकांना वाटलं की– गांधीजी टिळकांची जागा घेऊ शकत नाहीत, म्हणून त्यांनी गांधीजींना विरोध केला. दुसऱ्या बाजूला काही टिळक अनुयायांना असं वाटलं की, ते टिळकांचा वारसा पुढे नेत आहेत. मुंबईतल्या गिरगावात नाना अभ्यंकर नावाचे एक कार्यकर्ते होते. ब्राह्मण सभेतल्या एका सभासदाने त्यांना विचारलं की, तुम्ही तर गांधीवादी दिसताय. त्यावर ते म्हणाले, 'मी गांधीवादीच आहे, पण मी टिळकवादी आहे म्हणून मी गांधीवादी आहे'. नाना अभ्यंकरांची एक कादंबरीच आहे या कंटिन्युटीवरची. त्यांनी केलेला संघर्ष, सहन केलेली अवहेलना, टिंगल–टवाळी.

एक ब्राह्मणेतर चळवळ आणि नंतरची आंबेडकरांची चळवळ सोडली, तर सगळ्या चळवळी टिळकांशी जोडलेल्या आहेत. उदाहरणार्थ– डांगेंची कम्युनिस्ट चळवळ. तिला टिळकांची प्रेरणा आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सुरू करणारे हेडगेवार, मुंजे हे काँग्रेसचे कार्यकर्ते होते. त्यांना असं वाटायला लागलं की, काँग्रेसमध्ये मुसलमानांना झुकतं माप दिलं जातं आणि हिंदूंचे हक्क मिळत नाही. म्हणून त्यासाठी संघाचा घाट बांधला. पण रत्नागिरीतल्या स्थानबद्धतेतून सावरकर बाहेर येईपर्यंत– म्हणजे १९३७ पर्यंत– भारतात हिंदुत्ववादी पक्ष नव्हता. हिंदू महासभा ही संघटना होती. हिंदू महासभेचे लोक हे काँग्रेसमध्येच असायचे.

प्रश्न – वरच्या प्रश्नातला उत्तरार्ध राहिला. टिळक आणि गांधी यांच्यातले साम्य आणि फरक?

– दोघेही कट्टर देशभक्त, हे मान्यच करावं लागेल. अर्थात टिळकांच्या काही अनुयायांनी गांधीजींच्या देशभक्तीबद्दल संशय घेतलाय. त्यांना टिळकांचे अनुयायी कितपत म्हणायचं, हे माहीत नाही. कारण त्यांना टिळकांच्याच बऱ्याचशा गोष्टी मान्य नव्हत्या. टिळकांनी केलेला लखनौ करार, मंडालेतून सुटून आल्यानंतर काँग्रेसमध्ये जाणं, प्रखर हिंदुत्ववाद न घेणं– हे त्यांना मान्य नव्हतं. पण एरवी ते टिळकांशी जोडलेले होते. त्या काळात अफगाणिस्तानच्या आमिराने हिंदुस्थानावर हल्ला करायचा वाद सुरू होता, त्याला गांधीजींनीच निमंत्रित केलंय. गांधी हे फितूर आहेत, जयचंद आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे मोठे बंधू बाबाराव सावरकर अशी मांडणी करत होते. काही लोकांनी त्यालाच जोडून असंही म्हटलं की, गांधीजी हे ब्रिटिशांचेच हेर आहेत. ते टिळकांची चळवळ मारायला पुढे आलेत. ते ब्राह्मणांच्या मुळावरच चाललेत– वगैरे. पण आज मागे वळून पाहताना काय दिसतं तर, आमिराला बोलावण्यात टिळकांचाही हात होता. फक्त ते प्रकरण रंगात यायच्या आत टिळक गेले. पण टिळकांनी आमिराला पुणेकरांच्या वतीने मानपत्र देण्याचं ठरवलं होतं. त्यामुळे ब्रिटिश सरकारने त्याला मुंबईत मुक्काम करू दिला नाही. तरीही आमिराची गाडी खडकी स्टेशनवर काही काळ थांबली असताना तिथे मानपत्र द्यायची व्यवस्था टिळकांनी केली.

याच लोकांनी पुढे गांधीजींवर मुसलमानांचा अनुनय केल्याचा आरोपही केला. पण त्याची सुरुवात टिळकांनीच केली, असं म्हणावं लागेल. तोही मुद्दा कट्टर हिंदुत्ववाद्यांनी मांडलेला आहे. लखनौ करार करताना टिळकांनी मुसलमानांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणाच्या तुलनेत जास्तच जागा दिल्या. टिळक हे मुसलमानविरोधी होते, ही अलीकडच्या काळात राजकारणी लोकांनी उठवलेली हूल आहे, असं तेव्हाच्या मुसलमानांचं मत नाही. मुसलमानांचे त्या काळातले मुख्य पुढारी शौकत अली, महंमद अली, मौलाना हसरत मोहानी आणि स्वतः बॅरिस्टर जीना हे सगळे टिळकांना राजकारणातले गुरू मानायचे. आपण त्याला ज्येष्ठ सहकारी म्हणू या. जीनांनी टिळकांबरोबर होमरूल चळवळीत काम केलंय. शौकत अली त्यांना गुरूच मानायचे. हसरत मोहानींनी टिळक गेल्यावर अप्रतिम असं शोकगीत उर्दूत लिहिलं. टिळक हे पूर्णपणे राष्ट्रवादी होते, ते कोणत्याही एका समाजगटाचे असण्याचं कारण नाही. त्यांना

बदललेल्या जगाची कल्पना आली होती. ते प्रॅक्टिकल होते.

प्रश्न – म्हणजे गांधीजी प्रॅक्टिकल होते, तसेच टिळकही प्रॅक्टिकल होते– असंच आहे ना?

– गांधीजीही प्रॅक्टिकल होते, पण ते वाटायचे नाहीत. गांधीजींना कोणतंही आंदोलन कधी थांबवायचं ते कळायचं. म्हणजे दत्ता सामंतांना गिरणीसंप कधी थांबवायचा, ते कळलं नाही. ते प्रॅक्टिकल नव्हतं. गांधीजी त्या बाबतीत परफेक्ट होते. चळवळ हाताबाहेर जाऊ लागलीय, पुरेसं यश मिळत नाही; तर ते लगेच थांबवायचे. कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगेंनी असं म्हटलंय की, चळवळ कशी सुरू करायची, हे मी लेनिन यांच्याकडून शिकलो आणि चळवळ कुठे थांबवायची, हे गांधींकडून शिकलो.

या दोघांत भेद कुठे होता ते तुम्हाला सांगतो. आणि तो दोघांनाही मान्य होता. टिळकांनी हिंदूंची व्याख्या केली होती. त्यातला एक मुद्दा होता की– 'साधनानाम् अनेकता'. हिंदूंबद्दल म्हणणं होतं, तेच त्यांचं राजकारणाबद्दल म्हणणं होतं. हिंदूंमध्ये भक्ती, कर्म, ज्ञान, योग असे वेगवेगळे मार्ग आहेत. तसंच राजकारणाचंही आहे. ते स्वातंत्र्याला राजकीय मोक्ष म्हणायचे. त्यासाठी कोणतं साधन वापरायचं? तर, साधनानाम् अनेकता. प्रत्येकाच्या मार्गात आपापल्या रुचीप्रमाणे, कुवतीप्रमाणे, परिस्थितीच्या वाचनाप्रमाणे फरक पडेल; म्हणून एकाने दुसऱ्याला बाद ठरवायचं कारण नाही, असं टिळकांचं म्हणणं होतं. यातलं कोणतंही साधन योग्य नसेल, पण तुमचं साध्य जर चांगलं असेल– नैतिक दृष्टिकोनातून तर ते साधन चांगलंच होतं. पदरी पडलं आणि पवित्र झालं. त्यानुसार हिंसा ही वाईटच आहे. पण ती स्वराज्याच्या कारणासाठी केली, तर ती पवित्र होती.

पण गांधीजींनी काय केलं? साधनशुचिता मानली. ते म्हणाले, 'स्वराज्य उशिरा मिळालं तरी चालेल पण ते हिंसक मार्गाने नको.' साधनं नैतिक नसतील तर साध्यपण कलुषित होतं. हा दोघांच्यात फरक आहे, बाकी काही फरक नाही. गांधीजींच्या अहिंसेच्या मार्गाने स्वराज्य मिळत असेल तर टिळकांची काहीच हरकत नव्हती. टिळकही हिंसेला घेऊन चालणारे नव्हते. पण कुणी ते करत असेल,

तर त्यांनी त्यांना मदत केली. अर्थात गांधीजींनी त्यांना टिळकांसारखी बॉम्ब वगैरे आणायला मदत केली नाही, पण क्रांतिकारकांची शिक्षा कमी करायला मदत केलीच ना? गांधींजींना क्रांतिकारकांनी केलेला त्याग, त्यांनी सहन केलेले क्लेश यांच्याबद्दल आदरच होता. सावरकरांची अंदमानातून सुटका व्हावी, म्हणून गांधीजींनी अनेक वेळा लिखाण केलंय. काँग्रेसमधून ठराव आणलेले आहेत. फक्त गांधीजींचं म्हणणं होतं की, हिंसेतून हिंसाच होते. आपण स्वातंत्र्यानंतरही त्याच मार्गाने जाऊ, असं इतिहास सांगतो. म्हणून आम्हाला ते नकोय.

प्रश्न – मंडालेच्या तुरुंगवासाच्या आधीचे टिळक वेगळे होते आणि मंडालेनंतर बदललेले टिळक वेगळे होते का?

– प्रबोधनकार ठाकरे यांनी एका ठिकाणी म्हटलंच आहे की, मंडालेपूर्व टिळक वेगळे होते आणि मंडालेनंतरचे टिळक वेगळे होते. त्यापुढे जाऊन मी असं म्हणेन– इंग्लंडला जाण्यापूर्वीचे टिळक वेगळे आणि इंग्लंडहून आल्यानंतरचे वेगळे. १९१४ ते २० या काळात टिळक इंग्लंडला जाऊन आले. तिथे त्यांना आंतरराष्ट्रीय राजकारण, कम्युनिस्ट चळवळ, मजूर पक्षाचं राजकारण, साम्राज्यशाहीचं राजकारण पाहायला मिळालं. नवं साम्यवादी तत्त्वज्ञान जागतिक पातळीवर श्रमिकांच्या माध्यमातून कसं पसरतंय, हेही त्यांनी अनुभवलं. त्यामुळे टिळक तिकडे कलले. त्यामुळे काही लोकांचं असं म्हणणं आहे की, टिळक अधिक जगले असते तर ते कम्युनिस्ट झाले असते. म्हणून तर कॉम्रेड डांगेंना असं वाटलं की, टिळकांकडून प्रेरणा घ्यावी. ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष टिळक होणार होते. टिळकांचा कामगार चळवळीला पाठिंबाच होता. मंडालेच्या अगोदरही कामगारांना टिळक आपलेच वाटत होते. म्हणून टिळकांना सहा वर्षांची शिक्षा झाली, तेव्हा मुंबईतल्या गिरणी कामगारांनी सहा दिवस हरताळ केला. तेव्हा मुंबईत इतक्या दंगली झाल्या की, सरकारला लष्कर बोलवावं लागलं. गोळीबारात लोक मेले. त्या कामगारांना चिथावणारा टिळक पक्षाचा कुणी नेता नव्हता. ते उत्स्फूर्तपणे झालं होतं.

टिळकांना त्यांच्या या व्यापक दृष्टिकोनाला प्रॅक्टिकॅलिटीमुळे कधी कधी मुरड घालावी लागली. त्याला त्यांचा नाइलाज नव्हता. पण तो व्यापक दृष्टिकोन त्यांच्या अनुयायांमध्ये नव्हता. म्हणून पुढचे प्रॉब्लेम आले. संगती संगदोष म्हणतो, त्याप्रमाणे अनुयायांचे अवगुण लोक त्यांच्यावरच प्रोजेक्ट करायला लागले. हे प्रतिगामी आहेत, म्हणून यांचे गुरूही प्रतिगामीच असणार. असं नसतं, हे लक्षात घ्या. टिळकांना प्रतिगामी शिष्य सांभाळणं भाग पडलं. त्याच्याशिवाय स्वराज्याची चळवळ पुढे जाणार नव्हती. त्यामुळे आपल्याला हे समजून घेतलं पाहिजे की, टिळकांच्या निर्णयांमधला परिस्थितीचा कोणता, दडपणाचा कोणता आणि त्यांचा स्वतःचा कोणता? हे बघा, त्यानंतर त्यांच्यावर आरोप करावे.

प्रश्न – सर, या बाबतीत टिळकांशी तुलना करता, गांधीजींनी मात्र आपल्याला हवं ते आपल्या अनुयायांकडून करून घेतलं.

– असं काय करता? गांधीजी हे टिळकांच्या पुढे गेले ना! टिळकांनी १९२० मध्ये स्वातंत्र्य चळवळीत समाज जिथपर्यंत आणून ठेवला होता, त्याच्या पुढे गांधीजींनी नेला. टिळकांच्या आधी परिस्थिती काय होती? रानडे, गोखले यांचं राजकारण दिवाणखान्यापुरतं होतं. ड्रॉइंग रूममधलं. मोठमोठ्या लोकांच्या दिवाणखान्यात परिषदा भरायच्या. टिळकांनी ते रस्त्यावर आणलं, हे तर मान्यच करावं लागेल. म्हणून नेमस्त पुढारी त्यांना तेल्या-तांबोळ्यांचे नेते म्हणाले. त्यांच्या अनुयायांना ब्रूट फोर्स म्हणजे पाशवी बळ म्हणाले. हे आपल्या लिडरशिपमधलं प्रोग्रेशन होतं. टिळक परिस्थितीचा फीडबॅक घेऊन बदलायची गरज असेल तिथे बदलत होते. ती क्षमता त्यांच्यामध्ये होती. ती गांधींमध्येही होती.

प्रश्न – 'लोकमान्य ते महात्मा' ही मांडणी झाली त्याला पंधरा वर्षं झाली. तेव्हा काँग्रेस हा राजकारणातला मुख्य प्रवाह होता. आता ती जागा भाजपने घेतलीय. बदललेल्या परिस्थितीत आता 'लोकमान्य ते महात्मा' हे स्थित्यंतर नव्या प्रकारे बघावं लागेल का?

– नाही, अजिबात नाही. उलट लोकांमध्ये तशी दृष्टी असेल, तर आताच्या राजकीय स्थित्यंतराचा अर्थ लावताना त्याचा उपयोग होईल. आता हे लोकांना कळत नाही, त्याला मी काय करू? कोण सत्तेवर आहे, कोण येणार आहे, कोण जाणार आहे– हे बघून थोडंच लिहिलं होतं? मी जे लिहिलं, ते पूर्णपणे ऑब्जेक्टिव्ह लिहिलं होतं.

प्रश्न – लोकमान्यांचं चरित्र लिहिताना टिळक नव्याने सापडले का?

स्वातंत्र्याच्या गझलेचा शेर

मुलाखत सुरू असताना सदानंद मोरेसरांनी एक शेर ऐकवला. तो असा,

मत्ल'अ है 'गर तिलक ग़ज़ल-ए-आज़ादीके
तो यकिनन मक्त'अ है 'महात्मा'।
क़ादिर अंदाज थे वे भी जिन्होने
क़ाफ़िया तंग किया दुश्मनका दरमियान।

याचा अर्थ असा, स्वातंत्र्याच्या गझलेचा मतला म्हणजे ध्रुवपद टिळक असतील तर गांधी हे नक्कीच मक्ता म्हणजे शायराची नाममुद्रा आहेत. या दोघांच्या दरम्यान झालेले इतर स्वातंत्र्यसैनिकही महत्त्वाचेच होते त्यांनी शत्रूचा 'काफिया तंग' केला. त्याचा नेहमीचा अर्थ शत्रूला त्रस्त केलं असा आहे. पण गझलेत काफिया म्हणजे यमक. हे सगळे नेमक्या यमकासारखे शोभून दिसले, असाही त्याचा अर्थ होतो. विशेष म्हणजे हा शेर स्वत: मोरेसरांनीच लिहिलेला आहे. 'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस', या बहिणाबाईंच्या अभंगाची आठवण करून देणारा या शेराचा भाव आहे.

– 'लोकमान्य ते महात्मा' लिहिल्यानंतर मला असं वाटलं की, आपण टिळकांचं स्वतंत्र चरित्रच लिहायला हवं. मग मी दोन चरित्रं लिहिली. एक लहान आणि दुसरं मोठं. हे मुद्दामहून लिहिण्याचं कारण थोडं वेगळं होतं. लोकमान्यांचा लढा हा स्वातंत्र्यासाठी होता. आपल्याला राजकीय स्वातंत्र्य १९४७ मध्ये मिळालं. त्यामुळे त्या लढ्याचं प्रयोजन संपलं. दुसरा प्रश्न सामाजिक समतेचा किंवा न्यायाचा होता, तो अजून संपलेला नाही. तो चालूच आहे. त्यामुळे त्या काळात सामाजिक काम करणाऱ्यांबद्दल आत्ताच्या लोकांना आदर वाटतो. कारण ते प्रश्न अजून जिवंत आहेत. मग ते फुले, शाहू, आंबेडकर असतील किंवा आगरकर असतील. पण स्वातंत्र्याचा प्रश्न मिटल्याने आपण त्याच्यासाठी लढलेल्यांकडे त्या तीव्रतेने पाहत नाही. आज त्यांचं उपयुक्ततामूल्य संपलंय. त्यामुळे टिळकांचं काम समजून न घेता त्यांच्यावर टीका करताना कुणाला काही वाटत नाही.

धनंजय कीर यांनी टिळकांचं चरित्र लिहिलंय. त्यांनीच फुले, शाहू आणि आंबेडकरांचीही चरित्रे लिहिलीत. त्या तिघांचा डिस्कोर्स अजून सुरू आहे. तो वाढतोय. टिळकांचं काय झालं सांगा पुढे? टिळकांचं चरित्र कोणी लिहिलंय का कीर यांच्यानंतर? त्यामुळे एकाच दृष्टिकोनातून मांडणी होत असल्यामुळे टिळकांवर अन्याय होण्याची शक्यता वाढते. मी काही टिळकांचा वकील नाही. पण एक अभ्यासक म्हणून त्याचा तटस्थ परिणाम मला जाणवतो.

टिळकांचा खुंटलेला डिस्कोर्स मी नव्याने सुरू केलाय, हे लक्षात घ्या. का केला? तर, स्वातंत्र्यलढ्यातलं त्यांचं काम महत्त्वाचं आहे. भले, ते स्वातंत्र्य मिळाल्यामुळे एका अर्थाने इतिहासजमा झालंय. फुलेंच्या संदर्भातही मी माझं योगदान दिलंय. पण दर पिढीगणिक आपल्या महापुरुषांची चरित्रं परत लिहिली गेली पाहिजेत. नव्या पिढीची भाषा बदललेली असते. प्रश्न बदलेलेले असतात, जगाकडे बघण्याची दृष्टी बघतलेली असते. पूर्वी समाज गतिमान नसताना हे बदल कमी व्हायचे. आता मात्र बदलाचं प्रमाण वाढलंय. त्यामुळे येणाऱ्या नव्या पिढीच्या भाषेत, त्यांच्या प्रश्नांच्या संदर्भात, त्यांच्या परिस्थितीच्या वाचनाच्या आधारे आपणाला महापुरुषांची चरित्रं पुन:पुन्हा लिहावी लागतील; नाही तर महापुरुष हे इतिहासजमा होतील. ते फॉसिलाइजड् होतील. एखाद्या मृत प्राण्याचे अवशेष पृथ्वीच्या पोटात दडल्यानंतर त्याच्याभोवती काय काय जमा होतं? त्याचं फॉसिल म्हणजे जीवाश्म होतं. तसं आपण

महापुरुषांच्या बाबतीत होऊ द्यायला नको.

त्यामुळे मी टिळकांचं चरित्र लिहिलं. गांधीजींचं का लिहावंसं वाटलं नाही? कारण खूप लोक आहेत त्यासाठी. गांधी हे अलीकडच्या काळातलं चलनी नाणं झालंय. एके काळी महाराष्ट्रात टिळक हे चलनी नाणं होतं. लोकांनी ते त्या वेळेला एक्स्प्लॉइट केलं. मला त्या ट्रॅपमध्ये जायचं नाही. मी पुण्याच्या गंधर्ववेद प्रकाशनासाठी एक थोडक्यात आणि नंतर सविस्तर अशी दोन टिळकचरित्रं लिहिली. त्यात 'कर्मयोगी लोकमान्य' हे साडेचारशे पानांचं चरित्र आहे. त्यातल्या लहान चरित्राची आवृत्ती आता 'सकाळ प्रकाशन'ने काढलीय. ती सर्वत्र उपलब्ध आहे.

प्रश्न – आता शेवटचे दोन प्रश्न उरलेत. लोकमान्य टिळक हे केसरीचे जवळपास ३२ वर्षं संपादक होते. त्यांच्या अग्रलेखांची वैशिष्ट्यं सांगाल?

– लोकमान्य टिळकांचं महाराष्ट्राच्या पत्रकारितेत महत्त्वाचं स्थान आहे. टिळकांचा मूळ पिंड हा कार्यकर्त्याचा व विद्वान अभ्यासकाचा होता. त्यांना लिहायची, बोलायची खरंच आवड नव्हती. ती आवड होती आगरकरांना. ते हौसेने लिहायचे, बोलायचे; पण अंगावर आल्यानंतर सर्वस्व पणाला लावण्याचा टिळकांचा स्वभाव होता. त्यांनी दोन गोष्टी सांभाळल्या. आपल्याला जे म्हणायचं आहे, ते म्हणायचंच– पण ते कायद्याच्या चौकटीतच मांडायचं, म्हणजे ब्रिटिश सरकारला तक्रार करता यायला नको.

टिळकांचे नातू– मुलीचा मुलगा– ग.वि. केतकर हे पुढे केसरीचे संपादक होते. 'तरुण भारत'चेही होते. त्यांनी म्हटलंय, 'टिळक कायद्याच्या कुंपणावरून चालत गेले. त्यांना कायद्याच्या कचाट्यात पकडताच येणार नव्हतं. टिळकांना शिक्षा झाल्या, ते अग्रलेख त्यांनी लिहिलेलेच नव्हते. त्यांच्या सहकाऱ्यांनी लिहिलेले होते. कारण टिळकांचा कायदा खूप पक्का होता.' गजाननराव केतकर ग्रॅज्युएट झाले. त्यांना वाटलं, आपण केसरीत काम करावं. ते आजोबांकडे गेले. टिळक त्यांना म्हणाले, 'तू नक्की काम कर. पण आधी लॉ करून ये. कारण लॉ न कळणाऱ्या लोकांमुळे मला शिक्षा झाली.'

लक्षात घ्या– टिळकांचं अपील हे बहुजन समाजाला होतं. त्यांची भाषा अगदी साधी–सोपी मराठी आहे. त्यामुळे टिळकांचे अग्रलेख त्या वेळच्या कुणालाही कळत. टिळक आणि आगरकर हे दोघेही विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या तालमीत तयार झाले. चिपळूणकरांनी एक मराठी घडवली होती. ती तेव्हाच्या उच्चभ्रू मराठी भाषकांना समजण्यापुरती होती. संस्कृतची पार्श्वभूमी असल्याशिवाय ती कळणारच नव्हती. गंमत म्हणजे, आगरकरांनी ती भाषा कॉपी केली. त्यांच्या भाषाशैलीवर चिपळूणकरांची छाप आहे. उदाहरणार्थ– मोठी पल्लेदार वाक्य लिहिणं. कधी कधी आगरकर त्यात गुंततात.

टिळकांनी चिपळूणकरांचा प्रभाव सुरुवातीलाच टाकून दिला. त्याचं कारण टिळकांचा ऑडियन्स हा सर्वसामान्य माणूस होता. त्यांना त्यांची रीडरशिप माहीत होती. टिळकांचं संस्कृत हे आगरकरांपेक्षा चांगलं होतं, पण टिळकांनी संस्कृतचा प्रभाव आपल्या लिखाणावर कधीही येऊ दिला नाही. टिळक कुठल्या तरी तुरुंगवासातून सुटून आले, तर केसरीमध्ये त्यांच्या सहकाऱ्यांनी अग्रलेख लिहिला– टिळक बंधमुक्त झाले. ते प्रूफ टिळकांकडे पाहायला आलं. त्यांनी पाहिलं. त्यांनी 'बंधमुक्त झाले' हा शब्दप्रयोग खोडला आणि लिहिलं, 'टिळक सुटले'. हे टिळकांचं वैशिष्ट्य आहे. पंडिती परंपरेला टिळकांनी छेद दिलेला आहे. पंडिती भाषेची परंपरा चिपळूणकर, आगरकर यांच्यापासून सावरकरांपर्यंत गेलेली दिसेल. तुम्ही समजा तिघांचे एका बाजूला लेख ठेवले आणि मधे टिळकांचा ठेवला, तर तो वाचताना तुम्हाला ठसकाच लागेल. आपण हे काय वेगळंच वाचतोय राव!

विषयांच्या संदर्भातही प्रचंड व्हरायटी होती. देशाचा एकही प्रश्न असा नव्हता की, ज्याला टिळकांनी हात घातलेला नव्हता. त्यांचा विचार देशाला पारतंत्र्याच्या जोखडातून बाहेर काढण्यापुरता नव्हता, तर 'नवा भारत' घडवण्याचं टिळकांचं व्हिजन होतं. आर्थिक प्रश्नांवर त्यांनी लिहिलंय. सहकारी तत्त्वावर साखर कारखाने व्हावेत, असा अग्रलेखच आहे त्यांचा. पुण्यामध्ये पहिल्यांदा राजाबहादूर गिरणी सुरू झाली, तेव्हा टिळकांचा अग्रलेख आहे– 'पुण्यातील पहिली चिमणी.'

शेतीबद्दल, शेतकऱ्यांच्या प्रश्नाबद्दल टिळकांनी लिहिलं. शेतकऱ्यांचे प्रश्न काँग्रेसने घेतले पाहिजेत, हे टिळकांनीच पहिल्यांदा सांगितलं. दुष्काळात शेतकऱ्यांचा हक्क अबाधित राहावा, यासाठी त्यांनी चळवळ केली. म्हणजे अगदी शरद जोशींच्या शेतकरी संघटनेच्या चळवळीसारखीच– आम्ही सारा भरणार नाही. टिळकांनी त्यावर लेख लिहिले. सरकारचा कायदा छापून हजारो प्रतींचं महाराष्ट्रभर वाटप केलं. भाषणं केली. गावोगाव प्रचार करण्यासाठी कार्यकर्ते

एजंट नेमले. राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना त्यांनीच मांडलीय पहिल्यांदा. टिळकांचा विचार हा सर्वंकष आहे.

प्रश्न – आता ऑगस्ट महिना येऊ घातलाय. म्हणजे गणपती जवळ आलेत. दर वर्षी सार्वजनिक गणपतीच्या मंडपांमध्ये टिळकांचा फोटो असतो; पण सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करताना टिळकांचा नेमका काय विचार होता आणि तो आज उरला आहे का?

– त्याला एक तात्कालिक कारण घडलं. लोकांच्या घरोघरी गणपती बसायचेच. पुण्यात प्रमाण जास्त होतं. पण त्याच वेळेला महाराष्ट्रात आणि पुण्यातही मोहरमचे ताबूत खूप असायचे. सगळे लोक भाग घ्यायचे त्यात. आखाडे वगैरे सगळे त्यापुढे नाचायचे. १८९२-९३ च्या दरम्यान दंगली झाल्या. त्यामुळे हिंदू आणि मुस्लिमांमध्ये दुरावा झाला. त्यामुळे मोहरमच्या ताबुतांपासून हिंदू दुरावले. दहा दिवसांची पोकळी निर्माण झाली. तिचा चांगला वापर करून घेता येईल, असं टिळकांच्या लक्षात आलं. त्यामुळे टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाचा पर्याय दिला. टिळकांनी लोकांना नाचायला लावलं, अशातला भाग नाही. ते आधीपासून नाचतच होते, फक्त ते ताबुतांच्या मिरवणुकांकडून गणपतीकडे आले. टिळकांचे विचार त्यातून सांगितले जाऊ लागले. टिळकांनी असंतोष व्यक्त करण्याचं माध्यम घडवलं.

हेही लक्षात घ्यायला हवं की, टिळकांनी हे काही ताबूतांच्या विरोधात केलं नाही. त्यांनी फक्त पर्याय दिला. मुसलमानांनी गणपती बसावावा, असं काही टिळक म्हणणार नव्हते. प्रत्येकाने आपापल्या धर्माप्रमाणे वागावं, याच विचाराचे ते होते. कोणताही धर्म कुणावर तरी लादण्याच्या विचाराचे ते नव्हते.

पण शिवजयंतीचा विचार वेगळा होता. भारत नावाच्या देशाचं प्रतीक कोण होऊ शकतं, तर शिवाजीमहाराज. त्याचा संबंध धर्माशी असता कामा नये. शिवाजीमहाराज हे संपूर्ण हिंदुस्थानचे राष्ट्रीय पुढारी आहेत, ही भूमिका टिळकांनी घेतलीय. मग टिळक बंगालमध्ये जातात. तिथे शिवजयंतीचा उत्सव सुरू होतो. शिवाजीमहाराजांवर रवींद्रनाथ टागोर कविता लिहितात. टिळक तिथे असं विधान करतात की, 'यापुढचा आमचा शिवाजी कदाचित मुसलमानांमधूनही येईल.' हे टिळकांनी व्याख्यानातून म्हटलंय. त्याचं रेकॉर्ड आहे. टिळक असं म्हणाले, 'शिवाजीमहाराजांचा लढा हा विशिष्ट धर्माविरुद्ध नव्हता, तर जुलमी राजवटीविरुद्ध होता. योगायोगाने ती जुलमी राजवट मुसलमानांची होती. उद्या तशी राजवट दुसऱ्या कोणत्या धर्माची झाली, तर आपण गप्प बसणार का? त्यामुळे शिवाजीमहाराजांना सगळ्या भारताने मानायला पाहिजे.' असं त्यांचं मत होतं. हे सगळं मंडालेच्याही अगोदरचं आहे.

आणि टिळक मंडालेमधून परत आले, तेव्हा मुसलमानांनी त्यांचं नेतृत्व मान्य केलं. ते लोक टिळकांना बोलवायला लागले व्याख्यानांना. अजमेरच्या दर्ग्यात टिळक गेले. त्यांच्यावर तिथल्या मुसलमानांनी चांदीची फुलं उधळली. मोहरमच्या ताबुताच्या उत्सवातही टिळक सामील झाले. त्याचे फोटो आहेत. त्याच वेळेस खिलाफत चळवळ सुरू झाली होती. त्यांनाही टिळकांनी दिलासा दिला. 'तुमच्या धर्मावरचं संकट असेल, तर हिंदू तुमच्या मागे उभे राहतील.' फक्त आपली विचारसरणी पुढे नेण्याच्या नादामध्ये काही लोकांनी टिळकांवर फार अन्याय केलाय.

आताच्या गणपती उत्सवाचं स्वरूप टिळकांच्या गणपती उत्सवाशी सुसंगत नाहीय, हे कुणीही सांगेल. टिळकांच्या गणेशोत्सवाचं वैशिष्ट्य म्हणजे, त्यात व्याख्यानं व्हायची. तो एक प्रकारचा ज्ञानयज्ञ असायचा. अख्ख्या भारतातून लोकांना बोलावलं जायचं. देशभरातून लोक यायचे, टिळकांच्या उत्सवात आपण चाललोय म्हणून. आता त्यापैकी काहीही उरलेलं नाही. त्यामुळे आपण आज जे करतो, त्यासाठी टिळकांना कसं दोषी धरणार?

(मुलाखत व शब्दांकन : सचिन परब)

Mob.: 9420685183

सदानंद मोरे, पुणे
sadanand.more@rediff.com
Mob.: 9822832896

(महाराष्ट्राच्या लोकव्यवहाराचे अभ्यासक असलेल्या सदानंद मोरे, 'लोकमान्य ते महात्मा' आणि 'तुकाराम दर्शन' या दोन बृहद ग्रंथांसह डझनभर पुस्तकांचे लेखक आहेत; त्यांनी लिहिलेले टिळकांचे चरित्र अलीकडेच प्रकाशित झाले आहे.)

लोकमान्य
स्मृतिशताब्दी

जुन्या-नव्या पर्वांचा दुवा

कुमार केतकर

जरी तेव्हाचे आणि आजचे स्वयंभू पुरोगामी टिळकांना 'ब्राह्मणांचे' प्रतिगामी पुढारी मानत असत, तरीही प्रत्यक्षात टिळकांनी 'ब्राह्मणी' सीमा केव्हाच ओलांडल्या होत्या. ते मराठी प्रांतातील शेतकऱ्यांकडे जात, खेडोपाडी दौरे काढत. 'केसरी'मधून दुष्काळी समस्या, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि इतर कष्टकरी वर्गाच्या समस्यांना वाचा फोडली जाई. म्हणूनच ते 'तेल्या-तांबोळ्यांचे पुढारी' म्हणून ओळखले जाऊ लागले. सनातनी ब्राह्मणांना टिळकांचे हे रूप मान्य नसे. टिळक केवळ असंतोषाचे जनक नव्हते, तर मराठी उद्योजकतेचेही जनक होते. केवळ गणेशोत्सव-शिवजयंतीसारख्या उत्सवांचे प्रणेते नव्हते, तर कामगार-शेतकऱ्यांच्या समस्यांवर आंदोलन करायला पुढे आलेले- एका अर्थाने रस्त्यावर उतरलेले पुढारी होते. जर ते अशा सर्वंकष राजकारणात उतरले नसते तर ते गणित, खगोलशास्त्र, संस्कृत, तत्त्वज्ञान या विषयांत पारंगत असे फक्त प्रकांड 'टिळकशास्त्री' झाले असते.

लोकमान्य टिळक गेले तेव्हा गोपाळकृष्ण गोखले जाऊन पाच वर्षे झाली होती. गोपाळ गणेश आगरकर यांचे निधन होऊन तर २५ वर्षे झाली होती. तरीही मराठी वैचारिक वर्तुळात या तीन महानुभवांना एकच त्रिकोणात बसवले जाते.

'टिळक आणि आगरकर' नावाचे नाटकच विश्राम बेडेकर यांनी लिहिले होते. 'अगोदर राजकीय स्वातंत्र्य की सामाजिक सुधारणा?' हा वाद अजूनही त्यांचा दोघांचा संदर्भ देऊन हिरीरीने घातला जातो. 'आजचा सुधारक' नावाच्या नियतकालिकाची प्रेरणा आगरकरच आहेत. य.दि.फडके यांचे 'शोध बाळगोपाळांचा' हे पुस्तक त्या दोघांची विचारसरणी आणि वाद-संवाद यांवरच प्रकाशझोत टाकते. अशी आणखीही काही उदाहरणे देता येतील. काही विचारवंतांमध्ये आजही 'आगरकरवादी' आणि 'टिळकवादी' असे दोन तट आहे. सर्वसाधारणपणे आजचे आगरकरवादी गट टिळकांची संभावना 'प्रतिगामी-सनातनी' अशी करतात. टिळकवादी मंडळी- म्हणजे आजची- आगरकरांची तशी अवहेलना करीत नाहीत, पण त्यांना तसे महत्त्वही देत नाहीत. राजकीय वर्तुळात (आता फारशी तशी वर्तुळे उरलेली नाहीत म्हणा!) अनेक स्वयंभू हिंदुत्ववादी टिळकांचा वारसा सांगतात. पण त्याचबरोबर

कित्येक कम्युनिस्टही– विशेषत: डांगेवादी– टिळकांनाच राजकीय आद्यगुरू मानतात. समाजवादी पंथातले बहुतेक लोक मात्र आगरकरांचा संदर्भ देतात.

काही जण अशा तटा–गटात जात नसले, तरी त्यांचाही कल असतोच. उदाहरणार्थ– गंगाधर गाडगीळ ('दुर्दम्य' या टिळकांच्या जीवनावरील कादंबरीचे लेखक) टिळकांच्या पक्षात धरले जातात. य.दि.फडकेंचा सुरुवातीचा कल आगरकरांच्या दिशेने होता, पण नंतर त्यांनी टिळकांना आद्य क्रांतिकारकाचे स्थान बहाल केले. आचार्य अत्र्यांपासून गोविंदराव तळवळकरांपर्यंत बहुतेकांचा कल टिळकांकडे होता. गेल्या काही वर्षांत प्रसिद्ध झालेल्या इंग्रजी पुस्तकांमध्ये नि:संदिग्ध टिळकविरोधी (प्रतिगामी) सूर आहे– त्यांच्यापैकी बहुतेक उदारमतवादी टिळकविरोधात. सर्वसामान्य मराठी माणसांचा टिळकांच्या बाजूने असलेला झुकाव हा गणेशोत्सव आणि शिवजयंती या समारंभी उपक्रमांमुळे असतो. त्यांच्या दृष्टीने टिळक–आगरकर असे 'द्वैत' नसते आणि त्या दोघांच्या वैचारिक मांडणीबाबत त्यांना काही देणे–घेणे नसते. टिळकांनी हे दोन्ही उत्सव १८९५ मध्ये सुरू केले. आगरकरांच्या नावाने असे कोणतेही समारंभ नाहीत; पण ज्यांना 'एनजीओ' म्हणून ओळखले जाते– असे गट, स्त्री–मुक्तिवादी व समता–समानतावादी चळवळी साधारणपणे आगरकरांचे अधिष्ठान मानतात. टिळक त्यांच्या आसपास फिरकत नाहीत.

या तथाकथित 'एनजीओ'वाल्यांमध्ये थोडेफार गांधीजी असतात, थोडेफार मार्क्स–एंगल्स असतात; पण गेल्या ४०–५० वर्षांत महात्मा फुले अधिक मोठ्या प्रमाणात आले आहेत. जोतिराव आणि सावित्रीबाई फुलेंच्या नावाने होणारे कार्यक्रम आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने सतत होणारे उत्सव व पुतळे यांनी आता बरीच सामाजिक–सांस्कृतिक जागा व्यापली आहे. सुमारे ५०–६० वर्षांपूर्वी फक्त टिळकप्रणीत गणेशोत्सव होत होते, शिवजयंती होत असे; पण आजच्यासारखी नाही! असो.

या सर्व सामाजिक–सांस्कृतिक आणि राजकीय गदारोळ–धांदलीत (बिचारे) गोपाळकृष्ण गोखले तसे उपेक्षित राहिले. ज्या वर्षी महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतून भारतात आले, त्याच वर्षी म्हणजे १९१५ मध्ये गोखलेंचे निधन झाले. गांधीजी भारतात आले तेच मुळी गोखल्यांच्या आग्रही निमंत्रणामुळे.

गोखलेंच्या नावाने कोणतेही उत्सव–समारंभ नाहीत. पाच वर्षांपूर्वी त्यांच्या पुण्यतिथीचे शताब्दीवर्ष पुणे येथे साजरे झाले. पण ते इतके औपचारिक होते की, देशात व एकूण मीडियात त्यांच्या त्या पुण्यतिथी कार्यक्रमाचा गाजावाजा झाला नाही.

नरेंद्र मोदी पंतप्रधान होऊन तेव्हा फक्त ७–८ महिने झाले होते. त्या 'मोदीमय' माहोलामध्ये गोखले कोण? मोदी जरी गांधीजींच्या नावाने ढोल बडवत असले, तरी त्यांना गांधीजींच्या या गुरूबद्दल काही आस्था असल्याचे जाणवले नाही. (तशी मोदींना कुणाबद्दलच आस्था नाही– अगदी गोळवलकर–सावरकरांबद्दलही नाही. पण ते असो!)

लेखाच्या सुरुवातीला टिळक–आगरकर–गोखले यांच्या त्रिकोणी वारशाचा उल्लेख केला. या त्रिकोणाचे तीन कोन समान अंशांचे नाहीत. टिळकांना जसा मंडाले येथे हलाखीचा तुरुंगवास सहा वर्षे सहन करावा लागला, तसा आगरकर–गोखलेंना करावा लागला नाही. टिळकांचा व त्यांच्या लेखनाचा जसा धसका इंग्रजांनी घेतला, तसा गोखले–आगरकरांचा घेतला नाही.

सामाजिक सुधारणा अगोदर आणि मग राजकारण– हे सूत्र टिळकांनी व तत्कालीन काँग्रेसने स्वीकारले असते, तर अजूनही स्वातंत्र्य मिळाले नसते. कारण समाजातील सनातनी–प्रतिगामीपण आणि सांस्कृतिक मागासलेपण अजूनही प्रचंड प्रमाणात आहेत. (किंबहुना, वाढले आहे. नरेंद्र दाभोलकरांची हत्या होऊन सात वर्षे झाली, पण (बहुतांशी आगरकरवादी) दाभोलकरांना, ते जिथे असतील तिथे मान खाली घालावी लागेल इतके उग्र आणि हिंस्र पारंपरिक व अंधश्रद्धेचे प्रकार या काळात घडले आहेत.)

गोखले मवाळ विचारांचे होते. ब्रिटिश संसदीय उदारमतवादी परंपरेवर बऱ्यापैकी विश्वास ठेवून थेट जहाल संघर्षाऐवजी लोकशाही मार्गाने स्वातंत्र्य मिळविता येईल, असे त्यांना वाटत होते. ते स्वत: सर्वार्थाने उदारमतवादी, सेक्युलर, बुद्धिवादी आणि लोकशाही विचाराचे होते. पण त्यांनी स्थापन केलेल्या 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी'ची जी अवस्था झाली, तीच त्यांच्या विचारसरणीचीही झाली, असे दुर्दैवाने म्हणावे लागते.

पण १८८५ ते १९०५ ही २० वर्षे काँग्रेसचे रूप आणि धोरण बऱ्याच अंशी मवाळच होते. बंगालच्या फाळणीनंतर (१९०५) मवाळवादी मागे पडू लागले. सुरतला १९०७ मध्ये झालेल्या अधिवेशात चक्क घमासान अशी धुमश्चक्री जहाल व मवाळवादी यांच्यात झाली. काँग्रेसमधली ती

पहिली अधिकृत फूट म्हणता येईल. टिळक आणि गोखले यांचे संबंध पराकोटीला परस्परविरोधात गेले. दोन्ही गट एकमेकांविरुद्ध तीव्र टीका करू लागले. वर्षभरानंतर १९०८ मध्ये टिळकांना अटक होऊन मंडालेला धाडण्यात आले. नाही म्हटले तरी, टिळक नसल्यामुळे जहालवादी गटाची पीछेहाट झाली. याच काळात गोखले इंग्लंड, आयर्लंड आणि दक्षिण आफ्रिकेला गेले. इंग्लंडमधील समविचारी मंडळींबरोबर त्यांची चर्चा झाली. गोखलेंची सभ्यता, इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व आणि उदारमतवादी विचार यांमुळे प्रभावित झालेले काही ब्रिटिश राजकीय पुढारी गोखलेंचे कट्टर चाहते बनले.

जरी तेव्हाचे आणि आजचे स्वयंभू पुरोगामी टिळकांना 'ब्राह्मणांचे' प्रतिगामी पुढारी मानत असत, तरीही प्रत्यक्षात टिळकांनी 'ब्राह्मणी' सीमा केव्हाच ओलांडल्या होत्या. ते मराठी प्रांतातील शेतकऱ्यांकडे जात, खेडोपाडी दौरे काढत. 'केसरी'मधून दुष्काळी समस्या, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि इतर कष्टकरी वर्गाच्या समस्यांना वाचा फोडली जाई. म्हणूनच ते 'तेल्या-तांबोळ्यांचे पुढारी' म्हणून ओळखले जाऊ लागले. सनातनी ब्राह्मणांना टिळकांचे हे रूप मान्य नसे.

टिळकांच्या सूचनेवरून, सल्ल्यावरून अनेक ब्राह्मण व्यवसाय-उद्योगधंद्यांत उतरले. कारखानदारी आणि एकूण उद्योगधंदे यांचे महत्त्व त्यांनी ओळखले होते. शेकडो मराठी उद्योजक-कारखानदार तयार झाले ते टिळकांच्या प्रेरणेनेच. ज्या काळी ब्राह्मणांनी उद्योगधंदा-व्यापारात उतरणे निषिद्ध मानले जात असे, त्या काळात सर्कस काढण्यापासून ते उपाहारगृहापर्यंत आणि कारखानदारीपासून दुकानदारीपर्यंत व्यवसायात अगदी अस्सल पुणेरी ब्राह्मण उतरले. (आजही त्यांचे ते व्यवसाय सुरू आहेत- खरे तर त्यांचा तत्कालीन संदर्भ इतिहास लिहायला हवा.) म्हणजेच टिळक केवळ असंतोषाचे जनक नव्हते, तर मराठी उद्योजकतेचेही जनक होते. केवळ गणेशोत्सव-शिवजयंतीसारख्या उत्सवांचे प्रणेते नव्हते, तर कामगार-शेतकऱ्यांच्या समस्यांवर आंदोलन करायला पुढे आलेले- एका अर्थाने रस्त्यावर उतरलेले पुढारी होते. जर ते अशा सर्वंकष राजकारणात उतरले नसते तर ते गणित, खगोलशास्त्र, संस्कृत, तत्त्वज्ञान या विषयांत पारंगत असे फक्त प्रकांड 'टिळकशास्त्री' झाले असते. तो व्यासंग त्यांनी जपलाच (म्हणूनच 'गीतारहस्य' लिहू शकले- तेही मंडालेच्या तुरुंगात)!

कामगारवर्ग हा एक समांतर पण प्रभावी सामाजिक शक्ती आहे, याचे भान त्यांना आले ते १९०५ नंतर आणि मुख्यत: रशियातील कामगार क्रांतीनंतर. म्हणूनच तर इंग्लंडमध्ये १९१९ मध्ये ते मजूर पक्षाच्या सभेला प्रमुख वक्ते म्हणून हजर राहिले. (त्यानंतर भारतात आल्यावर २००० हजार पौंडांची देणगी त्यांनी मजूर पक्षाला पाठवली) सभा तेथील कामगारसंघटनांनी आयोजित केली होती, तेथे जॉर्ज बर्नॉर्ड शॉ हे एक वक्ते होते. वस्तुत: टिळकांची लंडनभेट एका वकिली खटल्याबद्दल होती. या सभेला हजर राहणे हा

बराचसा ऐच्छिक आणि काहीसा योगायोगाचा भाग होता.

पण टिळकांमधील या दृष्टिकोनावर बारीक नजर ठेवून असलेल्या लेनिन यांनी 'टिळक कोण?' ही नुसती चौकशी केली नाही, तर ब्रिटिश कम्युनिस्ट पार्टीच्या त्यांच्या एका कॉम्रेडला टिळकांना भेटायला सांगितले. आजही लंडनमध्ये टिळकांचा फोटो तेथील कम्युनिस्ट पक्षाच्या कचेरीत आहे.

तसे पाहिले तर हे सर्व जण पेशवाईच्या अखेरीनंतर प्रकाशात आलेले विचारवंत नेते आहेत. म्हणजे त्यांचा राजकीय परिसर समान आहे. महात्मा फुले सोडले, तर बहुतेक जण पुणेरी ब्राह्मणी वातावरणात वाढले आहेत; पण त्यांच्या मनात धुमसणाऱ्या असंतोषाचा आविष्कार वेगवेगळा आहे. त्यांच्या जन्मापासून कार्यकाळाकडे आणि त्यांच्या प्रेरणास्रोतांकडे नजर टाकली तरी लक्षात येईल की, त्या सर्वांच्या सामाजिक-राजकीय सर्जनशीलतेला त्या विलक्षण ऐतिहासिकतेचे परिमाण आहे.

टिळक-आगरकर-गोखले रंगमंचावर येण्यापूर्वीच नेपथ्यरचनेला सुरुवात झाली होती- तीसुद्धा समाजाच्या आणि आर्थिक स्तराच्या वेगवेगळ्या पातळ्यांवरून. त्या टिळक-आगकरांच्या जन्माअगोदर 'बॉम्बे असोसिएशन'ची सुरवात झाली होती.हे सर्व संदर्भ लक्षात घेतल्याशिवाय टिळक-आगरकर-गोखले या त्रिकोणी प्रगल्भतेचा वेध घेता येणार नाही.

टिळकांचा जन्म २३ जुलै १८५६ आणि आगरकरांचा १४ जुलै १८५६. आगरकर हे टिळकांपेक्षा फक्त नऊ दिवसांनी मोठे. गोखलेंचा जन्म ९ मे १८६६. म्हणजे गोखले त्या दोघांपेक्षा १० वर्षांनी लहान. टिळक-आगरकरांचा जन्म १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाअगोदर एक वर्ष आणि गोखलेंचा युद्धानंतर नऊ वर्षांनी.

नेपथ्याची पहिली रचना एका अर्थाने बाळशास्त्री जांभेकरांनी केली होती, एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस.

'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकरांचा जन्म पेशवाईच्या शेवटच्या टप्प्यातला– ६ जानेवारी १८१२ म्हणजे अगदी लहान वयात (सहाव्या वर्षी) पेशवाईची अखेर त्यांनी पाहिली. परंतु 'पाहिली' म्हणजे, त्या घटनेचे ऐतिहासिक महत्त्व त्यांना समजले असे नाही. पण जसजसा त्यांनी तारुण्यात प्रवेश केला, तसतसा वातावरणातला गोंधळ त्यांना दिसू लागला. त्या गोंधळाला वाचा फोडण्यासाठी वयाच्या विसाव्या वर्षीच त्यांनी 'दर्पण' हे वृत्तपत्र सुरू केले. ६ जानेवारी १८३२ रोजी. पण टिळक–आगरकरांचा जन्म होण्याच्या अगोदर दहा वर्षे जांभेकर यांचे ३४ व्या वर्षीच निधन झाले– १८ मे १८४६ रोजी. म्हणजेच जांभेकर असोत वा फुले, लोकहितवादी असोत वा टिळक–आगरकर, हे कोणत्या लाटांवर स्वार होत होते, ते पाहणे म्हणूनच उद्‌बोधक आहे. त्या शतकाचा अखेरचा उद्‌गार केशवसुतांनी काढला (७ ऑक्टोबर १८६६ – ७ नोव्हेंबर १९०५)– 'ना मी हिंदू, ना मी ब्राह्मण, नाही एक पंथाचा'!

महात्मा फुलेंचा जन्म ११ एप्रिल १८२७ चा. म्हणजे पेशवाईनंतर नऊ वर्षांनी आणि टिळक–आगरकरांच्या जन्माअगोदर २९ वर्षे! फुलेंचा संघर्ष तर सर्वंकष होता. पेशवाईशी वा त्या अनुषंगाने आलेल्या 'ब्राह्मणी' असंतोषाशी त्यांचा काही संबंध असणे शक्यच नव्हते. पण मराठी स्वायत्ततेची अस्मिता होतीच. म्हणूनच पहिले शिवाजीमहाराजांचे स्मारक आणि चिंतन त्यांनी केले. अस्पृश्यता आणि जातीची उतरंड याविरुद्ध बंड करताना त्यांचे वैश्विक परिप्रेक्ष्य प्रगट होत गेले. अमेरिकेत गुलामगिरीविरुद्ध लढणारे अब्राहम लिंकन यांचे स्मरण करून त्यांना लेखन अर्पण करणारे फुले हे आगरकरांच्याही अगोदर समाजसुधारणा चळवळीत लढाऊपणे उतरले होते आणि टिळकांच्याही अगोदर शिवजयंतीचा समारोह त्यांनी आयोजित केला होता. त्याचप्रमाणे टिळकांच्याही अगोदर कामगारांच्या मागण्या व संघटनाविचाराकडे लक्ष दिले होते. कोण अधिक मोठा वा अधिक द्रष्टा हे 'तुलनेने' ठरविण्याचा हा मुद्दा नाही, तर काळ व परिसर समजून घेण्याचा आहे.

गोपाळ हरि देशमुख ऊर्फ 'लोकहितवादी' यांचा जन्मही टिळक–आगरकरांच्या अगोदरचा आहे– १८ फेब्रुवारी १८२३. आपल्या समाजाची अशी दुर्दशा का झाली आहे, इंग्रज येथे येऊन राज्यकर्ते झाले ते त्यांच्याकडे असलेल्या कोणत्या गुणांमुळे; आपल्या समाजातील विषमता, तंत्रकौशल्याबद्दल अनास्था, उच्चभ्रूपणा आणि उपेक्षितांबद्दल द्वेष इत्यादींविषयी 'लोकहितवादीं'नीही कोरडे ओढले. फुले व सावित्रीबाईंनी तर येथील स्त्री–पुरुष विषमतेला व सनातनी विचारसरणीला आव्हान दिले होते.

टिळक–आगकरांच्या जन्माअगोदर 'बॉम्बे असोसिएशन'ची सुरवात झाली होती. हे सर्व संदर्भ लक्षात घेतल्याशिवाय टिळक–आगरकर–गोखले या त्रिकोणी प्रगल्भतेचा वेध घेता येणार नाही.

टिळकांचा जन्म २३ जुलै १८५६ आणि आगरकरांचा १४ जुलै १८५६. आगरकर हे टिळकांपेक्षा फक्त नऊ दिवसांनी मोठे. गोखलेंचा जन्म ९ मे १८६६. म्हणजे गोखले त्या दोघांपेक्षा १० वर्षांनी लहान. टिळक–आगरकरांचा जन्म १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाअगोदर एक वर्ष आणि गोखलेंचा युद्धानंतर नऊ वर्षांनी. या सर्वांची आयुष्यरेषा तशी फारशी लांब नव्हती. आगरकर वयाच्या ३९ व्या वर्षी, गोखले वयाच्या ४९ व्या वर्षी आणि टिळक ६४ व्या वर्षी गेले. लोकहितवादी वयाच्या ६९ व्या वर्षी आणि महात्मा फुले वयाच्या ६३ व्या वर्षी. पण सर्वांचा कार्यकाळ सुमारे ५० वर्षांचा आणि तोही एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या पर्वातला. या पर्वाचा शेवटचा दुवा म्हणजे लोकमान्य टिळक. तो दुवा बरोबर १०० वर्षांपूर्वी या दिवशी म्हणजे १ ऑगस्ट १९२० रोजी तुटला. नव्या पर्वाची, नव्या कालखंडाची– गांधी–नेहरूयुगाला सुरुवात झाली.

कुमार केतकर, दिल्ली
ketkarkumar@gmail.com
Mob.: 9821524131

(इंग्रजी व मराठी पत्रकारितेत चार दशके वावरलेल्या कुमार केतकर यांनी, महाराष्ट्र टाइम्स, लोकमत, लोकसत्ता व दिव्य मराठी या चार प्रमुख मराठी दैनिकांचे संपादकपद भूषवले आहे आणि त्यांच्या लेखनाची डझनभर पुस्तके प्रकाशित झाली आहेत, सध्या ते राज्यसभेचे सदस्य आहेत.)

लोकमान्य
स्मृतिशताब्दी

काळकोठडी मंडाले

अरविंद गोखले

मंडालेच्या तुरुंगातून सुटका होऊन लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यात गायकवाड वाड्याच्या दिंडी दरवाजासमोर उभे राहिले, तो दिवस होता १७ जून १९१४. त्यांनी दिंडीची खिटी वाजवली. ''कौन'' आतून भैयाचा आवाज आला. टिळकही बाहेरून म्हणाले, ''मै टिळक.'' भैयाने त्यांना काही क्षण थांबायला सांगितले. त्याने धोंडोपंतांना वर जाऊन निरोप दिला. तेही लगोलग आले. त्यांनी दार किलकिले करून पाहिले, तो त्यांचा डोळ्यांवर विश्वासच बसला नाही. साक्षात् दादा म्हणजे त्यांचे मामा दरवाजात स्वत:ची वळकटी घेऊन उभे होते. दरवाजा उघडला. धोंडोपंतांनी दादांना वाकून नमस्कार केला. ते घरात आले. सर्व घर त्यांना पाहण्यासाठी जागे झाले. 'दादाऽ, दादाऽऽ', असा गलका सुरू झाला. दादांची नजर काही वेगळेच शोधत होती. ते एका खोलीतून दुसऱ्या खोलीत फिरले. सगळीकडे त्यांनी नजर टाकली. ती ज्या एका व्यक्तीला शोधत होती, ती त्या समोरच्या भिंतीवर होती. टिळक त्या तसबिरीसमोर उभे राहिले. त्यांनी हात जोडले. टिळक आपली पत्नी सत्यभामाबाई यांच्या तसबिरीसमोर उभे होते. त्यांची मुले त्यांना बिलगली होती. त्यांनी आपल्या उपरण्याने डोळ्यांच्या कडा पुसल्या. त्यांना काहीसे अंधारून आल्यासारखे झाले. त्यांनी आपल्या

टिळकांनी तुरुंगातल्या आपल्या वास्तव्यात फ्रेंच, जर्मन आणि पाली या भाषांचा पुस्तकांवरून अभ्यास केला. त्यांना या भाषा चार ते सहा महिन्यांत येऊ लागल्याचे त्यांनी एका पत्रात नमूद केले आहे. फ्रेंचसाठी त्यांनी व्हिक्टर ह्युगोचे ह्युगोज फ्रेंच रिडिंग, ह्युगोज व्हर्ब सिंप्लिफाईड, ह्युगोज फ्रेंच जेंडर्स, ह्युगोज कॉन्व्हर्सेशन सिंप्लिफाईड अशी चार पुस्तके त्यांनी वाचून आपला फ्रेंचचा पाया पक्का केला होता. ह्युगोचे व्याकरण पाणिनीशी मिळते-जुळते आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले होते. प्रत्येक गोष्टीची चिकित्सा करायची आणि त्याबद्दलचे शोध घेत राहायचे, ही त्यांची उपजत वृत्ती होती. त्यामुळेच त्यांनी ब्रह्मदेशात असलेल्या मिकटिला (मेक्टिला) या नावाचा उगम कोठे असायची शक्यता आहे, ते दादासाहेब खापर्डे यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. मिकटिला हे नाव रामायणातल्या जनक राजाच्या मिथिला या नावाशी साधर्म्य दाखवणारे आहे, असे त्यांचे मत होते.

मुलांना जवळ घेतले आणि या मुलांना जे काही समजावायचे, ते समजावले. त्यानंतर ते एका खाटेवर ध्यानस्थ अवस्थेत बसले. तेवढ्यातच जरा बाजूला गेलेल्या रामने त्यांना ''बाहेर केवढी गर्दी झाली आहे, पाहिलीत का?'' असे त्यांच्याजवळ येऊन म्हटले. टिळकांनी डोळे उघडले. ती आपल्यातून गेली, यावरच ते अजून विचार करत असावेत. पहाटेच्या सुमारास ही गर्दी माना उंचावून आणि टाचा वर करून एकाच दर्शनाचा ध्यास घेत होती. त्यांना टिळक हवे होते, त्यांचा देव त्यांना पाहायचा होता. टिळक अगदी एक-एक पाऊल उचलत गॅलरीत आले आणि ते आपल्या भक्तांना पाहू लागले. अथांग समाज होता तो. म्हातारे-कोतारे, आबालवृद्ध, स्त्री-पुरुष असे सगळेच तिथे होते. कुठेही घोषणाबाजी नाही, कुठेही गलका नाही. कुणी पदराआड डोळे करत होते, कोणाच्या आनंदाश्रूंना पारावार उरलेला नव्हता. टिळकांनी पुन्हा एकदा हात जोडले. ''मला जे सांगायचंय, ते मी उद्या सांगेन. माझ्या उदंड स्नेहीजनांनो, आता तुम्ही विश्रांती घ्या-'' असे काहीसे ते बोलले आणि आत गेले. तथापि, गर्दी काही हटत नव्हती. टिळक पुन्हा एकदा बाहेर आले आणि गेले. त्यांची उलघाल काही संपत नव्हती. ते विचारमग्न झाले. गायकवाड वाड्याकडे जाणारे रस्ते पोलिसांनी अडवले आणि येणाऱ्या-जाणाऱ्यांची नावे लिहून घ्यायला प्रारंभ केला. हेतू हा की, लोकांनी टिळकांकडे जाणे थांबवावे; पण झाले उलटेच. तुम्ही नावेच घेणार आहात, मग आमच्या दैवताला भेटण्याचा आमचा हक्कच आहे- असे त्यांनी मनाशी पक्के केले आणि ते गायकवाड वाड्यात शिरायला जागा नसतानाही आत सरकत राहिले. सकाळ उजाडेपर्यंत टिळकही आपल्या थकव्याला बाजूला सारून आत-बाहेर करत राहिले.

टिळकांनी आकाशाकडे एकदा पाहिले. समोरच्या गर्दीवर एक नजर टाकली. ती लोकयुगाची नांदी होती. त्यांच्या डोळ्यांसमोरून १८९७ पासूनचा मागल्या सतरा वर्षांचा पट झरझर सरकत गेला. ते त्या गेलेल्या वर्षांच्या स्मरणात गुंतून गेले. ते पुन्हा एकदा विचारमग्न झाले.

राजद्रोहाचे दोन खटले आणि प्रदीर्घ कारावास. असंख्य यातनांना सामोरे जात त्यांनी ज्या धीरोदात्तपणे क्रूरकर्म्या ब्रिटिशांशी संघर्ष केला, त्याला जगाच्या इतिहासात तोड नसेल. दुसऱ्या राजद्रोहाच्या खटल्याच्या निकालापूर्वी जेव्हा न्यायमूर्ती दिनशा दावर यांनी, ''तुम्हाला काही सांगायचे आहे काय?'' असे टिळकांना विचारले, तेव्हा त्यांनी ''ज्यूरींनी जरी मला गुन्हेगार ठरविले असले तरी मी निर्दोष आहे, अशी माझी मनोदेवता मला ग्वाही देत आहे. मानवी शक्तीहून अधिक वरिष्ठ प्रतीच्या शक्ती जगत्सूत्रे चालवीत आहेत; आणि मी ज्या कार्याकरता प्रयत्न केले, त्या कार्याला माझ्या दु:खाने व संकटानेच अधिक जोर यावा, असा ईश्वरी नेमानेम दिसतो'', असे बाणेदार उद्‌गार काढले होते. त्याने ते न्यायालयही थक्क झाले. त्यालाही आता सहा वर्षे झाली. मधे बरेच काही घडून गेले, तरी त्यांचा संघर्ष संपलेला नव्हता.

टिळकांना राजद्रोहाची झालेली पहिली शिक्षा त्यांच्या स्फोटक लिखाणाबद्दल होती. दुसरी शिक्षाही त्याच कारणासाठी होती. राजद्रोहाच्या पहिल्या खटल्यात १८९७ मध्ये चार्ल्स वॉल्टर रँड आणि लेफ्टनंट सी. इ. आयर्स्ट यांच्या खुनात टिळकांना अडकवायचे होते. ब्रिटिशांचा तो प्रयत्न फसला. रँड आणि आयर्स्ट यांचा खून गणेशखिंड रस्त्यावर चापेकर बंधूंनी केला; पण त्यात जर चापेकरांना अपयश आले असते, तर लोकमान्यांचे एक निष्ठावान कार्यकर्ते आणि भाऊ रंगारी तालमीचे वस्ताद काशीनाथ ठकुजी जाधव यांनी रँडचा काटा काढला असता.

त्या खुनांच्या चौकशीसाठी जेव्हा मुख्य तपास अधिकारी हॅरी ब्रुईन त्यांच्याकडे आला आणि त्याने चौकशी सुरू केली, तेव्हा त्याने रँड व आयर्स्ट यांचे खून हे पुण्याला लागलेले लांच्छन आहे, असे मत व्यक्त केले. त्यावर टिळकांनी त्याला स्पष्ट शब्दांत बजावले की, ते लांच्छन तुम्हाला वाटत असले तरी ते मला तसे वाटत नाही. मग ब्रुईन याने थेट आपल्या भात्यातला बाण काढला आणि म्हटले, ''मिस्टर टिळक, तुम्हाला या खुन्यांची माहिती असेलच ना?'' कोणाच्याही शब्दात चुकूनसुद्धा न अडकणारे टिळक त्याला म्हणाले, ''मला या खुन्यांची माहिती नाही आणि समजा ती असलीच तर ती मी तुम्हाला द्यायला काही या सरकारचा नोकर नाही. मी तुमचा खबऱ्या नाही.'' त्यांनी या ब्रुईनला असे निरुत्तर केले आणि तो हात हलवत माघारी गेला. पण आरोपपत्र दाखल करताना टिळक हे त्या खुनात प्रत्यक्ष सहभागी नसले तरी त्यांची गुन्हेगारांना साथ होती, असे म्हटले. टिळकांचे अग्रलेख आणि त्यांचा केसरी वाचूनच चापेकर बंधूंनी हे खून केले, असे त्या खटल्यात इंग्रजांना सिद्ध करायचे होते. त्यात त्यांना यश जरी आले नसले, तरी टिळकांना दोषी ठरवण्यात न्यायमूर्ती स्ट्रॅची यांना

यश आले.

मुळात रँड हा अतिशय कर्तबगार अधिकारी होता, असे सव्वाशे वर्षांनंतर सांगणारे काही जण आपल्यामध्ये आजही आहेत. त्यांच्या डोक्यात एक वेगळीच विषारी कल्पना आजही दबा धरून बसली असण्याची शक्यता आहे, त्यांच्यासाठी ही माहिती आवश्यक आहे. रँडने १८९७ मध्ये आलेल्या प्लेगमध्ये प्रारंभीच्या काळात काही तडकाफडकी निर्णय घेतले. त्याने गावाबाहेर एक छावणी उभी केली आणि प्लेग झालेल्यांना त्याने पोलिसांच्या साह्याने त्या छावणीमध्ये नेऊन टाकले. तोपर्यंत सर्व गोष्टी ठीक होत्या. टिळकही प्लेगच्या अधिकाऱ्यांना सहकार्य करायचे आवाहन करत होते. पण जेव्हा रँडच्या सैनिकांनी घराघरांत शिरून महिलांना घराबाहेर काढून त्यांच्या काखांची आणि जांघांची तपासणी करायला प्रारंभ केला, तेव्हा त्या घृणास्पदतेची हद्द ओलांडली गेली. रँडला ठार करण्यात आले आणि पुणेकरांनी सुटकेचा नि:श्वास टाकला. त्या काळात या खुनाची तयारी अतिशय गुप्तता बाळगून चालू होती. यापैकी कोणताच प्रकार टिळकांना माहीत नसेल, असे नाही; कदाचित त्यांना माहितीही असेल, पण त्यांच्याकडून त्याची वाच्यता केली जाणे अवघड होते. रँड आणि आयर्स्ट मारले गेल्यावर इंग्रज अधिकारी आणि त्यांचे सोजिर एकदम पिसाळले. टिळकांनी त्याच काळात 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?', हा अग्रलेख लिहिला (६ जुलै १८९७) होता. २२ जून १८९७ रोजी रँड आणि आयर्स्ट मारले गेले. तो दिवस मंगळवार असल्याने त्या दिवशीच्या केसरीत त्या घटनेविषयी काहीही प्रसिद्ध झाले नाही, हे अर्थातच स्वाभाविक होते. पण त्यानंतरच्या म्हणजे २९ जूनच्या अंकाचा अग्रलेख होता, 'गेल्या मंगळवारी रात्री घडलेला भयंकर प्रकार!' या अग्रलेखाची प्रारंभीची मांडणी अशी– 'बुधवारी सकाळी शहरात जेव्हा मि.रँड यांस कोणी गोळी घातल्याची बातमी आली, तेव्हा पहिल्याने ती कोणासच खरी वाटेना. ही भयंकर गोष्ट घडून येण्याचा संभव कोणासही वाटत नव्हता, करिता वरील बातमी कानी पडल्याबरोबर तिने सर्वांचीच अंत:करणे खेदाने आणि आश्चर्याने भरून गेली.' या अग्रलेखानंतर ब्रिटिश सोजिर पुण्यात पिसाळल्याप्रमाणे वागू लागले. तेव्हा टिळकांनी, 'राज्य करणे म्हणजे सूड उगविणे नव्हे!' हा अग्रलेख (१३ जुलै १८९७) लिहिला.

पहिल्या राजद्रोहाच्या या खटल्याच्या पार्श्वभूमीवर टिळकांवर भरण्यात आलेला राजद्रोहाचा दुसरा खटला चालला. रँडच्या खुनाच्या प्रकरणानंतर बरोबर दहा वर्षांनी पुन्हा जवळपास तशीच स्थिती निर्माण झाली. तेव्हाच्या बंगालमध्ये मुझफ्फरपूर येथे खुदिराम बोस आणि प्रफुल्ल चक्रवर्ती यांनी ३० एप्रिल १९०८ रोजी सत्र न्यायाधीश डग्लस किंग्जफोर्ड यांच्या घोडागाडीवर बाँब फेकतो आहोत असे समजून बाँब फेकला, पण त्या गाडीत बसलेल्या इंग्रज बॅरिस्टर प्रिंजल केनेडी याची पत्नी आणि मुलगी या दोघी ठार झाल्या. बाँब कसे बनवावेत, हे विनायक दामोदर सावरकर यांचे शिष्य पांडुरंग महादेव बापट यांनी कलकत्त्यास जाऊन बंगाली तरुणांना शिकवलेले होते. इंग्लंडहून आलेल्या बापटांनी या बाँबचे पहिले प्रात्यक्षिक पुण्यात गायकवाड वाड्याच्या विहिरीतच केलेले होते. २२ मे रोजी टिळक आणि महाराष्ट्रातील काही जहाल पुढारी यांच्या सह्यांचे एक पत्रक प्रसिद्ध झाले. त्यात मुझफ्फरपूरच्या घटनेने आपल्याला अतीव खेद वाटत असल्याचे म्हटले होते. बाँबहल्ल्याची दखल केसरीकडून घेतली जाणे हे स्वाभाविक आणि टिळकांच्या स्वभावानुसार होते. टिळकांच्या केसरीत तेव्हा प्रसिद्ध झालेल्या एकूण आठ लेखांना इंग्रज सरकारने आक्षेप घेतला. 'देशाचे दुर्दैव' (१२ मे १९०८) हा अग्रलेख आणि त्याच अंकातील दोन स्फुट सूचना असे एकूण तीन लेख टिळकांच्या लेखणीतून उतरलेले होते. अन्य पाच लेख काकासाहेब खाडिलकर यांचे होते.

केसरीत प्रसिद्ध झालेले हे लेखन आपले नाही, असे टिळकांनी न्यायालयास सांगितले असते, तर इतिहास वेगळा झाला असता; पण त्यांनी तसे म्हटले नाही. इंग्रजांच्या मते, प्रत्यक्ष बाँबस्फोटापेक्षाही अतिस्फोटक असलेल्या त्या लेखनाबद्दल टिळकांना सहा वर्षांच्या काळ्या पाण्याची शिक्षा झाली. २२ जुलै १९०८ रोजी त्यांना शिक्षा सुनावण्यात आल्यानंतर त्यांना खास रेल्वेने साबरमतीच्या तुरुंगात रातोरात हलविण्यात आले. खाडिलकरांचे मोठेपण असे की, त्यांनी लगेचच पुण्याच्या न्यायालयात धाव घेतली आणि त्यांनी 'हे अग्रलेख माझे म्हणजे श्री.कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे आहेत आणि त्यांची सर्व जबाबदारी मी घेत आहे', असे प्रतिज्ञापत्र तिथे सादर केले. ते न्यायालयाने अर्थातच फेटाळून लावले.

राजद्रोहाच्या खटल्यात बाळ गंगाधर टिळक यांना सहा वर्षांची शिक्षा झाली. त्या आधी त्यांनी सलग दोन दिवस

आपले या खटल्याबद्दलचे म्हणणे मांडले होते. या भाषणात शब्दांपेक्षा आशय महत्त्वाचा होता. त्याला माझे अतिशय जवळचे स्नेही प्रा.ग.प्र. प्रधान यांनी त्यांच्या 'लोकमान्य टिळक' या ग्रंथात एक छान उपमा दिली आहे. हे भाषण कसे होते, तर इंग्रजीत एक वचन आहे की, 'स्पीक दॅट आय मे सी यू' (तुम्ही बोला म्हणजे तुम्ही काय आहात, ते मला समजेल) यासारखे टिळकांचे हे भाषण ज्यांनी ऐकले, त्यांना टिळकांची असामान्य बुद्धिमत्ता, अपूर्व स्मरणशक्ती, कायद्याचा गाढा व्यासंग, बिनतोड युक्तिवाद करण्याचे सामर्थ्य, त्यांच्या बुद्धिमत्तेचा प्रचंड आवाका आणि त्यांच्या मनातील स्वातंत्र्याची दुर्दम्य नैतिक प्रेरणा– या सर्वांचे अविस्मरणीय दर्शन घडले.

ज्यूरीतील सदस्यांना उद्देशून त्यांनी मग त्यांचे आभार मानले. ते म्हणाले, ''माझे हे विचार बरोबर आहेत असे म्हणणारा एक जण जरी मला ज्यूरीत मिळाला, तरी मला समाधान वाटेल. एखादी गोष्ट मनाला पटली तरी ती बोलून दाखवण्याला एक प्रकारचे धैर्य लागते ते ईश्वराने तुम्हाला द्यावे, अशी माझी प्रार्थना आहे.' या त्यांच्या वाक्यात खटल्याचा निकाल ज्यूरींकडून काय दिला जाणार आहे, याची छटा लपलेली होती. झालेही तसेच. ज्यूरी त्यांच्या खोलीत चर्चेला गेले. न्यायमूर्ती दिनशा दावर यांचे भाषण हे टिळकांना ते दोषी आहेत असेच सांगणारे होते. त्यात त्यांनी तर दूषणांची लाखोलीच वाहिली होती. न्यायालयात टिळकांचे जवळचे सहकारी तात्यासाहेब केळकर, काकासाहेब खाडिलकर, दादासाहेब खापर्डे आदी होते. त्यांच्या चेहऱ्यावर खिन्नतेचे भाव होते. न्यायमूर्ती आत गेल्याने टिळक त्यांच्या त्या आरोपीच्या चौकटीतून बाहेर आले. त्यांनी आपल्याला किती शिक्षा होऊ शकते ते आपल्या या सहकाऱ्यांना बोलून दाखवले. न्यायमूर्ती दावर न्यायालयात पुन्हा दाखल झाले आणि त्यांनी ज्यूरींचा निकाल विचारला. त्यांनी सात विरूद्ध दोन असे आपले मत देऊन 'टिळक दोषी आहेत', असे सांगितले. न्यायमूर्ती दावर यांनी टिळकांना दोषी ठरवलेलेच होते, आता फक्त त्यांच्या शिक्षेचे स्वरूप त्यांना सांगायचे होते. त्यांनी ते सांगितले आणि टिळक हे दोषी असल्याने त्यांना सहा वर्षांच्या काळ्या पाण्याची शिक्षा सुनावली. न्यायमूर्ती दावर यांनी टिळकांना दिलेल्या शिक्षेबद्दल त्यांना ब्रिटिश सरकारने 'नाइटहूड' हा किताबही पुढे बहाल केला. दिनशा दावर हे आधीच्या राजद्रोहाच्या खटल्यात म्हणजे १८९७ मध्ये त्यांचे वकील होते. त्यांनी टिळकांना उद्देशून ते 'रोगट मनोवृत्ती'चे असल्याचे म्हटले होते. टिळकांना त्यांनी 'काही सांगायचे आहे काय', असे विचारले. तेव्हा टिळकांनी त्यांना १४ मुद्दे वाचून दाखवले. ते दावर यांनी फेटाळून लावले आणि 'तुम्हाला काही सांगायचे असल्यास सांगा' असे म्हटले, तेव्हा टिळक अतिशय शांत आवाजात बोलू लागले. त्यांनी आधी दावर यांचाच समाचार घेतला. 'तुमची विशेषणे जनतेच्या चिरकाल स्मरणात राहतील', इतक्या सभ्य भाषेत त्यांनी दावर यांच्या असभ्यतेला उघडे पाडले.

दुसऱ्या दिवशी टिळकांच्या शिक्षेची वार्ता सर्व देशभर वृत्तपत्रांमधून समजली. मुंबईकरांनाही ती समजली. मुंबईत त्या शिक्षेच्या विरोधात दंगे उसळले. त्यात कित्येक जण बळी पडले. टिळकांच्या या शिक्षेविरोधात मुंबईच्या गिरणी कामगारांनी अतिशय उत्स्फूर्तपणे गिरण्यांमधल्या कामावर बहिष्कार टाकला. त्यांच्या सहा वर्षांच्या शिक्षेला उत्तर होते ते दर वर्षाला एक दिवस या न्यायाने कामगारांनी सहा दिवस संप केला. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातला तो पहिला मोठा संप होता आणि त्याकडे साऱ्या जगाचे लक्ष वेधले गेले. रशियन कम्युनिस्ट पक्षाचे नेते लेनिन यांनाही कामगारांवर असलेल्या या महान नेत्याच्या प्रभावाचे विशेष कौतुक वाटले.

टिळकांना दि. २२ जुलै १९०८ रोजी न्यायालयाने रात्रीच्या वेळी शिक्षा सुनावली. टिळकांना लगेचच खास रेल्वेने साबरमतीच्या तुरुंगात नेण्यात आले. शिक्षा काळ्या पाण्याची असल्याने त्यांना १३ सप्टेंबर रोजी मुंबईमार्गे ब्रह्मदेशात (आताचे म्यानमार) रंगूनला (यांगूनला) नेण्यात आले. त्यापूर्वी प्रिव्ही कौन्सिलात अपील करण्यासंबंधीचा अर्ज मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावला होता. मुंबईहून खास गाडीने त्यांना आधी मद्रास आणि नंतर यांगून येथे नेण्यात आले. स्टेशन आले की, गाडीच्या खिडक्या धडाधड बंद केल्या जात होत्या. कोणालाही टिळकांचे दर्शन होता कामा नये आणि टिळकांना बाहेरचे वातावरण कळता कामा नये, याची पूर्ण खबरदारी घेतली जात होती. यांगूनमध्ये त्यांची आगबोट लागत असता, तिथेही गर्दी जमली होती आणि त्या गर्दीतून 'टिळक जिंदाबाद'च्या घोषणा दिल्या जात होत्या. लोकमान्य टिळक मंडालेहून परतले ते १७ जून १९१४ रोजी. टिळकांचे मंडालेचे जीवन कसे होते, हे त्यांनी केसरीला दिलेल्या मुलाखतीत सांगितले

होते. ही मुलाखत दि. २३ जून १९१४ च्या केसरीत प्रसिद्ध झाली आहे. या मुलाखतीच्या शिरोभागात म्हटले आहे की, 'टिळकांना शिक्षा होऊन हायकोर्टाच्या इमारतीतून अदृश्य झाल्यापासून फिरून ते पुण्यास दिसेपर्यंत त्यांच्यासंबंधीची हकिगत सहा वर्षांत काय घडली याविषयी लोकांस फार उत्कंठा लागून राहिली होती हे आम्हांस माहीत आहे. पण त्यांच्या खासगी पत्रांव्यतिरिक्त त्यांची हकिगत कळण्यास दुसरा काहीच मार्ग नव्हता; व खासगी पत्रांमध्ये अर्थातच खासगी मजकूर असणार. यामुळे लोकांची जिज्ञासा आम्हांस फारशी तृप्त करता आली नाही. पण सुदैवाने टिळक आता सुटून आल्यामुळे व त्यांच्याच तोंडून ती हकिकत कळण्यासारखी असल्यामुळे आम्ही त्यांची मुलाखत घेतली.'

साबरमतीच्या तुरुंगातच टिळकांचे वजन दहा दिवसांमध्ये दहा पौंडांनी कमी झाले होते. साबरमतीहून टिळकांना १३ सप्टेंबर १९१४ रोजी हार्डिंग या लष्कराच्या मोठ्या बोटीने नेण्यात आले. त्यांना आणि त्यांच्याबरोबरच्या गुजराती स्वयंपाकी कैद्यास बोटीच्या तळघरातल्या दोन स्वतंत्र खोल्यांमध्ये- खोल्या कसल्या अंधारकोठड्याच त्या- ठेवण्यात आले होते. रोज संध्याकाळी टिळकांना एक गोरा पोलीस अधिकारी बोटीवर फिरायला घेऊन जात असे. टिळकांनी सांगितले त्यानुसार, त्या खोलीत बारा आणि बारा चोवीस तास उकडत असे. असे नऊ दिवस टिळकांनी त्या आगबोटीच्या प्रवासात काढले. दि. २२ सप्टेंबर १९१४ रोजी ते रंगूनला पोहोचले. संध्याकाळचे चार-साडेचार वाजले असतील. त्यांना बोटीवरून उतरवून तिथेच उभ्या असलेल्या एका आगगाडीत बसविण्यात आले. तो दुसरा स्वयंपाकी कैदीही

तिथे होताच. दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. २३ सप्टेंबरला सकाळी आठ वाजता टिळक मंडालेच्या स्टेशनात पोहोचले. त्यांच्यासमवेत अहमदाबादपासून आलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांना मंडालेच्या तुरुंगाधिकाऱ्याच्या स्वाधीन केले.... आणि आधीच योजून ठेवलेल्या कोठडीत त्यांची रवानगी करण्यात आली. मंडालेचा तुरुंग हा मंडालेच्या किल्ल्यात नैर्ऋत्य दिशेला आहे (म्हणजे तेव्हा तो होता. त्यास लोकमान्यांचे नातू जयंतराव टिळक यांनी भेट दिली, तेव्हाही म्हणजे नव्वदच्या दशकात तो होता आणि टिळकांना जिथे ठेवण्यात आले होते, ती कोठडीही तिथे होती. तिथे स्मारक म्हणून टिळक हॉलही होता. आता तोही नाही.) या किल्ल्यात असलेल्या त्या तुरुंगाची भिंत फक्त आज आहे, पण आतमध्ये म्यानमारच्या लष्कराचे केंद्र आहे.

मंडालेत टिळकांना वृत्तपत्रे मिळू शकत नव्हती आणि रेडिओ किंवा अन्य कोणतीही माध्यमे उपलब्ध नव्हती. टिळकांना जो काही पत्रव्यवहार करायला मिळे. त्यातून महिन्यातून केवळ दोनदा ते पत्रे पाठवू शकत. म्हणजेच दोन आठवड्यांतून एकदा त्यांना पत्र पाठवता येई. पण ती सर्व पत्रे त्यांनी इंग्रजीतच लिहिली पाहिजेत, असे त्यांच्यावर बंधन होते. टिळकांनीही आपल्या अगदी घरातल्या आणि सर्व हितचिंतकांना 'खुशालीची पत्रे जरूर लिहावीत, पण त्या पत्रांमध्ये कोणत्याही राजकीय विषयांचा उल्लेख करू नये', असे बजावले होते. याचे कारण जर तुरुंगाधिकाऱ्यांना यात काही तरी संशयास्पद मजकूर आहे असे वाटले, तर ते पत्र त्यांच्यापर्यंत पोहोचणारच नाही, हे उघड होते. टिळकांनी आपली पत्रे तुरुंगाधिकाऱ्याला वाचता येतील अशा बेतानेच लिहिली. तुरुंगात असलेल्या टिळकांवर इंग्रजांची अर्थातच पाळत होती आणि टिळकांना त्याची कल्पना होती. मंडालेच्या तुरुंगात येऊन चार महिने झाले, तरी त्यांना वृत्तपत्रे मिळत नव्हतीच. त्यासाठी जेव्हा परवानगी मिळेल तेव्हा मी कळवेन, तेव्हा वृत्तपत्रे पाठवायला हरकत नाही– असे त्यांनी आपले भाचे धोंडोपंत विद्वांस यांना कळवलेले होते. टिळकांना तुरुंगातसुद्धा आपल्या घरातल्या ग्रंथसंग्रहाची काळजी होती. त्यांनी या पुस्तकांची खबरदारी कशी घ्यायला हवी, हे पत्राद्वारे विद्वांसांना कळवलेले होते. आपल्याला आता पुस्तकांची गरज आहे आणि कोणकोणती पुस्तके पाठवायची आहेत याची भली मोठी यादीच टिळकांनी विद्वांसांना पाठवलेली होती. कॉंतच्या 'पॉझिटिव्ह फिलॉसॉफी'चे तीन खंड आणि 'पॉझिटिव्ह पॉलिटी'चे चार खंड पाठवून द्यावेत, असे त्यांनी पहिल्याच पत्रात लिहिले होते. आनंदाश्रमाच्या ब्रह्मसूत्रांचे दोन खंड आणि भगवद्गीतेचा एक खंड पाठवावा. ज्याची नावे इंग्रजीत आहेत, असे हे खंड असल्याने येथे मिळण्यास मला प्रयास पडणार नाही, असेही त्यांनी कळवलेले होते. म्हैसूरच्या पॅलेस लायब्ररीचे ग्रंथपाल महादेवशास्त्री यांच्याकडून उपनिषदे आणि त्यांचे भाषांतर मिळवावे, हे त्यांनी स्पष्ट केले होते. स्वत:च्या घरात कोणता ग्रंथ कोणत्या बाजूने, कोणत्या रकान्यात आणि कोणत्या ठिकाणी सापडेल, हेही त्यांनी कळवलेले होते. विशेष हे की, त्यांनी सांगितलेल्या ठिकाणी ती पुस्तके मिळत होती आणि ती पुण्यातून त्यांच्याकडे पाठवण्यात येत होती. मागवलेल्या पुस्तकांमध्ये त्यांनी संत तुकाराममहाराज यांचा गाथा आणि समर्थ रामदासस्वामी यांचा दासबोध पाठवावा, असे लिहिले आहे.

मंडालेहून पुस्तकांचे मागणीपत्र दर महिन्यात वाढतच होते. तेही स्वाभाविक होते. पण मंडालेच्या तुरुंगात राहून ते आपल्या केसरी आणि मराठा या पत्रांविषयीही काळजी करत होते. मंडालेत पुण्याहून आणि इतर भागांतून पाठविण्यात आलेल्या पुस्तकांची संख्या साडेचारशेच्या घरात निघाली. आपण तिथे नसताना खाडिलकर व केळकर या दोघांनाही ही वृत्तपत्रे सांभाळायची आहेत आणि ती ते काळजीपूर्वक चालवतील, अशी आपल्याला खात्री आहे; पण तरीही ब्रिटिशांची नजर लक्षात घेऊनच दोघांनीही स्वत:चे लेखन परस्परांना दाखवून मगच ते छपाईसाठी द्यावे, असेही ते कळवतात. 'नेहमी लक्षात ठेवा की, एकाच्या दोन डोळ्यांपेक्षा चार डोळे कधीही चांगले असल्याने त्याबाबतची खात्री घेणे गरजेचे आहे', असे त्यांनी बजावले. एका पत्राच्या शेवटी त्यांनी 'केळकर, खाडिलकर आणि लिमये यांना मी विचारले आहे, असे सांगावे.' असे लिहिले आहे. याचाच अर्थ, त्यांना या तिघांकडून पत्र लिहिले जावे असे अपेक्षित असणार, हे उघड आहे. धोंडोपंत विद्वांस हे भाचे आणि केसरीचे व्यवस्थापक असल्याने त्यांना लिहिलेल्या खासगी पत्रांमध्ये ते आपल्या पत्नीची व मुलांची चौकशी करीत. पत्नीच्या आजारपणात आपण तिथे नाही हे किती वाईट आहे, असेही ते एका पत्रात लिहितात. चिरंजीवांसोबत मथू या आपल्या कन्येलाही चांगले शिकवावे, असे त्यांनी एका पत्रात

लिहिले होतेच; पण त्या पत्रात 'खरे तर तीच चांगले शिकू शकते' असे एक वाक्य असल्याने टिळकांना मुलीपेक्षा मुलांची चिंता कशी सतावत असेल, हेही लक्षात येते. त्यांच्या व्यायामाकडे लक्ष द्यावे, असेही ते लिहितात.

टिळकांनी तुरुंगातल्या आपल्या वास्तव्यात फ्रेंच, जर्मन आणि पाली या भाषांचा पुस्तकांवरून अभ्यास केला. त्यांना या भाषा चार ते सहा महिन्यांत येऊ लागल्याचे त्यांनी एका पत्रात नमूद केले आहे. फ्रेंचसाठी व्हिक्टर ह्युगोचे ह्युगोज फ्रेंच रिडिंग, ह्युगोज व्हर्ब सिंप्लिफाईड, ह्युगोज फ्रेंच जेंडर्स, ह्युगोज कॉन्व्हर्सेशन सिंप्लिफाईड अशी चार पुस्तके त्यांनी वाचून आपला फ्रेंचचा पाया पक्का केला होता. ह्युगोचे व्याकरण पाणिनीशी मिळते-जुळते आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले होते. प्रत्येक गोष्टीची चिकित्सा करायची आणि त्याबद्दलचे शोध घेत राहायचे, ही त्यांची उपजत वृत्ती होती. त्यामुळेच त्यांनी ब्रह्मदेशात असलेल्या मिकटिला (मेक्टिला) या नावाचा उगम कोठे असायची शक्यता आहे, ते दादासाहेब खापर्डे यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. मिकटिला हे नाव रामायणातल्या जनक राजाच्या मिथिला या नावाशी साधर्म्य दाखवणारे आहे, असे त्यांचे मत होते. अलीकडे नेपाळचे पंतप्रधान के.पी. शर्मा ओली यांनी नेपाळमध्ये श्रीरामाची अयोध्या होती, असा दावा केला असल्याने श्रीरामावर आता भारताच्या पूर्वेला किंवा ईशान्येकडे असणारे देश आपला हक्क सांगतील की काय, अशी शंका मनाला चाटून जाते. (हे मी गमतीने लिहिले आहे, अन्यथा एक नवा वाद निर्माण केल्याबद्दल मला जबाबदार धरले जाईल, ही भीती वाटते.)

मंडालेला प्लेगची साथ आल्याने टिळकांना त्या तुरुंगातून मेक्टिला येथे हलविण्यात आले होते. तिथे त्यांनी आपले एक नवे मृत्युपत्र तयार केले. हे मृत्युपत्र टिळकांनी त्यांचे वकील मित्र दाजी आबाजी खरे यांच्याकडे ठेवायला द्या, असे धोंडोपंत विद्वांसांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. पुढे जाऊन ते लिहितात की, हे मृत्युपत्र जपून ठेवण्याबाबत खरे यांना काळजी घेण्यास सांगावे आणि ते एकसारखे फिरत असल्याने त्यांच्या सौभाग्यवतींजवळ ते द्यावे म्हणजे ते सुरक्षित राहील, असेही त्यांनी म्हटलेले आहे. आधीचे मृत्युपत्र त्यांनी श्रीलंकेत केले होते. या मृत्युपत्राची एक अस्सल प्रत माझ्याकडे कल्याणचे दत्ता जोशी यांनी आणून दिली होती. ही प्रत अस्सल होती, हे त्या पत्रातल्या अक्षराची खात्री करून घेतल्यावर स्पष्ट झाले. दत्ता जोशी हे आपल्या आजोळी म्हणजे दापोलीजवळ हर्णे येथे गेले असताना त्यांना आवराआवरीत एका मोठ्या ट्रंकेत हे मृत्युपत्र आढळले. त्यांनी त्याबाबतची वाच्यता माझे एक स्नेही आणि सद्गुरू साईबाबा या दिवाळी अंकाचे संपादक बाळ जाधव यांच्याकडे केली. त्यांनी ते मला सांगितले आणि त्या मृत्युपत्राला मी केसरीचे संपादक आणि लोकमान्यांचे पणतू डॉ.दीपक टिळक यांच्याकडे समारंभपूर्वक सुपूर्द केले. हे मृत्युपत्र केसरी कार्यालयात लोकमान्य संग्रहालयात आजही पाहायला मिळू शकते.

दि.९ सप्टेंबर १९०९ रोजी टिळक पुन्हा मेक्टिलाहून मंडालेला परत आले. त्यानंतर वर्षभराने त्यांनी 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहायला घेतला. गीतारहस्य हा एक अद्भुत ग्रंथ तर आहेच, पण तो हिंदू धर्मविषयक तत्त्वज्ञानाने भारलेला गेल्या दोन शतकातला सर्वोत्तम ग्रंथ आहे. हा ग्रंथ म्हणजे टिळकांनीच म्हटल्याप्रमाणे 'गीतेचे बहिरंग परीक्षण, मूळ संस्कृत श्लोकांचे मराठी भाषांतर, अर्थनिर्णायक टीपा, पौर्वात्य व पाश्चिमात्य मतांची तुलना वगैरे'सह परिपूर्ण आहे. 'गीतारहस्या'त प्रामुख्याने दोन भाग पाडण्यात आले, त्यापैकी पहिल्या भागात आधुनिक वाटावीत अशा पद्धतीची प्रकरणे आहेत. उपसंहारासह एकूण पंधरा प्रकरणे पूर्वार्धात

गीतारहस्य हा ग्रंथ लोकमान्यांनी विक्रमी वेळेत लिहून पूर्ण केला. २ नोव्हेंबर १९१० रोजी त्यांनी ग्रंथलेखनास प्रारंभ केला आणि पहिली आठ प्रकरणे त्यांनी एक महिना सहा दिवसांमध्ये पूर्ण केली. हे काम ४१३ पानांचे होते. संपूर्ण लेखन त्यांनी ३० मार्च १९११ रोजी संपवले आणि त्यानंतर त्यांनी सविस्तर प्रस्तावना लिहायला घेतली. पुस्तकाची अनुक्रमणिका, समर्पण हेही त्यांनी त्याबरोबरच पूर्ण केले. कोणत्या मजकुरापुढे कोणता मजकूर घ्यायचा, याबद्दलचा तपशीलही त्यांनी स्वतंत्ररीत्या लिहून ठेवला. प्रत्यक्षात हा ग्रंथ ८८८ पानांचा झाला आहे.

आहेत आणि उत्तरार्धात गीतेचे बहिरंग परीक्षण आहे. त्यात गीता व महाभारत, गीता व उपनिषदे, गीता व ब्रह्मसूत्रे, भागवत धर्माचा उदय व गीता, हल्लीच्या गीतेचा काल, गीता व बौद्ध ग्रंथ, गीता व ख्रिस्ती बायबल असे एकूण सात स्वतंत्र भाग आहेत आणि त्यानंतर गीतेचा श्लोकवार अर्थ देण्यात आला आहे. या शेवटच्या भागात गीतेचे मूळ श्लोक, त्यांचे मराठी भाषांतर आणि टीपा देण्यात आल्या आहेत. अगदी आजच्या भाषेत सांगायचे तर, एवढा सर्वसाक्षी ग्रंथ झाला नाही. हा ग्रंथ त्यांनी मंडालेच्या तुरुंगात लिहायला घेतला आणि तुरुंगातच लिहून पूर्ण केला.

हा एवढा मोठा ग्रंथ लोकमान्यांनी विक्रमी वेळेत लिहून पूर्ण केला. २ नोव्हेंबर १९१० रोजी त्यांनी ग्रंथलेखनास प्रारंभ केला आणि पहिली आठ प्रकरणे त्यांनी एक महिना सहा दिवसांमध्ये पूर्ण केली. हे काम ४१३ पानांचे होते. संपूर्ण लेखन त्यांनी ३० मार्च १९११ रोजी संपवले आणि त्यानंतर त्यांनी सविस्तर प्रस्तावना लिहायला घेतली. पुस्तकाची अनुक्रमणिका, समर्पण हेही त्यांनी त्याबरोबरच पूर्ण केले. कोणत्या मजकुरापुढे कोणता मजकूर घ्यायचा, याबद्दलचा तपशीलही त्यांनी स्वतंत्ररीत्या लिहून ठेवला. प्रत्यक्षात हा ग्रंथ ८८८ पानांचा झाला आहे.

आपल्याला आता शेवटही दिसू लागला असल्याचे 'कृतांतकटकामलध्वज–जरा दिसों लागली, पुरस्सर गदांसवे झगडता तनू भागली' या महाराष्ट्र कविवर्य मोरोपंतांच्या श्लोकातून प्रस्तावनेत त्यांनीच सांगितले आहे. या ग्रंथाची संकल्पना त्यांच्या मनात वयाच्या अगदी सोळा वर्षापासूनच घोळत असली पाहिजे. त्यासाठी लागणारा अपूर्व असा व्यासंग त्यांच्या अंगी होता, म्हणूनच हे लेखन कोणत्याही अर्थाने सुखासमाधानाची स्थिती नसताना पार पडले. पण टिळकांचा स्वभाव लक्षात घेता, एखादी गोष्ट त्यांनी हाती घेतली की तिच्या मागे हात धुऊन लागण्याची त्यांची सवय होती आणि त्याप्रमाणे त्यांनी हे काम विक्रमी वेळेत पूर्ण केले. हे सर्व लेखन त्यांना पेन्सिलीने करावे लागलेले आहे आणि या वह्या आजही केसरीमध्ये अतिशय जपून ठेवलेल्या आहेत. पुन्हा एकदा थोडासा विषयांतराचा धोका पत्करून एका गोष्टीचा उल्लेख केल्याशिवाय राहवत नाही. मी जे इथे लिहितो आहे त्याबद्दल कोणी ती अंधश्रद्धा म्हणेल, पण ती तशी नाही– हे मी शपथेवर सांगायला तयार आहे. त्याचे असे आहे की, अनेकांना ही घटना म्हणजे अशक्य कोटीतली कथा वाटेल, पण ती मी स्वत: लोकमान्य टिळकांचे नातू आणि माझे पहिले संपादक जयंतराव टिळक यांच्याकडून ऐकलेली आहे. १२ जुलै १९६१ रोजी पानशेत धरण फुटले आणि केसरी जिथून प्रसिद्ध होतो, त्या गायकवाड वाड्याच्या प्रांगणात पाणी शिरले. ते बघता–बघता वाढले आणि ते ग्रंथशालेत भसाभस शिरले. पाणी वाढत होते आणि डोळ्यांदेखत त्या ग्रंथशाळेतल्या अनेक ग्रंथांना ते पोटात घेऊन गेले. केसरीच्या जुन्या अंकांच्या काही फायलीही पाण्याच्या भक्ष्यस्थानी पडल्या. त्यांचा अगदी लगदा झाला. त्या फाइल्स जिथे होत्या त्याच्याच वरच्या बाजूला गीतारहस्याचे हस्तलिखित आणि लोकमान्यांनी लिहिलेली पत्रे, तसेच पंडित मोक्षमुल्लर भट्ट अशी सही असलेले मॅक्समुल्लर यांचे पत्र आणि काही महत्त्वाची कागदपत्रे होती. ज्या ठिकाणी हे पाणी शिरून त्या हस्तलिखिताचा लगदा होण्याची शक्यता होती तिथे हे पाणी थांबले आणि त्या हस्तलिखिताला कोणतीही बाधा पोहोचली नाही. संतश्रेष्ठ तुकाराममहाराजांची गाथा इंद्रायणी नदीत तरल्याची कथा आपण ऐकतो, तशी ही कथा खुद्द जयंतरावांच्या तोंडून मी ऐकलेली आहे. तेव्हा मी शहारून गेलो होतो आणि डोळ्यांत पाणी आले होते. त्या काचपेटीबाहेर लाल खुणेची एक आडवी रेघ होती. त्या खुणेपर्यंत पाणी आले आणि ते ओसरले. पुढे कित्येक दिवस मी त्या ग्रंथालयात गेलो की, काचपेटीतल्या त्या हस्तलिखितापुढे नतमस्तक होत असे. बालकृष्णाचा पाय यमुनेच्या पुराला लागल्यावर ज्याप्रमाणे ते पाणी ओसरले आणि कंस राक्षसाकडून येणाऱ्या मृत्यूपासून त्या बाळाचा जीव वाचवण्यासाठी तो वसुदेव कृष्णासह यमुनापार पोहोचला, तशीच ही एक कथा. ती खूण त्या ग्रंथालयाची इमारत पाडली जाईपर्यंत तिथे होती.

सांगायचा मुद्दा हा की, पानशेतचा पूरही हिमालयाची उंची असलेल्या त्या ग्रंथाला हात लावू शकला नाही, असा हा कर्मयोगशास्त्राचे विस्तृत विवेचन करणारा आणि आपल्या वैचारिकतेच्या सर्व पैलूंना स्पर्श करणारा ग्रंथ शतकातून एकदाच होतो, असे म्हटले तरी चालेल. सांगायचा मुद्दा हा की, टिळकांनी गीतारहस्य लिहिले आणि कदाचित त्यांना खूपच मोठे ओझे उतरल्यासारखे वाटत असणार, यात शंका नाही. अजून तर फक्त तीन वर्षेच झाली होती, शिक्षेची तीन वर्षे उरली. प्रिव्ही कौन्सिलकडे टिळकांच्या वतीने दादासाहेब खापर्डे यांनी अर्ज करायचे ठरवले. त्यांनी तो केलाही, पण भारतमंत्री मोर्ले आणि

प्रिव्ही कौन्सिल यांनी राजाला तसा सल्ला द्यायचे नाकारले. टिळकांना ही बातमी कळली, पण म्हणून ते नाराज झाले नाहीत. सौभाग्यवतीने सिंहगडावर जाऊन राहावे आणि फार तर मुलांनाही बरोबर न्यावे, असे त्यांनी धोंडोपंतांना पत्राद्वारे कळवले. आपल्या भावालाही त्यांनी न्यावे, पण तिथल्या हवेत त्यांना आराम पडावा, अशी आपली इच्छा असल्याचे त्यात त्यांनी म्हटले होते. मन चिंती ते वैरी न चिंती, अशी ती अवस्था होती. पुढे जे घडू नये, असे त्यांनाच काय, त्यांच्या मुलाबाळांना वाटत असेल ते घडून गेले. सौभाग्यवती सत्यभामाबाई टिळक यांचे ७ जून १९१२ रोजी निधन झाले. हा मंडालेत असणाऱ्या टिळकांवर वज्राघात होता.

धोंडोपंतांना दि. ८ जून रोजी पाठवलेल्या पत्रात त्यांनी लिहिले की, 'संकटांचा स्वीकार अतिशय शांतपणे करायची सवय मला आहे. आपल्याकडे ज्या समजुती रूढ आहेत, त्यात पत्नीने पतीच्या आधी जाणे याला अनिष्ट मानत नाहीत. पण अखेरच्या क्षणीही मी तिथे नाही, हे सर्वांत क्लेशदायक आहे. मला नेहमी ही धास्ती वाटत होती आणि शेवटी तसेच घडले. माझ्या आयुष्यातला एक अध्याय संपला आहे आणि दुसराही संपायला फार वेळ लागणार नाही.' टिळकांच्या मनाची अवस्था काय झाली असेल, ते या पत्रातून स्पष्ट होते. आपल्या मुलांवर हे जे संकट कोसळले आहे, त्याविषयीही त्या पत्रात उल्लेख आहे. आकाश कोसळले तरी त्यावर पाय देऊन उभे राहायची न्यायालयासमोर प्रतिज्ञा करणाऱ्या टिळकांवर खरोखरच आकाश कोसळले होते आणि त्यावर पाय देऊन उभे राहणे त्यांच्या आवाक्यापलीकडचे होते. त्यानंतर त्यांनी जी पुस्तके पुण्याहून मागवली होती, त्यात एक होते नित्शेचे (निट्झे) 'बियाँड गुड अँड एव्हिल' (फॉन गुट उंड ब्योज). त्यात ज्ञानाची व्याख्या ही मार्क्सच्या संकल्पनेशी मिळती-जुळती आहे; पण मार्क्सचा सिद्धांत हा काहीसा आर्थिक संबंधांना स्पर्श करणारा आहे, तर नित्शे त्याच्या सामाजिक परिणामांना विचारात घेतो. मार्क्स हा सामाजिक मांडणीचा विचार आधी करतो, तर नित्शे हा सर्व प्रश्नांच्या मुळाशी सामाजिक समतेचा प्रश्न असल्याचे सांगतो. लोकमान्यांची तुरुंगातून बाहेर पडतानाची दिशा स्पष्ट होती.

सुटकेचा दिवसही जवळ येत चालला होता. गीतारहस्यानंतर त्यांनी वेदिक क्रोनॉलॉजी किंवा वैदिक कालगणना हा वेदांग ज्योतिषावरील ग्रंथही मंडालेच्या तुरुंगात लिहिला आणि तोही एका अर्थाने अपुराच राहिला. या ग्रंथाची तारीख आहे १५ मे १९१४. त्यांनी १ जून १९१४ रोजी धोंडोपंतांना लिहिले की, येथून पुढे मी पत्र लिहीन की नाही हे सांगता येत नाही. मला अन्य कुठे हलवणार आहेत किंवा काय, तेही माहिती नाही. मृत्युपत्राच्या अर्थाबाबत काही मतभेद असल्याने मूळ मृत्युपत्राचे शब्दश: भाषांतर करून घेणे आणि ते रोमन लिपीत छापून घेणे चांगले.

मंडालेच्या तुरुंगास 'लोकमान्य' लिहिणारे प्रा.न.र. फाटक यांनी 'मंडालेचे कारातीर्थ' अशी उपमा दिली आहे. लोकमान्यांची सुटका अखेरीस झाली १९१४ च्या ८ जूनला. त्यांच्या कारागृहाचा पर्यवेक्षक तिथे आला आणि त्याने टिळकांना सामान आवरायला सांगितले. त्यांच्या तिथून निघण्याची ही पूर्वसूचना होती. इथून पुढे कोठे याचा त्यांना अंदाज नव्हता. मंडालेच्या किल्ल्यात एक डबा लागलेला होता. त्याचे इंजिन तयार होते. हा डबा पुढे मेलला जोडला गेला. तिथून रंगून, एवढे तरी नक्की होते. टिळकांनी आपली पगडी बरोबर घेतली होती, पण ती त्यांनी या प्रवासात घालू नये, असे त्यांना सांगण्यात आले. त्यांच्या आत्मस्वातंत्र्याचा तरी तो दिवस होता. त्यांनी एक टोपी घातली. दि.९ जून १९१४ रोजी रंगून बंदरात उभ्या असलेल्या मेयो या बोटीवर टिळक गेले. तेव्हा त्यांना बहुतेकांनी ओळखले नाही. ही बोट मद्रासकडे चालली, हे निश्चित होते. दि.१५ जून १९१४ रोजी रात्री ८ वाजता टिळक मद्रास बंदरात दाखल झाले. त्यांना घेऊन जाण्यास रंगूनमध्ये पुण्याचे पाच पोलीस अधिकारी आले होते. ते मद्रासमध्ये त्यांच्याबरोबरच बोटीवर चढले आणि त्यांचा परतीचा प्रवास सुरू झाला.

अरविंद व्यं. गोखले, पुणे
arvindgokhale@gmail.com
Mob. 9822553076

(चार दशके पत्रकारितेत वावरलेल्या अरविंद व्यं. गोखले यांनी, लोकमान्य टिळकांनी स्थापन केलेल्या केसरी या दैनिकाचे संपादकपद दहा वर्षांहून अधिक काळ भूषवले आहे; 'मंडालेचा राजबंदी' हे त्यांचे पुस्तक विशेष महत्त्वाचे असून, लवकरच त्यांचे 'टिळक पर्व' हे पुस्तक प्रकाशित होत आहे.)

लोकमान्य
स्मृतिशताब्दी

टिळकांचे गणितप्रेम

शैलेश माळोदे

स्वातंत्र्य चळवळीला आपल्या कार्याने एक आगळी-वेगळी दिशा देणाऱ्या अनेक द्रष्ट्या राजकीय नेतृत्वांपैकी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या कार्यकर्तृत्वाचा ठसा खूपच प्रभावी ठरला असून, आजदेखील त्यांनी याबाबत बजावलेली कामगिरी तरुण पिढीस मार्गदर्शक ठरलेली आहे. दि.२३ जुलै १८५६ रोजी जन्मलेल्या, भारताच्या राजकीय असंतोषाचे जनकत्व लाभलेल्या लोकमान्य टिळकांची शंभरावी पुण्यतिथी १ ऑगस्टला साजरी होत आहे.

विविधांगी पैलू असलेल्या लोकमान्य टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचं चित्रण विविध चरित्रकारांनी केलंय, विविध अभ्यासकांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील त्यांच्या योगदानाचं विविध पद्धतींनी विश्लेषण केलंय; तरीदेखील टिळकांचे व्यक्तिमत्त्व पूर्णपणे उलगडलंय, असे मला तरी या सर्व वाचनांतून जाणवत नाही. जिज्ञासूंना केसरी ग्रंथालयातील (पुण्याच्या) ग्रंथांच्या माध्यमातून टिळकांना समजून घेण्याचा प्रयत्न करता येतो, कोरोनाच्या संकटकाळात सध्या त्यात व्यत्यय निर्माण झालेला असला तरी.

टिळकांविषयी विविध लेख आणि पुस्तकं आज उपलब्ध आहेत. ग.प्र.प्रधान यांनी १९५४ मध्ये त्यांचा अभ्यास सुरू करून १९५६ मध्ये टिळक जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या काही अप्रसिद्ध आणि अज्ञात बाजूंचा धांडोळा घेणारं चरित्र लिहिलं

जेव्हा टिळकांना पांगारकर यांच्या या टिप्पणीविषयी कळलं, तेव्हा ते त्यांना भेटले आणि त्यांनी बिनतोड युक्तिवाद केला तो असा– ते म्हणाले, ''गणितदेखील एका काव्यासारखंच आहे, ते उमगण्यासाठी एका विशेष प्रकारच्या बुद्धिमत्तेची गरज असते, तेव्हाच गणितामधील काव्याची अनुभूती येते. ज्याप्रमाणे तुम्ही कवितावाचन करताना सौंदर्याची दृश्यता अनुभवता, त्याचप्रमाणे मी खगोलशास्त्राचा अभ्यास करताना आणि ताऱ्यांच्या कक्षेतील भ्रमणासंबंधी गणिती आकडेमोड करताना सौंदर्यानुभव घेतो.''
ते पुढे म्हणाले, ''ज्या माणसाला गणिताची समज वा जाण नाही, त्याच्यात काही तरी बौद्धिक डिफेक्ट असावा.''
अर्थात, आपल्या विद्यार्थ्यांनी केवळ अध्ययनापुरतंच आपले क्षितिज मर्यादित ठेवावं, असं त्यांना वाटत नसे. त्यामुळे त्यांनी विद्यार्थ्यांचं बौद्धिक क्षितिज विस्तारण्यासाठी तत्त्वज्ञान आणि राज्यशास्त्र यासारख्या विषयांबाबतही त्यांना प्रोत्साहित करणं आरंभलं.

होतं. प्रा.प्रधान यांनी स्वतःच म्हटलंय, 'चार दशकांहून अधिक काळ मी टिळकांविषयी, त्यांच्या कार्याविषयी अभ्यास करतोय; पण माझे प्रयत्न त्यांच्या व्यक्तित्वाच्या खोलीपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने अपुरे आहेत.'

राजकीय नेते, वकील, शिक्षक, संस्थाचालक, पत्रकार, शिक्षणतज्ज्ञ, भारतीय तत्त्वज्ञानाचे अभ्यासक आणखी बरीच काही बिरुदं लावूनदेखील अशा काही बाबी आहेत की, त्याविषयीचं टिळकांचं व्यक्तिमत्त्व बहुतेकांच्या दृष्टीने अपरिचितच राहिलं. गणिताची आवड आणि मुख्य म्हणजे, अगदी कॉलेज सोडल्यानंतर तीस-पस्तीस वर्षांचा काळ उलटून गेल्यावरदेखील त्यामधील कॅल्क्युलस याविषयीचं त्यांचं कुतूहल आणि अभ्यास आपणास थक्क करून सोडतो. लोकमान्य टिळक व गणित हा संबंधच आपल्याला कदाचित फारसा अपेक्षित नसतो.

लोकमान्य टिळक म्हटले की- लहानपणीच्या वक्तृत्व स्पर्धेत आपण म्हणत असू, 'मी शेंगा खालेल्या नाहीत, म्हणून मी ही टरफलं उचलणार नाही.'

युवावस्था म्हणजे आयुष्याचा वसंत ऋतूच. याच कालखंडात मनोवस्था अगदी उंचावलेली असते, कोणत्याही आव्हानाचं शिवधनुष्य पेलविण्यासाठी धोके पत्करून, कार्यकर्तृत्वाची मोहर उमटविण्यासाठी.

एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेले टिळक अगदी लहानपणीच मातृसुखाला पारखे झाले. शिक्षण खात्यामध्ये कार्यरत असलेल्या गंगाधरपंतांच्या (टिळकांचे वडील) बहिणीने त्यांचं पालन-पोषण केलं. प्राथमिक शिक्षण रत्नागिरीलाच पार पडलं. वडिलांची बदली पुण्यास झाल्यामुळे ते त्यांच्या कर्मभूमी ठरलेल्या पुण्यास आले. वडिलांच्या दंडकानुसार संस्कृतातील ऋचा आणि मराठीतील श्लोक इत्यादी त्यांना तोंडपाठ म्हणावे लागत. त्या काळच्या रिवाजानुसार बाळ गंगाधर टिळक यांचा विवाह लहानपणी म्हणजे १८७१ मध्ये झाला. पुढच्याच वर्षी त्यांचे वडील निवर्तल्यामुळे काका गोविंदराव यांनी कर्तेपण स्वीकारलं. टिळक सोळा वर्षांचे असताना मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले आणि त्यांनी डेक्कन कॉलेजात प्रवेश घेतला. वडिलांनी शिक्षणासाठी केलेल्या तजविजीमुळे टिळकांना कोणत्याही आर्थिक ओढगस्तीशिवाय आपलं महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करता आलं.

साहित्यसम्राट न.चिं.केळकर यांनी लिहिलेल्या 'टिळक चरित्रा'तील यासंबंधीची माहिती खूपच महत्त्वाची असून त्यांच्या गणिताविषयीच्या आवडीवर प्रकाश टाकणारी आहे. ते लिहितात, बहुतेक अंकगणित समीकरणपर्यंत बीजगणित आणि युक्लिडची दोन बुकं इतकी टिळकांची तयारी इंग्रजी शाळेत जाण्यावेळीच झाली होती. गणिताचे अभ्यासक कै.स.पां.देशपांडे यांनी 'लोकमान्य टिळक आणि कॅल्क्युलस' या शीर्षकाच्या एका लेखाद्वारे ऑक्टोबर १९९६ च्या मराठी विज्ञान परिषद पत्रिकेतील लेखात कलनाविषयीच्या (कॅल्क्युलस) टिळकांच्या आवडीवर प्रकाश टाकला आहे. न.चिं.केळकर त्यांच्याच चरित्रात पुढे लिहितात, '१८७२ मध्ये डिसेंबर महिन्यात बळवंतराव मॅट्रिक्युलेशन परीक्षेस बसले आणि पासही झाले. परीक्षेतील गणित विषयाचा पेपर लिहिताना अवघड तेवढी सोडवून बाकीची उदाहरणं न सोडवता थोड्या वेळातच पास होण्याइतक्या मार्कांची तयारी करून उठून गेले. परीक्षा पास झाल्यावर त्यांनी एक टर्म मुंबईस एल्फिन्स्टन कॉलेजात काढली. तिथे प्रो. हॅनॉर्थवेटकडे गणित शिकविण्याचे काम होते. त्यांचे गणित विषयातील प्रावीण्य पुस्तकी आणि तांत्रिक होते. त्यांची टापटीप व ठरावीक विषय परीक्षेच्या दृष्टीने जरुरीपुरता माहिती करून देण्याची पद्धत चांगली असे. टिळकांना या प्रोफेसराचं शिकवणं पसंत पडलं नाही, म्हणून ते पुण्यास परत आले आणि स्वतःच प्रयत्नाने गणिताचा अभ्यास करून १८७६ मध्ये बी.ए.च्या परीक्षेत पास होऊन प्रथम वर्गात आले. मुंबई विद्यापीठाच्या १८७७-७८ च्या हॅन्डबुकात पान ३१४ वर, बी.ए. पहिल्या वर्गात यशस्वी झालेल्यांच्या यादीत बाळ गंगाधर टिळक हे नाव आहे.

बी.ए.च्या परीक्षेस टिळकांना 'युक्लिड व स्पॅस्टिक्स' या दोन आवश्यक प्रश्नप्रत्रिका होत्या. फिरून पसंतीने घेतलेला विषय म्हणून गणितापैकी तीन शुद्ध गणित (Pure Mathematics) आणि एक अनुप्रयुक्त गणित (Applied Mathematics) असा अभ्यासक्रम होता. टिळकांचे सहकारी रा.ब.शारंगपाणी आपल्या आठवणीत म्हणतात की, टिळकांना गणित विषयापैकी निर्देशक भूमिती (Analytical Geometry) हा विषय विशेष आवडे. त्यांची अभ्यासपद्धती 'ॲनालिटिकल' म्हणजे विवेचक बुद्धीची असे. केवळ पुस्तकातल्या विवेचनाने संतुष्ट न होता स्वतः विषयांचे उभे-आडवे विभाग पाडून, बुद्धी चालवून ते त्या विषयाची काही तरी नवी मांडणी करीत.

बी.ए.नंतर टिळक गणित विषयाचा अभ्यास करून एम.ए.ला. बसले, परंतु नापास झाले. एम.ए.ला गणित

विषय घेतल्यावर आलेल्या अपयशामुळे पुढे स्वत:च गणित शिकत राहण्याचं त्यांनी ठरवलं, परंतु लौकिक शिक्षणासाठी मात्र कायद्याचा मार्ग पत्करला. तेव्हा एम.ए.चा अभ्यास सोडून ते एलएल.बी.कडे वळले. दरम्यानच्या काळात टिळकांवर आणि सहकारी आगरकर यांच्यावर तत्कालीन तत्त्ववेत्ते आणि समाजातील विद्वान यांचा प्रभाव पडलेला होता. समाजासाठी काही तरी चांगलं करण्याची प्रेरणा टिळकांना न्या.महादेव गोविंद रानडे यांच्यापासून सतत मिळत होती. 'सामाजिक सुधारणा आधी की राजकीय सुधारणा?' या मूळ मुद्यावर मतभेद झाल्यावर टिळक आणि आगरकर यांनी वेगळं होऊन कार्य करण्याचा कठोर निर्णय घेतला. तत्पूर्वी रानड्यांप्रमाणे शासकीय सेवेत राहून मर्यादित चौकटीत काम करणं दोघांनाही अमान्य होतं. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या विचारांनीदेखील ते प्रभावित होते. सप्टेंबर १८७९ मध्ये त्यांनी चिपळूणकरांची भेट घेऊन त्यांनी पुण्यात नव्याने चालू केलेल्या 'न्यू इंग्लिश स्कूल' या शाळेत शिक्षक म्हणून गणित शिकविण्याची इच्छा व्यक्त केली. दि.२ जानेवारी १८८० मध्ये शाळा सुरू झाली.

नवयुवकांमधील चेतना जागृत करून त्यांच्यात राष्ट्रप्रेमाचं स्फुल्लिंग चेतवण्याचं काम टिळकांनी हाती घेतलं. त्यांच्यावर टीका करणाऱ्यांकडे दुर्लक्ष करत त्यांनी निष्ठेनं काम सुरू ठेवलं. दि.२४ ऑक्टोबर १८८४ रोजी 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना आणि नंतर संस्थेच्या आधिपत्याखाली २ जानेवारी १८८५ रोजी सुरू झालेले 'फर्ग्युसन कॉलेज' हा त्याच प्रवासातील पुढील टप्पा होता.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा कारभार, केसरी-मराठा यांसारख्या वृत्तपत्रांतील पत्रकारितेमुळे भाषेवरील प्रभुत्व हा त्यांचा महत्त्वाचा गुण. परंतु, कायद्याच्या क्षेत्रात लॉजिकल विचारसरणी महत्त्वाची. राजकीय आणि पत्रकारितेच्या कामात खूपच व्यग्र झाल्यामुळे गणिताच्या औपचारिक शिकवणीत लोकमान्य फारसा वेळ देऊ शकले नाहीत. मात्र न्यू इंग्लिश स्कूलमध्ये पाच वर्षे अध्यापन केल्यानंतर त्यांना कॉलेजात शिकवावेसे वाटू लागले. विद्यार्थिदशेतील त्यांची गणितीय क्षमता त्यांचे सहपाठी आणि प्राध्यापक यांच्या लक्षात आली होती. शारंगपाणी यांनी टिळकांविषयीचा सांगितलेला हा किस्सादेखील खूपच महत्त्वाचा आहे. एकदा त्यांना टिळक आपल्या खोलीत अस्वस्थपणे येरझारा घालत असल्याचे दिसले. कारण विचारल्यानंतर टिळक उत्तरले, ते एका कूट प्रश्नाविषयी विचार करीत आहेत. हा कूटप्रश्न (प्रॉब्लेम) इंटिग्रल कॅल्क्युलसमधील होता. त्यावर शारंगपाणी उत्तरले, 'तुम्ही प्रा.छत्र्यांना का भेटत नाही?' त्यावर टिळक म्हणाले, 'मला पाठ्यपुस्तकातील हा कूटप्रश्न सोडविण्याची पद्धत माहिती आहे, पण मला वेगळ्या पद्धतीने त्याची उकल करायची आहे.' दुसऱ्या दिवशी टिळकांनी नव्या पद्धतीनं त्या कूटप्रश्नाची उकल केली. त्यानंतर ते प्रा.छत्रे यांना भेटले आणि आपली उकल त्यांना दाखविली. प्रा.छत्रे इतके प्रभावित झाले की, त्यांच्या तोंडून उद्‌गार बाहेर पडले ते असे- टिळकांच्या बुद्धिमत्तेत सूर्याची प्रखरता आहे.

फर्ग्युसन कॉलेजात शिकविण्याची संधी स्वीकरण्यास लोकमान्य अत्यंत उत्साही होते. त्यांना आपलं काम खूप आवडे. परंतु त्यांचं शिकवणं हुशार विद्यार्थ्यांनाच समजत असे, सर्वसाधारण बुद्धीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्याबरोबर गती राखता येत नसे. कारण शिकविताना उदा.बायोनॉमियल थिअरम (द्विपदीचं प्रमेय) चे काही टप्पे तोंडी सांगत आणि फक्त महत्त्वाचे टप्पे फळ्यावर मांडत. मराठीतील लेखक आणि अभ्यासक म्हणून पुढे प्रसिद्धी लाभलेले ल.रा. पांगारकर यांनी फर्ग्युसन कॉलेजचा विद्यार्थी म्हणून त्यांना आलेला टिळकांच्या शिकविण्याच्या पद्धतीतील अनुभव एका व्याख्यानातून विशद केला. ते म्हणाले- ज्यांच्याकडे संवेदनशीलता असते, त्यांना काव्य आवडतं आणि अभ्यासता येतं; परंतु जे मनाने शुष्क असतात, ते गणित आणि विज्ञान अभ्यासतात. जेव्हा टिळकांना पांगारकर यांच्या या टिप्पणीविषयी कळलं, तेव्हा ते त्यांना भेटले आणि त्यांनी बिनतोड युक्तिवाद केला तो असा- ते म्हणाले, ''गणितदेखील एका काव्यासारखंच आहे, ते उमगण्यासाठी एका विशेष प्रकारच्या बुद्धिमत्तेची गरज असते, तेव्हाच गणितामधील काव्याची अनुभूती येते. ज्याप्रमाणे तुम्ही कवितावाचन करताना सौंदर्याची दृश्यता अनुभवता, त्याचप्रमाणे मी खगोलशास्त्राचा अभ्यास करताना आणि ताऱ्यांच्या कक्षेतील भ्रमणासंबंधी गणिती आकडेमोड करताना सौंदर्यानुभव घेतो.'' ते पुढे म्हणाले, ''ज्या माणसाला गणिताची समज वा जाण नाही, त्याच्यात काही तरी बौद्धिक डिफेक्ट असावा.''

अर्थात, आपल्या विद्यार्थ्यांनी केवळ अध्ययनापुरतंच आपले क्षितिज मर्यादित ठेवावं, असं त्यांना वाटत नसे. त्यामुळे त्यांनी विद्यार्थ्यांचं बौद्धिक क्षितिज विस्तारण्यासाठी तत्त्वज्ञान आणि राज्यशास्त्र यासारख्या विषयांबाबतही त्यांना प्रोत्साहित करणं आरंभलं. गणित आणि खगोलशास्त्रामधील

त्यांची रुची त्यांच्या पत्रकारितेबरोबरच पुस्तकांच्या लिखाणामधूनही लक्षात येते. फर्ग्युसन कॉलेजात गणित शिकवणं हे त्यांच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या सदस्यत्वाच्या काळात होतं. पांगारकरांच्या तत्कालीन आठवणीचा मथितार्थ लक्षात घेता, त्यावरील टिळकांची प्रतिक्रिया गणितालादेखील सौंदर्यात्मक दृष्ट्या कलेच्या आणि अभिव्यक्तीच्या साहित्यासमान पातळीवर नेऊन ठेवणारी आहे. गणिताचे सौंदर्य उमगलेला राजकीय नेता तसा विरळाच, तेही पारतंत्र्याच्या काळात. टिळकांची जहालमतवादी– खरं म्हणजे रोखठोक विचारसरणी– ही नामदार गोखल्यांच्या नेमस्त कायदेशीर विचारसरणीपेक्षा वेगळी ठरते. याला कारण कायद्याच्या ज्ञानासंदर्भात लोकमान्यांची गणिताची असलेली आधीची पार्श्वभूमी.

गणित विषय कलेसारखाच सर्जनशीलतेशी निगडित आहे; परंतु निसर्गातील अमूर्त सौंदर्याच्या टप्प्यांशी त्याची जुळलेली नाळ, त्याची अनुभूती आलेल्या व्यक्तीला नियमबद्ध बनवते. हेच टिळकांच्या बाबतीत घडलंय. गणिताच्या आकलनातून बुद्धीला चढलेली धार, रेझर शार्प असलेली जिव्हा आणि त्याद्वारे अचूक शब्दांची पखरण ही लोकमान्यांची खास वैशिष्ट्ये ठरलीत. तरीदेखील गणित शिकवणं ही बाब सर्वस्वी वेगळी. म्हणूनच टिळकांचं गणित शिकवणं केवळ कुशाग्र बुद्धिमत्तेच्या विद्यार्थ्यांच्या पचनी पडत असावं. म्हणजे शिकवण्याच्या बाबतीत गणित टिळकांना अमूर्ततेत बद्ध ठेवत असावं. त्यामुळे पांगारकरांच्या मतावर टिळकांची तिखट प्रतिक्रिया आली असावी.

स्पष्ट आणि करड्या भाषेतून आपली मतं रोखठोक मांडण्यामध्ये टिळकांचा गणिती बाणा सहज लक्षात येण्यासारखा आहे. त्यांना गणिती स्पष्टता भावत असे. त्यामुळे जेव्हा ते आपली भूमिका मांडत, तेव्हा तो मार्ग अग्रलेखाचा असो व एखाद्या सभेतील व्याख्यानाचा किंवा डेक्कन एज्युकेशन सोसयटीच्या बैठकीचा अथवा इंग्रज सरकारविरुद्ध कोर्टात स्वत:ची बाजू मांडण्याचा– तो मार्ग परखड गणितीपद्धतीचा व अचूक बेरजेचाच असे. 'एकंदरीत पारंपरिक कर्मठ कुटुंबात वाढल्यामुळे आपण भाषेबाबत खूपच आग्रही व मतांबाबत परखड आणि हिंदू समाजरचनेसंदर्भात अधिक झुकलेले आहोत', हे स्पष्टपणे मांडताना टिळकांनी दुटप्पीपणा दाखवलेला नाही. हे २ अधिक २ म्हणजे चार (२+२ =४) असे थेट गणिती आहे.

अर्थात, असे गणिती असल्याचं त्यांनी कुठेही म्हटलेलं अथवा लिहिलेलं नाही.

टिळकांचे अनेक व्याप आणि व्यवधानं लक्षात घेता, गणितासारखा पूर्ण वेळ खाणारा विषय आवडत असला तरी दैनंदिनरीत्या शिकवणं व त्याविषयी अत्याधुनिकरीत्या जाणून घेण्याइतकी उसंत त्यांच्याकडे नसावी. शिवाय जितक्या सहजपणे आज आपण जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानाच्या साह्याने जगातल्या कुठल्याही क्षेत्रातील माहिती व प्रगतीचा आढावा घेऊ शकतो, तसं त्या वेळी साधनांअभावी शक्य नव्हतं. त्यामुळे बीजभूमिती (Algebraic Geometry) सारख्या विषयामधील टिळकांची रुची त्यांना स्व-प्रयत्नातून जमेल तशी शिकण्यासाठी प्रवृत्त करत असे. अवघे सिद्ध करणारे पुरावे निदान त्यांच्या कॅल्क्युलस वहीतून प्राप्त झालेत.

त्यांच्या शेवटच्या तुरुंगवासातदेखील ते गणिताचा पाठपुरावा करत असल्याचं त्यांच्या वहीतून दिसतं. ही वही 'केसरी'च्या ग्रंथालयात आहे. प्रा.स.पां.देशपांडे यांनी याविषयी लिहिताना म्हटलंय, 'केसरी ग्रंथालयात बसून ही वही जेव्हा मी उघडली; तेव्हा भूमितीत ज्या वक्रास विवृत्त (Ellipse) म्हणतात, त्याच्या काही गुणधर्मांची लोकमान्य पडताळणी करीत असल्याचं आढळलं. अवकाशातील ग्रहांचे भ्रमण मार्ग विवृत्तीय असतात, म्हणून तर त्यांनी हा वक्र अभ्यासासाठी निवडला नाही ना- असा विचार मनात येऊन गेला. त्या ठिकाणी त्यांनी विवृत्ताची कार्तेशीय तसंच प्राचत्रिय समीकरणे घेऊन समाकलनाच्या रीतीनं क्षेत्रफळ यशस्वीपणे काढलेलं आहे. परंतु विवृत्ताच्या धनूची लांबी काढण्यासाठी गणिती मांडणी वारंवार करूनसुद्धा समाकलनाच्या प्राथमिक रीतीनं निर्णायक उत्तर मिळत नाही. मुलांच्या रफ वहीत जशी खाडाखोड असते, तशी करूनदेखील त्यांचे प्रयत्न फलद्रूप झालेले दिसत नाहीत.' समाकलनाच्या प्राथमिक रीतीनं विवृत्ताची लांबी 'अशक्य'आहे, असा जरी निष्कर्ष टिळकांनी काढला असला, तरी तो संशोधनामधला एक टप्पा ठरला असता. कारण या प्रश्नाच्या उकलीसाठी पाश्चिमात्य गणिती अबेल (त्यांच्या नावे अबेल पारितोषिक आहे), याकोबी, वायरस्टासे आदींनी जी विवृत्तीय कलनं व विवृत्तीय समाकलनं काढली, त्यावर आधारित ही पद्धत लागत असल्यानं आणि ते टिळकांच्या हयातीत त्यांच्या कानांवर न आल्यामुळे त्यांचे हे प्रयत्न विफल ठरत नाहीत. हे प्रा. देशपांडे यांचं मत योग्यच म्हणायला हवं. उलट म्हणूनच की काय, टिळकांनी समाकलनासाठी जो समाकल्य वापरला आहे, त्यांचे द्विपदीघात प्रमेयाच्या व्यापक पद्धतीनं विस्तार करून अथवा तो समाकल्य हे एक फलन (इंटिग्रल) घेऊन त्याचे उत्तरोत्तर अवकलांक काढून मॅकक्लोरीनची श्रेणी वापरून अंदाजे मूल्य काढण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

टिळकांच्या या कॅल्क्युलसच्या वहीसंबधी प्रा.देशपांडे यांनी तीन गणितज्ञांबरोबर चर्चा केली. त्यामध्ये पहिले होते व्ही.जे.टी.आय. माटुंगाचे तत्कालीन गणित विभागप्रमुख प्रा. अजित ढवळे, दुसरे होते मुंबई विद्यापीठातील गणित विभागाचे तत्कालीन प्रमुख प्रा.एम.जी.नाडकर्णी आणि तिसरे तज्ज्ञ म्हणजे प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ प्रा.जयंत नारळीकर. तिघांचीही मतं टिळकांचे गणितप्रेम आणि गणिती बुद्धिमत्तेची पुष्टी करणारी आहेत. विशेषतः या वहीच्या अनुषंगाने निश्चितच जाणवतं आणि नवल वाटत राहतं, ते त्यांच्या गणिती कूटप्रश्नांसाठी तुरुंगवासातील वेळेच्या अशा सदुपयोगाबद्दल. एवढा वेळ त्यांनी खर्ची घातला तो गणितप्रेमामुळेच.

आता त्यांच्या कॅल्क्लुस वहीसंदर्भात वर उल्लेखलेल्या तज्ज्ञांची मतं जाणून घेऊ या. प्रा.ढवळे यांच्यामते, टिळक ज्या वेळी पदवी परीक्षेची तयारी करीत होते, तेव्हा त्यांना अभ्यासाव्या लागलेल्या गणिताचा दर्जा काय होता हे लक्षात घेतलं पाहिजे. टिळक १८७२ मध्ये मॅट्रिक झाले तेव्हापासून ते १८७६ मध्ये बी.ए. होईपर्यंतची मुंबई विद्यापीठाची हँडबुकं चाळल्यावर प्रा.देशपांडे यांच्या लक्षात आलं की, त्यात अभ्यासक्रम दिलेला नसला तरी त्या वेळेच्या प्रश्नपत्रिका समाविष्ट आहेत. त्यामधून लक्षात येतं की, पूर्वीच्या इंटर किंवा हल्लीच्या बारावी परीक्षेपेक्षा बी.ए.च्या अभ्यासक्रमांचा दर्जा तसा कमी होता. तसंच तीन तासांच्या प्रश्नपत्रिकेत ४ ते ७ गुणांचा एक असे १४-१५ प्रश्न होते. कलनाची पहिली प्रश्नपत्रिका अवकलनावर (डिफरेन्शिएल कॅल्क्युलस) होती, तर दुसरी समाकलनावर (इंटिग्रल कॅल्क्युलस) होती. त्यात निश्चित समकलनावर (डेफिनेट इंटिग्रेशन) फारसा भर दिसून येत नाही. तसंच पहिल्या प्रश्नपत्रिकेत कमाल आणि किमान किमतींचा अपवाद वगळता दोन्ही प्रश्नपत्रिकांतून या विषयाच्या उपयोजनावर (ॲप्लिकेशन) आधारलेले प्रश्न नाहीत.

प्रा. नाडकर्णी यांचा कयास असा की, समाकलनाच्या प्राथमिक रीतीनं विवृत्ताच्या धनूची लांबी काढण्यात कोणीही

यशस्वी झालं नसल्याचं टिळकांच्या कानांवर असावं. विवृत्तीय फलनाची उपपत्ती (हायपोथेसिस) १९ व्या शतकाच्या सुरुवातीस जाहीर झाल्यावर गणिती जगतात तिचा प्रसार होऊन पाश्चात्त्य देशांतच महाविद्यालयीन पातळीवर ती १९ व्या शतकाच्या अखेरीस प्रविष्ट झाली. मात्र, आपल्याकडे याकोबी आणि वायरस्टासे यांच्या विवृत्तीय फलनावर पुस्तकं आल्यावर विसाव्या शतकाच्या पहिल्या चरणात हा विषय पदव्युत्तर पातळीवर आला.

टिळक ज्या वेळी तुरुंगात याविषयी काम करीत होते, तेव्हा त्यांचं वय सुमारे ५५ वर्षे असावं. कॉलेजात अभ्यासलेल्या विषयांचं या वेळी म्हणजे कॉलेज सोडून ३०-३५ वर्षे उलटून गेल्यावर आणि विविध क्षेत्रांत कामगिरी करून मानवी मेंदूच्या मर्यादेनुसार विस्मरण होण्याची असलेली शक्यता लक्षात घेता, हे सर्व अत्यंत कठीण वाटतं. पण गणितामधील रुची तेव्हा टिळकांना कॉलेजात शिकलेल्या बीजभूमिती कलनाचा उपयोग करून तुरुंगातील कंटाळवाण्या वेळेत विवृत्ताचं क्षेत्रफळ आणि धनूची लांबी काढण्यासाठी प्रेरित करते, ते त्या दृष्टीनं प्रयत्नही करतात, त्यामध्ये एखादं सूत्र चुकतंदेखील; या बाबींकडे दुर्लक्ष करूनदेखील ही गोष्ट निश्चितच चित्तवेधक म्हटली पाहिजे.

टिळकांच्या या वहीविषयी प्रा.जयंत नारळीकर म्हणतात- त्यांचं काम विवृत्ताच्या भूमितीशी संबंधित असून विवृत्तांचं तसंच त्यांच्या विशिष्ट भागांची लांबी, क्षेत्रफळ असे प्राचल (डेरिव्हेटिव्ह) काढण्यात त्यांना आस्था असल्याचं दिसतं. त्यात वैश्लेशिक कलनाच्या साह्यानं ते प्रयत्न करत होते. ज्या विवृत्तीय समाकलनाची किंमत काढता येत नाही, म्हणून त्यांना आसन्न पद्धती वापरलेल्या दिसतात. विवृत्ताच्या प्राचलांत सूक्ष्म बदल करून त्याचे क्षेत्रफळ, लांबी इत्यादींवर काय परिणाम होतो, हे पाहण्याचा ते प्रयत्न करतात. त्यांना ग्रहगतिशास्त्राविषयी असलेल्या आस्थेतून त्यांनी या प्रश्नात लक्ष घातले असावे; परंतु हे काम करण्यासाठी ज्यामुळे चालना मिळाली असेल, अशा मूलभूत प्रश्नांचा इथे उल्लेख आढळत नाही. गणिती कूटप्रश्नांसाठी तुरूंगवासातील वेळ खर्च करणं खरोखरच कौतुकास्पदच आहे.

टिळकांद्वारे स्वत:ची गणित जिज्ञासा भागविण्याची धडपड केवळ गणिती प्रतीकं आणि प्रमेय यातून व्यक्त झाली. त्याविषयी प्रा.नाडकर्णी आणि प्रा.नारळीकर यांची मांडणी कदाचित काही वाचकांना किचकट वाटेल. परंतु टिळकांच्या मनात गणिताबाबत नेमकं आणखी काय दडलं होतं, हे जाणून घेण्यासाठी त्यांच्या उपलब्ध असलेल्या लिखाणाचा तूर्त प्रत्यक्ष उपयोग होत नाही. शिवाय ही बाब तशी खूपच वैयक्तिक पातळीवर सीमित राहिल्यामुळे आणि त्यांना स्वत:लाही याविषयी वेळेअभावी फारसा निवांतपणा न लाभल्यामुळे व्यक्त करता आली नसावी. टिळकांच्या विविध चरित्रांमधूनदेखील चरित्रकारांना ही बाजू रंगवता आलेली नाही, ही खंत उरतेच.

टिळकांचं गणितप्रेम हे खरंखुरं होतं. इतिहासकारांसाठी या संशोधनातून अधिक प्रकाश टाकण्याचं आव्हान अद्याप बाकी आहे. अग्रलेखांतून व्यक्त झालेले टिळकांचे विचार गणितीय कसोटीवर तपासून पाहावे लागतील. एकूणातच, गणितात गती असणारा राजकीय द्रष्टा नेता हे बिरुद लावणं सोईचंच आहे. टिळकांचा नव्याने वेध घेऊन याविषयी आणखी पुरावे उपलब्ध झाल्यास 'गणिती' नाही तरी 'गणितप्रेमी टिळक' ही छोटेखानी पुस्तिका तयार होणं लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी शताब्दी वर्ष समाप्तीच्या दृष्टीने सार्थ ठरेल, तसं थोडंसं कठीण असलं तरी!

टिळकांच्या गणितप्रेमाविषयी इतकं सगळं जाणवतं; परंतु त्यांच्या उत्तम, विविधांगी व्यक्तिमत्त्वाची ही गणितीय बाजू इतिहासाचा विचार करता दुर्लक्षित राहिली. त्यांच्या वहीच्या अनुषंगाने टिळकांच्या पुण्यतिथी शताब्दीनिमित्त टिळकांना पुन्हा एकदा समजून घेण्याची वही एक उत्तम संधी म्हणून हा लेखनप्रपंच होता. जिज्ञासूंना ही वही केसरी ग्रंथालय, पुणे इथं पाहता येईल या प्रा.स.पां.देशपांडे यांच्या सूचनेस दुजोरा देत टिळकांच्या गणितप्रेमास वंदन करून गणिताविषयीचा स्वतःचा ध्यास वृद्धिंगत झाला तर आनंद. हीच टिळकांप्रति खरी कृतज्ञता.

शैलेश माळोदे, नाशिक
shailesh.malode@gmail.com
Mob.9850909635

(नाशिक येथील आकाशवाणी केंद्राचे संचालक असलेले शैलेश माळोदे यांनी गणित या विषयात पदव्युत्तर पदवी मिळवलेली असून, विविध विषयांवर ते सातत्याने लेखन करतात; सध्या ते चीनच्या विकासाबाबत अभ्यास करीत आहेत.)

लोकमान्य
स्मृतिशताब्दी

टिळक हरवल्याचा शोध

सदानंद मोरे

४ जून २०१३ रोजी, दिल्ली येथील नवीन महाराष्ट्र सदनाचे उद्घाटन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी केंद्रिय कृषिमंत्री शरद पवार, केंद्रिय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, महाराष्ट्राचे राज्यपाल के.शंकरनारायण, मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली, दिल्लीतील कस्तुरबा गांधी मार्गावरील सव्वासहा एकर जागेत दीडशे कोटी रुपये खर्च करून उभारलेल्या या महाराष्ट्र सदनात १३९ रेसिडिन्शियल सूट आहेत : मुख्यमंत्री व राज्यपाल यांच्यासाठी दोन, कॅबिनेट मंत्र्यांसाठी आठ, राज्यमंत्र्यांसाठी १६, सचिवांसाठी सहा, आमदारांसाठी २१ आणि इतर पाहुण्यांसाठी ८० असे ते विभाजन आहे. या सदनाच्या आवारात दर्शनी बाजूला मध्यभागी छत्रपती शिवाजी महाराज, त्यांच्या दोन बाजूंना महात्मा फुले व डॉ.आंबेडकर आणि आतल्या बाजूला यशवंतराव चव्हाण व छत्रपती शाहू महाराज अशा पाच महापुरुषांचे भव्य पुतळे आहेत. महाराष्ट्राच्या लोकव्यवहाराचे अभ्यासक डॉ.सदानंद मोरे यांचा २९ जून २०१३ च्या साधना साप्ताहिकात प्रसिद्ध झालेला हा लेख कोणाही संवेदनशील मराठी माणसाला अंतर्मुख करणारा आहे.

– संपादक

जाहिरात

हरवले आहेत!

बाळ गंगाधर टिळक या नावाचे वयस्क गृहस्थ 'महाराष्ट्र सदनात जातो' असे सांगून गायकवाड वाडा या आपल्या राहत्या घरातून बाहेर पडले ते अद्याप परत आलेले नाहीत व सदनातही आढळले नाहीत. उमर वर्षे ६०, उंची– सुमारे ५ फूट ६ इंच, वर्ण सावळा, चेहरा रापलेला, डाव्या कानाने थोडे कमी ऐकू येते. डोक्यावर पुणेरी पगडी व खांद्यावर उपरणे, सुपारी खाण्याची सवय.

वरील वर्णनाचे गृहस्थ कोणास आढळले तर त्याने कृपया व्यवस्थापक, केसरी मराठा संस्था, नारायण पेठ, पुणे ३०. या पत्त्यावर संपर्क साधावा. योग्य बक्षीस दिले जाईल.

तीर्थरूप पितामह, तुम्ही गेल्यापासून सर्व कुटुंबीय, दै.केसरीचे कर्मचारी व गणेश मंडळाचे कार्यकर्ते चिंतेत आहेत. श्री.सुकृत खांडेकर यांनी अंथरुण धरले आहे. कृपया, जाहिरात पाहिल्यापाहिल्या असाल तेथून परत घरी या.

आपला आज्ञाधारक
दीपक

बातमी

टिळक बेपत्ता

पुणे, दि. ५. गेले तीन दिवस बेपत्ता असलेले भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे थोर सेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा अद्याप काहीही ठावठिकाणा न लागल्यामुळे पुणे शहरात चिंतेचे वातावरण पसरले आहे. आपण याबाबतची तक्रार नारायण पेठ, पोलिस चौकीत नोंदवली असल्याची माहिती डॉ.दीपक टिळक यांनी पत्रकारांना दिली. दरम्यान राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी उद्घाटन केलेल्या दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात लोकमान्य टिळक यांची चौकशी करण्यासाठी महाराष्ट्रातून खास पोलिस पथक पाठवण्यात येत असल्याची घोषणा राज्याचे गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी केली. ज्येष्ठ नागरिकांच्या बेपत्ता होण्याच्या प्रमाणात वाढ होत असल्याची चिंताही त्यांनी व्यक्त केली. अशा नागरिकांना झेड– प्लस दर्जाचे संरक्षण देण्याची योजना शासनाच्या विचाराधीन असल्याचेही त्यांनी सांगितले.

अग्रलेख

लोकमान्य आणि राजमान्य

लोकमान्य टिळकांसारखा जागतिक कीर्तीचा नेता पुणे शहरातून बेपत्ता व्हावा ही गोष्ट या शहराच्या नावलौकिकाला साजेशी नाही, याविषयी कोणाचे दुमत होणार नाही. आमच्याकडे आलेल्या बातमीनुसार दिल्लीत संपन्न होणाऱ्या महाराष्ट्र सदनाच्या भव्य इमारतीच्या उद्घाटन समारंभासाठी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि नामदार यशवंतराव चव्हाण यांना निमंत्रणे होती. आपले नाव चुकून वगळले गेले असेल किंवा पोस्ट खात्याचा काही घोळ झाला असेल अशा समजुतीने बळवंतराव निमंत्रण गृहीत धरून दिल्लीला निघाले, ही त्यांची मोठी चूक होती. निमंत्रण असलेल्या ऐतिहासिक पुरुषांच्या प्रवासाची विशेष व्यवस्था महाराष्ट्र शासनाने केली होती. तिच्यात सुरक्षेचाही समावेश होता. त्यामुळे ते महाराष्ट्र सदनापर्यंत सुखरूप पोहोचू शकले. लोकमान्यांना मुद्दाम निमंत्रणच नसल्यामुळे त्यांना कोण संरक्षण देणार?

यासंदर्भात दिल्लीच्या एका न्यूज चॅनेलने दाखवलेली बातमी खरी असेल तर मात्र ती गंभीर बाब ठरू शकते. निमंत्रण नसल्यामुळे त्यांना सदनाच्या प्रवेशद्वारातच अडवण्यात आले असे या वाहिनीचे वृत्त आहे. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' असे ठणकावून सांगणाऱ्या बळवंतरावांनी निमंत्रण हासुद्धा आपला हक्क असल्याची समजूत करून घेतली, तीच आमच्या मते चूक होती. आणि 'आपण ज्याअर्थी लोकमान्य आहोत, त्याअर्थी राजमान्यही असलो पाहिजे' हे त्यांनी केलेले अनुमानही चुकीचेच होते.

श्रीयुत टिळक यांची ज्येष्ठता विचारात घेतली असता आम्हाला त्यांना सल्ला देण्याचा अधिकार नाही, हे न समजण्याइतके आम्ही अडाणी नाही. तथापि, राहवत नाही म्हणून त्यांना हा अनाहूत सल्ला देण्याचे औद्धत्य करण्याची परवानगी आम्ही मागतो. यापुढे त्यांना अशा कार्यक्रमास जायची इच्छा झाली तर त्यांनी चि.रोहितला सांगून त्याच्यामार्फत आधीच सर्व नियोजन करून घ्यावे. राहुल किंवा रोहित यांची नावरास एकच येत असल्याने अशा गोष्टी राहुल यांच्या माध्यमातून घडवून आणणे अशक्य कोटीतील आहेत असे आम्हाला तरी वाटत नाही.

जाता जाता आणखी एका गोष्टीचा उल्लेख. एके काळी टिळकांना त्यांचे विरोधक 'तेल्यातांबोळ्यांचे पुढारी' म्हणून हिणवत असत. आज 'तेल्यातांबोळ्यांचे शत्रू' म्हणून त्यांची प्रतिमा उभी होत असल्याचे आम्हाला स्पष्ट दिसत आहे. आपल्याला निमंत्रण नसण्याचे हे तर कारण नसावे, याचा विचार करण्याची वेळ टिळकांवर आली आहे. १९२५ च्या दरम्यान पुणे शहरात महात्मा फुले यांचा पुतळा बसवण्यास टिळकांच्या हटवादी व अदूरदृष्टीच्या अनुयायांनी विरोध केला होता, त्याची ही प्रतिक्रिया नसेल अशी आम्हाला आशा आहे. फुल्यांच्या अनुयायांनी टिळकांच्या अनुयायांबरोबर आचरटपणात स्पर्धा करू नये. ब्राह्मणांची बुद्धिमत्ता आदर्श मानावी की नाही याबद्दल वाद होऊ शकेल, पण निदान त्यांचा निर्बुद्धपणा तरी गिरवू नये असे आमच्यासारख्या तटस्थ निरीक्षकाला वाटते.

बातमी

पुतळ्यांच्या संवादाने गूढ वाढले

नवी दिल्ली, (प्रतिनिधी)– येथील महाराष्ट्र सदनाच्या भव्य इमारतीच्या उद्घाटनसोहळ्याचा प्रसंग वीज आणि ध्वनियंत्रणेतील बिघाडामुळे गाजत असताना, लोकमान्य टिळकांच्या बेपत्ता होण्याच्या प्रकरणाने राजधानीत सर्वत्र खळबळ माजली आहे. काँग्रेस अध्यक्ष श्रीमती सोनिया गांधी यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याशी या विषयावर खास चर्चा केल्याचे वृत्त आहे.

चव्हाण यांनी टिळकांना समारंभाच्या स्थानी प्रवेश न देण्याची जबाबदारी राष्ट्रपती कार्यालयाची व राष्ट्रपतींच्या सुरक्षाव्यवस्थेची असून त्याचा महाराष्ट्र शासनाशी काही संबंध नसल्याचा पवित्रा घेतल्याचे सूत्रांकडून समजते. राजधानीतील प्रमुख ठिकाणी लोकमान्य टिळकांची छायाचित्रे लावण्यात आली असून नागरिकांनी शोधकार्यात सहकार्य करावे, असे आवाहन दिल्लीच्या मुख्यमंत्री श्रीमती शीला दीक्षित यांनी केले आहे.

दरम्यान महाराष्ट्राचे गृहमंत्री आर.आर.पाटील यांनी पाठवलेले विशेष पोलीस पथक येथे दाखल झाले असून त्याने महाराष्ट्र सदनाची पाहणी केली. पथकाचे प्रमुख श्री.गोपाळराव भांगरेपाटील यांच्या डायरीतील पाने आमच्या हाती लागली असून ती आम्ही आमच्या वाचकांसाठी खास उद्धृत करीत आहोत. मात्र त्यामुळे तपासाला मदत होईल की या प्रकरणाची गुंतागुंत वाढेल याबद्दल निश्चित काही सांगणे आज तरी अवघड आहे.

– १ –

'दिल्लीत दाखल झाल्यापासूनच याची जाणीव होत आहे. येथील सर्वसामान्य माणसाला टिळकांचे नाव माहीत असल्याचे आढळून आले. काल येथील टिळकांशी संबंधित असलेले रस्ते, गल्ल्या, कॉलन्या यांची पाहणी केली व काही धागेदोरे मिळतात का याचीही चाचपणी केली. मा.आबांनी दोन वेळा मोबाईलवरून तपासाच्या प्रगतीची विचारणा केली. पावसाळी अधिवेशन सुरू होण्याच्या आत तपास पूर्ण झाला नाही तर आमदार नडतील, ही काळजी त्यांच्या आवाजावरून जाणवत होती.'

– २ –

'रात्री महाराष्ट्र सदनात आलो. युनिफॉर्ममध्ये तपास केला तर लोक माहिती द्यायला बिचकतात असा अनुभव असल्याने आम्ही सर्व साध्या पोशाखात वावरत होतो. शेजारच्या पान टपरीवाल्याकडून ४ तारखेला एका वृद्ध गृहस्थाने एक डझन सुपाऱ्या खरेदी केल्या होत्या असे समजले. त्याला टिळकांचा फोटो दाखवला असता त्याने तो लगेचच ओळखला. म्हणजे ते उद्घाटनाच्या दिवशी येथे आले होते हे निश्चित. लगेचच मा.आबांना मोबाईलवरून तसे कळवले.

– ३ –

'रात्री सदनातच जेवलो. येथील कर्मचारी चांगले सहकार्य करीत आहेत. जेवणानंतर सदनाच्या आवारात शतपावली करीत असताना दबक्या आवाजात चर्चा चालू असल्याची चाहूल लागली. तेव्हा आसपास नीट न्याहाळून पाहिले, पण कोणी दिसेना. आवाज येत असल्याची मात्र आम्हा सर्वांचीच खात्री होती... लक्षात आले की, सदनात बसवलेले पुतळे एकमेकांशी बोलत आहेत. क्षणभर कानांवर विश्वास बसेना. पण माझ्या इतरही सहकाऱ्यांना तसेच वाटत होते तेव्हा विश्वास ठेवणे भाग पडले. नीट ऐकू येत नव्हते, तरी पण जमेल तसे लिहून घेतले–

डॉ.आंबेडकर– (शाहू महाराजांना अभिवादन करीत) महाराज ओळख करू देतो– हे यशवंतराव चव्हाण (चव्हाण महाराजांना मुजरा करतात) महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री. मी इहलोक सोडला तेव्हा अगदीच तरुण होते. महाराष्ट्राचा कारभार फारच चांगला केला यांनी.

शाहू छत्रपती– झक्कास! बिल्डिंग ब्येस बांधली. बाकी भीमराव, तुम्हाला इथे पाहून बरे वाटले. स्वतंत्र भारताची घटना तुम्ही लिहिल्याचे समजले होतेच. माणगाव ते दिल्ली मोठाच पल्ला गाठला तुम्ही, जोतिरावांचे पांग फेडलेत.

डॉ.आंबेडकर– ते काय, पलीकडेच आहेत की, जोतिबा. तुमचे–आमचे गुरु.

यशवंतराव चव्हाण– अहो, तुमच्या तिघांच्या नावाने तर आपले राज्य चाललेय. पण आपले आद्यपुरुष– तेसुद्धा येथेच आहेत. (शिवाजी महाराजांच्या पुतळ्याकडे बोट दाखवतात.)

जोतिराव फुले– कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी राजे भोसले यांना सलाम.

शाहू महाराज– आबासाहेब, मुजरा घ्यावा. तमाम महाराष्ट्राचा मुजरा–

शिवाजी महाराज– आशीर्वाद आहे आमचा तुम्हा सर्वांना. आमच्यानंतर महाराष्ट्राच्या कर्तबगारीची परंपरा तुम्ही चालू ठेवलीत. आम्ही धन्य झालो. पण आपण सारे इथे एकत्र कसे?

यशवंतराव चव्हाण (मुजरा करीत)– मी सांगतो महाराज, मी यशवंतराव चव्हाण. महाराष्ट्र राज्याचा.

शिवाजी महाराज– मी ओळखतो तुम्हाला. प्रतापगडावर आमचा पुतळा बसवला होता तो तुम्हीच ना! पंडित नेहरूंना बोलावले होते उद्घाटनाला. राज्याची उत्तम पायाभरणी केलीत तुम्ही, हिंदुस्थानचे संरक्षणमंत्री झालात. पाकिस्तानला धूळ चारली युद्धात. आमचे नाव राखले, शाब्बास!





यशवंतराव चव्हाण– कृपा असू द्यावी महाराज. तर हे आपले महाराष्ट्र सदन. महाराष्ट्राचे राज्यकर्ते राजधानीत येतात तेव्हा त्यांच्या राहण्या-जेवणाची, उठण्या-बसण्याची सोय व्हावी म्हणून महाराष्ट्र सरकारनेच बांधलंय.

शिवाजी महाराज– वा! हिरोजी इंदुलकराची याद यावी असे बांधकाम आहे. (शाहू छत्रपतींना उद्देशून) राजे, महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांना आमच्या वतीने मानाची वस्त्रे रवाना करा. पण आपण सगळे इथे...

यशवंतराव चव्हाण– महाराज, तुमच्यापुढे हे सांगताना मला संकोचल्यासारखे झाले आहे. महाराष्ट्राचे प्रातिनिधिक महापुरुष म्हणून राज्यकर्त्यांनी आपली इथे प्रतिष्ठापना केली आहे. मी म्हणत होतो की माझा समावेश नको– पण ऐकले नाही.

शिवाजी महाराज– राज्यकर्त्यांनी योग्यच केले, तुमची प्रतिष्ठापना करून. तुमची कर्तबगारी जाणतो आम्ही (इकडे-तिकडे पाहात) पण...

शाहू महाराज– पण, पण काय महाराज?

शिवाजी महाराज– आमचे ज्ञानोबा-तुकोबा दिसत नाहीत कुठे? महाराष्ट्रात एवढेच महापुरुष होऊन गेले? यशवंतराव, आम्ही तुमचे ते भाषण ऐकलेय. महाराष्ट्राच्या चार परंपरा सांगितल्या होत्या तुम्ही. आणि त्यांचे प्रतीक असणारे पुरुषसुद्धा...

यशवंतराव चव्हाण– होय महाराज. त्यातील एक परंपरा तुमची होती– शौर्याची.

शिवाजी महाराज– आमचे राहू द्या. बाकीचे...

यशवंतराव चव्हाण– आपले जोतिराव– समतेचे, लढ्याचे प्रतीकच आहे ते.– (अडखळतात).

शिवाजी महाराज– थांबलात का? पुढे बोला.

यशवंतराव चव्हाण– ज्ञानोबा माऊली आपल्या संतपरंपरेचे प्रतिनिधित्व करतात.

शिवाजी महाराज– अस्से. आधुनिक महाराष्ट्राला संतांची अडचण होतेय की काय? असेलही– आणि चौथे?

यशवंतराव चव्हाण– लोकमान्य टिळक– त्यागाची आणि देशभक्तीची परंपरा, ब्रिटिशांच्या विरोधात साऱ्या देशात असंतोष निर्माण केला.

शिवाजी महाराज– आमची जयंती आणि राज्याभिषेक दिन पण साजरा करायचे तेच ना ते बळवंतराव. या जोतिरावांनी तर आमच्यावर पोवाडाच रचला होता– काय जोतिबा तुम्हाला काय वाटते?

जोतिराव फुले– या शाहू महाराजांचे वडील चौथे शिवाजी महाराज यांची बाजू घेऊन ब्रिटिश सरकारवर टीका केली होती टिळकांनी. त्यांच्यावर खटला झाला तेव्हा मीच सांगितलं होतं उरवणेशेठला, जामीनकी द्या म्हणून. काय शाहूजी?

शाहू महाराज– बरोबरच आहे. त्यांचे-आमचे मतभेद होते काही बाबतीत. पण महाराष्ट्राचे नाव देशपातळीवर नेले ते त्यांनीच. आणि बाहेर भांडलो तरी आतून मदत करायचो आम्ही एकमेकांना. अहो ते गेले त्या दिवशी जेवलो नव्हतो आम्ही. काय भीमराव, आठवतेय ना?

डॉ.आंबेडकर– होय महाराज, आपले हे वाद-मतभेद

महाराष्ट्रापुरतेच ठेवायला हवेत. भारतीय पातळीवर आपण सर्व महाराष्ट्रीयांनी एकत्रच असायला हवे.

यशवंतराव चव्हाण– आपण म्हणता ते योग्यच आहे महाराज– पण सध्याचे महाराष्ट्रातले वातावरण...

शिवाजी महाराज– माहीत आहे मला. बहिर्जीने फरकच सांगितला. तुमचा तो ब्राह्मण–ब्राह्मणेतरवाद– अहो माझ्या प्रधानमंडळात सात ब्राह्मण होते. तुम्ही राज्यकर्ते आहात ना? तुम्हाला साधे ब्राह्मणांना हाताळता येत नाही? राज्यकर्त्यांनी सर्वांना बरोबर घेऊन जायचे असते. सर्वांच्या गुणांचा उपयोग करून घ्यायचा असतो. काय बाबासाहेब?

यशवंतराव चव्हाण– माझंही तेच धोरण होतं की महाराज, तर्कतीर्थ, गाडगीळ, बर्वे यांच्या गुणांचा उपयोग करून घेतला मी राज्यासाठी. पण हे अलीकडचे.

शिवाजी महाराज– माझा निरोप सांगता त्यांना. हे बरोबर नाही. आम्ही असा भेदाभेद केला असता तर स्वराज्य निर्माणच झाले नसते. ही चूक लवकरात लवकर दुरुस्त झाली पाहिजे, नाही तर आम्ही महाराष्ट्र सदनातून निघून जाऊ.

यशवंतराव चव्हाण– होय महाराज. मी बघतो ते.

बातमी

विशेष पथक स्वगृही?

नवी दिल्ली, दि. ८ (प्रतिनिधी)

विशेष पोलिसदलाचे प्रमुख गोपाळराव भांगरेपाटील यांच्या डायरीतील पाने प्रसिद्ध झाल्यामुळे सर्वत्र एकच खळबळ माजली आहे. टीम भांगरेपाटीलमधील अधिकारी शुद्धीवर होते काय? असा सवाल उपस्थित केला जात असून पुढील वाद टाळण्यासाठी भांगरेपाटलांच्या विशेष तपासदलाला परत बोलावण्याचा निर्णय महाराष्ट्राचे गृहमंत्री आर.आर.पाटील घेणार असल्याची चर्चा आहे.

निवेदन

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक सुखरूप असून त्यांनी स्वत: याबाबतीत पाठविलेले निवेदन त्यांच्याच आदेशावरून आजच्या अंकात प्रसिद्ध करीत आहोत. लोकमान्य बेपत्ता झाल्यापासून त्यांच्या असंख्य चाहत्यांनी दाखवलेल्या आस्थेबद्दल केसरी परिवार ऋणी आहे.

संपादक, दै.केसरी.

दि. ४ च्या उद्घाटन सोहळ्यास आम्हाला निमंत्रण नव्हते. तथापि, एक जागरूक पत्रकार या नात्याने आम्ही आपण होऊन राजधानीत गेलो होतो. पत्रिका नसल्यामुळे आम्हाला प्रवेशद्वारात रोखण्यात आले होते हे वृत्त खरेच आहे. तथापि, आम्ही हाडाचे पत्रकार व छत्रपतींच्या गनिमी काव्याचे वारसदार मराठे असल्याने सुरक्षाकर्मींना गुंगारा देऊन सदनात प्रवेश मिळवला व त्या आनंददायी सोहळ्याचे याचि देही याचि डोळा साक्षीदार झालो.

महाराष्ट्र सदनात आमचा पुतळा उभारला नसल्याने काही लोक नाराज असल्याचे समजते. त्यांना आम्ही सांगू इच्छितो की, आम्ही स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला तो गीतेकडून निष्काम कर्मयोगाच्या भूमिकेतून. कर्मफलावर नजर न ठेवता कर्तव्यकर्म करीत राहावे या आमच्या तत्त्वानुसार व आमच्या कुवतीनुसार आम्ही आमचे कर्तव्य करीत राहिलो. स्वातंत्र्य मिळाले, पुढे आपल्या मराठी लोकांचे राज्य झाले याचे आम्हाला समाधान आहे. आमचा पुतळा बसवला न बसवला, आमचे नाव एखाद्या विद्यापीठाला वा रस्त्याला दिले ना दिले यामुळे आमच्या मन:स्थितीत काही फरक पडणार नाही. मात्र महाराष्ट्र सदनात संतांचे आणि विशेष करून आमच्या महादजी शिंदे, सयाजीराव गायकवाड व विठ्ठलराव शिंदे यांचे पुतळे जरूर बसवावेत. ज्ञानोबा–तुकोबा चालणार नसतील तर भागवत धर्माची पताका पंजाबपर्यंत फडकावणारे संत नामदेवराय चालतील.

ता.क.–

आम्ही व शाहू महाराज भांडलो होतो, पण आमच्या चुकांची पुनरावृत्ती तुम्ही केलीच पाहिजे असे नाही.

आपला नम्र

बाळ गंगाधर टिळक

सदानंद मोरे, पुणे
sadanand.more@rediff.com
Mob.: 9822832896

(महाराष्ट्राच्या लोकव्यवहाराचे अभ्यासक असलेल्या सदानंद मोरे, 'लोकमान्य ते महात्मा' आणि 'तुकाराम दर्शन' या दोन बृहद ग्रंथांसह डझनभर पुस्तकांचे लेखक आहेत; त्यांनी लिहिलेले टिळकांचे चरित्र अलीकडेच प्रकाशित झाले आहे.)

weeklysadhana.in/archive

मागील १० वर्षांचे

साधना साप्ताहिकाचे

डिजिटल अर्काइव्ह

मागील ७२ वर्षे अखंड प्रकाशित होत असलेल्या साधना साप्ताहिकाच्या डिजिटल अर्काइव्हचे काम चालू आहे. त्यातील पहिला टप्पा म्हणजे अलीकडच्या १० वर्षांचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. आणखी दोन वर्षांचे अंक ऑगस्टअखेरीस अर्काइव्हवर येतील.

सध्या २०१० ते २०२० या काळातील ५०० अंक म्हणजे जवळपास चार हजार लेख युनिकोड व पीडीएफ या दोन्ही प्रकारांत उपलब्ध आहेत.

हे सर्व चार हजार लेख, लेखक, लेखन प्रकार व विषय तिन्ही प्रकारांत वर्गवारीसह उपलब्ध आहेत. हे सर्व लेख डाऊनलोड करता येतात, मेल वा व्हॉट्सॲपद्वारे पाठवता येतात.

१९४८ ते २००८ या ६० वर्षांचे असेच वापरायला सुलभ व जलद अर्काइव्ह तयार करण्याचे काम लवकरच चालू करत आहोत. आणखी तीन टप्प्यांत हे काम पूर्णत्वास जाईल.

सध्या अर्काइव्हवरील सर्व लेख सर्वांसाठी विनामूल्य उपलब्ध आहेत. मात्र त्याचा वापर करू इच्छिणाऱ्यांकडून दिल्या जाणाऱ्या लहान वा मोठ्या देणग्यांचे स्वागत आहे.

संपर्क । साधना साप्ताहिक
431, शनिवार पेठ, पुणे 411030 । Ph 020 24451724 / Mob.9545005138
weeklysadhana@gmail.com

साधना साप्ताहिक :
१ ऑगस्ट २०२०

Registered Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP- 6 /31-12-2020
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Registration No. PCW/080/2018-2020
Posted at PUNE PSO GPO 411001 / EveryThursday, Date of Posting : 25-7-2020 / Date of Publication : 25-7-2020

साधना प्रकाशनाचे नवे पुस्तक



महात्मा गांधी

जीवन आणि कार्य

लेखक : लुई फिशर

अनुवाद : वि. रा. जोगळेकर

१९१८ मध्ये पहिल्या महायुद्धात
सैनिकांच्या मदतीला स्वयंसेवक राहिलेल्या,
काही काळ शिक्षक म्हणून वावरलेल्या
आणि त्यानंतर 'न्यूयॉर्क टाइम्स' व अन्य इंग्रजी
दैनिकांसाठी पत्रकार म्हणून काम केलेल्या
लुई फिशर यांनी, दोन दशके रशियात व दोन दशके
युरोपात पत्रकारिता केली. 'मेन ॲन्ड पोलिटिक्स'
या पुस्तकामुळे ते प्रसिद्धीला आले, नंतर त्यांनी
लेनिन, स्टॅलिन, हिटलर यांच्यावरही
पुस्तके लिहिली. १९४२ च्या जूनमध्ये ते पहिल्यांदा
भारतात आले आणि गांधींना भेटले. त्यानंतर
दहा वर्षांनी त्यांचे The Life of Mahatma
Gandhi हे पुस्तक प्रकाशित झाले. हेच पुस्तक
वाचून रिचर्ड ॲटन्बरो या ब्रिटीश दिग्दर्शकाने
'गांधी' हा चित्रपट केला, त्याला सर्वोत्कृष्ट
सिनेमा व सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक यासह
आठ ऑस्कर पुरस्कार मिळाले.
ते पुस्तक प्रथमच मराठीत आले आहे.

पृष्ठे : ७५० अधिक १६ पाने छायाचित्रे
किंमत : पेपरबॅक ७०० रुपये । सवलतीत ५०० रुपये
हार्डबाऊंड ८०० रुपये । सवलतीत ६०० रुपये
(ट.ख.वेगळा)

संपर्क
साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०
Ph. 020 24459635 | mediasadhana@gmail.com

also available at amazon.in